## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.

बुधवार दि.२१.१०.२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थाई समितीचे सदस्य उपस्थित होते.

**श्री विनय विश्वांभरराव पाटील, सभापती**

सर्वश्री

| | |
|---|---|
| पवळे उमेश देवराव | वाजेदा तब्बसुम अथर उल ईमान |
| गाडगे शंकर जयवंतराव | चाऊस हसीना बेगम साबेर |
| किशोर किशनलाल यादव, | अ.हबीब अ.रहिम बागवान |
| बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला | मोरे संजय गंगाधर |
| अन्नेवार गंगासागर संदिप | इंदूबाई शिवाजीराव घोगरे |
| प्रविण बालाप्रसाद बियाणी | विनयकुमार जगदिश गुर्रम |
| संगिता पृथ्वीराज राओत्रे | ज्योती महेंद्र खेडकर |
| सलिमा बेगम नुरुल्ला खान | |

**सभापती** सर्व प्रथम उपस्थित स.सदस्य, प्राधिकृत अधिकारी तथा उपआयुक्त श्री रत्नाकर वाघमारे. प्र.स.आयुक्त श्री विजयकुमार मुंडे, मुख्य लेखा परिक्षक श्री आर.एस.कोलगणे, मुख्य वैद्यकिय अधिकारी, डॉ.आसिफ श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता, श्री सुग्रीव अंधारे, का.अभियंता बिएसयुपी व सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी याचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**संजय मोरे** आम्ही स्थायी समितीच्या सभेत चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी ३-४ प्रस्ताव दिले होते परंतु आमचे प्रस्ताव आजच्या स्थायी समितीच्या विषय पत्रिकेवर का घेण्यात आलेले नाही याचे कारण काय आहे.दि. १.१२.२०१४ पासुन झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यासाठी चा प्रस्ताव का घेण्यात आलेला नाही. आम्हाला एक वर्षापासून मागील सभेत कोणकोणते विषय पारीत करण्यात आले आयत्या वेळी कोणते विषय घेण्यात आले याची माहिती कशी होईल. नगरसचिवांनी आमचे प्रस्ताव विषय पत्रिकेवर का घेण्यात आलेले नाही याचा खुलासा करावा.

**नगरसचिव** स्थायी समितीचे निर्णयासाठी जे प्रस्ताव येतात त्या प्रस्तावाची यादी मा.सभापती स्थायी समिती यांचेकडे सादर करण्यात येते व त्यांच्या मान्यतेने स्थायी समितीची विषय पत्रिका काढण्यात येते.

**संतय मोरे** महराष्ट्र महानगरपालिकाक अधिनियम १९४९ मधील तरतूदीनूसार स्थायी समितीच्या विषयपत्रिकेवर पहिला विषय ह्रा मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा विषय घेणे आवश्यक आहे असे असतांना मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा विषय पुढील सभेच्या विषय पत्रिकेवर का घेण्यात येत नाही. याचे कारण काय आहे याचा खुलासा करावा.

**सभापती** मागील वर्षी झालेल्या सर्व स्थायी समिती सभेचे इतिवृत्त एकाच वेळी कायम करण्याचा विषय कोणत्या तारखेच्या स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला होता याचा खुलासा करण्यात यावा.

**संजय मोरे** मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा प्रस्ताव आम्ही ठेवलेला होता तो का घेण्यात आलेला नाही.

**सभापती** विषय पत्रिकेवर मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा विषय नाही

**संजय मोरे** दि.२७.८.२०१५ रोजी स्थायी समितीची सभा ठेवण्यात आली होती ती सभा मागील सभेचे इतिवृत्त देण्यात आलेले नसल्यामूळे तहकुब करण्यात आली होती.आम्ही या सभागृहात आलो तेव्हा पासुन आज पर्यत कोणकोणते विषय पास झाले त्याची माहिती होणेकरीता मागील सभेचे इतिवृत्त देणे आवश्यक आहे.

**सभापती** इतिवृत्त कायम करण्याचा विषय कार्यक्रम पत्रिकेवर नसल्यामूळे त्यावर चर्चा करण्यात येवू नये विषय पत्रिकेवर चर्चा करण्यात यावी.

**विषय क्र.१**

नांदेड शहर महानगरपालिकेच्या **हद्दीतील काळेश्वर रॉ-वॉटर पंप हॉऊस येथे विहिरीमध्ये व विहिरीच्या परिसराच्या आजुबाजुला पाच ते सहा वर्षापासुन साचलेला गाळ काढणे आवश्यक होते.** यासाठी असदवन जलशुध्दीकरण केंद्रास पाणी पुरवठा त्या काळात बंद करण्यात आला होता. त्यामुळे जुने नांदेड शहर व सिडको हडको भागात जनतेस पाणीपुरवठा बंद होता. गाळ साचल्यामुळे विहिरीत पाणीसाठा कमी जमा होत होता ते काढणे आवश्यक व महत्वाचे असल्याने **शिवसॅम बिल्डींग मटेरियल सप्लायर्स, हडको नांदेड** यांच्याकडून निविदा न मागविता जिल्हा दर सुची पेक्षा कमी दराने संबंधिताकडुन गाळ काढण्याचे काम करुन घेण्यात आले. **रु. १,८७,०००/-** यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे करिता सदर प्रस्ताव येत्या स्थायी समिती समोर मान्यते करिता सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ११३** **ठराव**

नांदेड शहर महानगरपालिकेच्या **हद्दीतील काळेश्वर रॉ-वॉटर पंप हॉऊस येथे विहिरीमध्ये व विहिरीच्या परिसराच्या आजुबाजुला पाच ते सहा वर्षापासुन साचलेला गाळ काढणे आवश्यक होते.** यासाठी असदवन जलशुध्दीकरण केंद्रास पाणी पुरवठा त्या काळात बंद करण्यात आला होता. त्यामुळे जुने नांदेड शहर व सिडको हडको भागात जनतेस पाणीपुरवठा बंद होता. गाळ साचल्यामुळे विहिरीत पाणीसाठा कमी जमा होत होता ते काढणे आवश्यक व महत्वाचे असल्याने कामाची तातडी व निकड लक्षात घेता सदरील काम **शिवसॅम बिल्डींग मटेरियल सप्लायर्स, हडको नांदेड** यांच्याकडून निविदा न मागविता जिल्हा दर सुची पेक्षा कमी दराने संबंधिताकडुन गाळ काढण्याचे काम करुन घेण्यात आले असून झालेला खर्च **रु. १,८७,०००/-** ला कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दी अंतर्गत घरोघरी कचरा संकलन करणे, रस्ते झाडणे, नाल्या काढणे, गाळ व कचरा वाहतूक करुन त्याची विल्हेवाट लावण्यासाठीच्या कामाचे अनुभवी कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यासाठी टाईम्स ऑफ इंडीया या वर्तमानपत्रात राज्य स्तरीय अंकात Corrigendum प्रसिध्द करण्यासाठी कळविले होते. तसेच उक्त कामासाठी जाहीर निविदा सुचना (तिस-यांदा) प्रसिध्द करण्यासाठी कळविले असता, संबंधीत वर्तमानपत्र धारकाने वरील प्रमाणे प्रसिध्द करुन त्याचे दोन देयकाचे एकूण रु.२,८९,४४०/- अदाईस्तव सादर केले आहे. करिता टाईम्स ऑफ इंडीया या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात आलेल्या Corrigendum तसेच जाहिर निविदा सुचना (तिस-यांदा) प्रसिध्द करण्यासाठी कळविले असता, संबंधीत वर्तमानपत्र धारकाने वरील प्रमाणे प्रसिध्द करुन त्याचे दोन देयकाचे एकूण रु.२,८९,४४०/- (अक्षरी रुपये दोन लक्ष एकोण नव्वद हजार चारशे चाळीस फक्त-) ची रक्कम **BENNETT, COLEMAN & CO.LTD.** यांच्या नावे अदाई करण्यासाठीच्या मान्यतेचा प्रस्ताव येत्या मनपा स्थायी समिती सभेसमोर मंजुरी करिता सादर.

**सभापती** प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.११४** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दी अंतर्गत घरोघरी कचरा संकलन करणे, रस्ते झाडणे, नाल्या काढणे, गाळ व कचरा वाहतूक करुन त्याची विल्हेवाट लावण्यासाठीच्या कामाचे अनुभवी कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यासाठी टाईम्स ऑफ इंडीया या वर्तमानपत्रात राज्य स्तरीय अंकात Corrigendum प्रसिध्द करण्यासाठी कळविले होते. तसेच उक्त कामासाठी जाहीर निविदा सुचना (तिस-यांदा) प्रसिध्द करण्यासाठी कळविले असता, संबंधीत वर्तमानपत्र धारकाने वरील प्रमाणे प्रसिध्द करुन त्याचे दोन देयकाचे एकूण रु.२,८९,४४०/- अदाईस्तव सादर केले आहे. करिता टाईम्स ऑफ इंडीया या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात आलेल्या Corrigendum तसेच जाहिर निविदा सुचना (तिस-यांदा) प्रसिध्द करण्यासाठी कळविले असता, संबंधीत वर्तमानपत्र धारकाने वरील प्रमाणे प्रसिध्द करुन त्याचे दोन देयकाचे एकूण रु. २,८९,४४०/- (अक्षरी रुपये दोन लक्ष एकोण नव्वद हजार चारशे चाळीस फक्त-) ची रक्कम **BENNETT, COLEMAN & CO.LTD.** यांच्या नावे अदाई करण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.३**

नावाशमनपा हद्दीतील मा.महापौर व उपमहापौर कक्षास रंगरंगोटी, दुरुस्ती नुतनीकरण व मॅट अंथरणे बाबत कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांच्या अहवालानुसार सदर काम करणे आवश्यक असल्याने सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री नितीन एन. भालेराव कंत्राटदार, नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु.६,५६,८०२/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.११५** **ठराव**

**नावाशमनपा हद्दीतील मा.महापौर व उपमहापौर कक्षास रंगरंगोटी, दुरुस्ती नुतनीकरण व मॅट अंथरणे बाबत** कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांच्या अहवालानुसार सदर काम करणे आवश्यक असल्याने कामाची तातडी लक्षात घेता सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर **श्री नितीन एन.भालेराव कंत्राटदार, नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला **खर्च रु.६,५६,८०२/-** यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.४**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील शिवाजीनगर दवाखान्यास रंगरंगोटी, दुरुस्ती करणे बाबत कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांच्या अहवालानुसार सदर काम करणे आवश्यक असल्याने सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर कामारीकर कंस्ट्रक्शन, नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास रु.८,०३,६००/- खर्च झालेला आहे.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर कामारीकर कंस्ट्रक्शन, नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु.८,०३,६००/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ११६** **ठराव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील शिवाजीनगर दवाखान्यास रंगरंगोटी, दुरुस्ती करणे बाबत** कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांच्या अहवालानुसार सदर काम करणे आवश्यक असल्याने सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर **कामारीकर कंस्ट्रक्शन, नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास **रु.८,०३,६००/-** खर्च झालेला आहे.कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर कामारीकर कंस्ट्रक्शन, नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु.८,०३,६००/- यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.५**

मनपाच्या पोर्णिमा नगर येथील दवाखान्यासाठी खरेदी करण्यात आलेले फर्निचर लोखंडी अलमारी मोठी, EXC.TABLE] Thrre easter] Fibure Chair, तपासणी टेबल, स्टुल इत्यादी साहित्य स्थानिक व्यापारी मे.झिनत मेटल इंडस्ट्रिज, नांदेड यांचेकडुन रास्त दराने खरेदी करण्यात आलेले आहे. सदरील साहित्य खरेदीसाठी रु.८५,९७२/- (अक्षरी रुपये पंच्याऐंशी हजार नऊशे बहात्तर फक्त) एवढा खर्च झालेला आहे.करिता उक्त रक्कमेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.११७** **ठराव**

**मनपाच्या पोर्णिमा नगर येथील दवाखान्यासाठी खरेदी करण्यात आलेले फर्निचर लोखंडी अलमारी मोठी,** EXC.TABLE] Thrre easter] Fibure Chair, **तपासणी टेबल, स्टुल इत्यादी साहित्य स्थानिक व्यापारी मे.झिनत मेटल इंडस्ट्रिज, नांदेड यांचेकडुन रास्त दराने खरेदी करण्यात आलेले आहे.** सदरील साहित्य खरेदीसाठी **रु.८५,९७२/-** (अक्षरी रुपये पंच्याऐंशी हजार नऊशे बहात्तर फक्त) एवढा खर्च झालेला आहे.करिता उक्त रक्कमेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.६**

मनपाच्या शिवाजीनगर येथील दवाखान्यासाठी खरेदी करण्यात आलेले साहित्य कुर्लोन बेड व्हाईट बेडशिट, पिलो, पिलो कव्हर, पायदान इत्यादी साहित्य स्थानिक व्यापारी **Kwality Cusion & Med Center** यांचेकडुन रास्त दराने खरेदी करण्यात आलेले आहे. सदरील साहित्य खरेदीसाठी रु.६९२००/- (अक्षरी रुपये एकोणसत्तर हजार दोनशे फक्त) एवढा खर्च झालेला आहे.करिता उक्त रक्कमेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. ११८** **ठराव**

**मनपाच्या शिवाजीनगर येथील दवाखान्यासाठी खरेदी करण्यात आलेले साहित्य कुर्लोन बेड व्हाईट बेडशिट, पिलो, पिलो कव्हर, पायदान इत्यादी साहित्य स्थानिक व्यापारी** Kwality Cusion & Med Center **यांचेकडुन रास्त दराने खरेदी करण्यात आलेले आहे**. सदरील साहित्य खरेदीसाठी **रु.६९२००/-** (अक्षरी रुपये एकोणसत्तर हजार दोनशे फक्त) एवढा खर्च झालेला आहे. करिता उक्त रक्कमेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.७**

श्री नि.सी.आढारी, सहसंचालक नगररचना हे मनपा कार्यालयात दि. 01.11.2010 ते दि.09.06.2011 पर्यंत सहा.संचालक, नगर रचना (प्रतिनियुक्ती) म्हणुन कार्यरत होते. त्यांचे कार्यरत कालावधीमधील सेवानिवृत्ती अंशदान रु.48830.00 (अक्षरी रुपये अठ्ठाळीस हजार आठशे तीस फक्त) व रजा वेतन अंशदान रु.870.00 (आठशे सत्तर फक्त) असे एकूण रु.49,707.00 (अक्षरी रुपये ऐकोणपन्नास हजार सातशे सात फक्त) जमा करण्यासाठी कार्यालयीन आदेश क्र.मनपा /लेवि/वेतन/6214/2015 दिनांक 11.08.2015 अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.११९** **ठराव**

श्री नि.सी.आढारी, सहसंचालक नगररचना हे मनपा कार्यालयात दि. 01.11.2010 ते दि.09.06.2011 पर्यंत सहा.संचालक, नगर रचना (प्रतिनियुक्ती) म्हणुन कार्यरत होते. त्यांचे कार्यरत कालावधीमधील सेवानिवृत्ती अंशदान रु.48830.00 (अक्षरी रुपये अठ्ठाळीस हजार आठशे तीस फक्त) व रजा वेतन अंशदान रु.870.00 (आठशे सत्तर फक्त) असे एकूण रु.49,707.00 (अक्षरी रुपये ऐकोणपन्नास हजार सातशे सात फक्त) जमा करण्यासाठी कार्यालयीन आदेश क्र.मनपा /लेवि/वेतन/6214/2015 दिनांक 11.08.2015 अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.व हा ठराव याच सभेत कायम करते.

**विषय क्र. ८**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी दिनांक.03.06.2015 रोजी स्थानिक संस्था कर योजना 2015 घोषीत केलेली आहे. त्यानुसार त्यांची अमंलबजावणी करणे सूचित केलेली आहे. सदर अभय योजना कालावधी दि.03.06.2015 ते 31.07.2015 पर्यंत

देण्यात आलेला आहे. सदर योजनेचा लाभ तात्काळ घेण्यासाठी अनपा हद्दीतील व्यापारी प्रतिष्ठाणांस माहिती व्हावी म्हणुन बॅनर लावणे, एम.सी.एन समाचार वर जाहिरात प्रसिध्द करणे इत्यादी कामावर खर्च झालेला आहे त्यांचे विवरण खालील प्रमाणे दिलेले आहे.

| अ.क्र. | खर्चाचे विवरण | देयक देणा-यांचे नाव | देयक क्र.व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | अभय योजना 2015 बाबत | एमसीएन समाचार नांदेड दर्पन | बिल क्र.305 दि.10.07.2015 | 10500/- |
| 2 | अभय योजना 2015 बाबत | गणेश डिजीटल प्रिटर्स | बिल क्र.3100 दि.13.07.2015 | 20.000/- |
| एकुण | | | | 30500/- |

करिता वरील बाबीसाठी झालेला खर्च रु.30.500/- (अक्षरी रुपये तीस हजार पाचशे फक्त) साठी कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१२०** **ठराव**

**महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी दिनांक.03.06.2015 रोजी स्थानिक संस्था कर योजना 2015 घोषीत केलेली आहे. त्यानुसार त्यांची अमंलबजावणी करणे सूचित केलेली आहे**. सदर अभय योजना कालावधी दि.03.06.2015 ते 31.07.2015 पर्यंत देण्यात आलेला आहे. सदर योजनेचा लाभ तात्काळ घेण्यासाठी अनपा हद्दीतील व्यापारी प्रतिष्ठाणांस माहिती व्हावी म्हणुन बॅनर लावणे, एम.सी.एन समाचार वर जाहिरात प्रसिध्द करणे इत्यादी कामावर खर्च झालेला आहे त्यांचे विवरण खालील प्रमाणे दिलेले आहे.

| अ.क्र. | खर्चाचे विवरण | देयक देणा-यांचे नाव | देयक क्र.व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | अभय योजना 2015 बाबत | एमसीएन समाचार नांदेड दर्पन | बिल क्र.305 दि.10.07.2015 | 10500/- |
| 2 | अभय योजना 2015 बाबत | गणेश डिजीटल प्रिटर्स | बिल क्र.3100 दि.13.07.2015 | 20.000/- |
| एकुण | | | | 30500/- |

करिता वरील बाबीसाठी झालेला खर्च रु.30.500/- (अक्षरी रुपये तीस हजार पाचशे फक्त) साठी कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र. ९**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका २६ जानेवारी २०१५ पोलीस परेड ग्राऊंड येथे Toilef तयार करणे बाबत कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांच्या अहवालानुसार सदर काम करणे आवश्यक असल्याने सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर एल.ऍन्ड एस. कंस्ट्रक्शन, नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले. त्यास रु.१२,५९,१००/- खर्च झालेला आहे.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर एल.ऍन्ड एस. कंस्ट्रक्शन, नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले. त्यास व कामावर झालेला खर्च रु.१२,५९,१००/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १२१** **ठराव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका २६ जानेवारी २०१५ पोलीस परेड ग्राऊंड येथे** Toilef **तयार करणे बाबत कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांच्या अहवालानुसार सदर काम करणे आवश्यक असल्याने** सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर **एल.ऍन्ड एस. कंस्ट्रक्शन, नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले. त्यास रु.१२,५९,१००/- खर्च झालेला आहे.कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर एल.ऍन्ड एस. कंस्ट्रक्शन, नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले. त्यास व कामावर झालेला खर्च **रु.१२,५९,१००/-** यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१०**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, चौकांना व रस्त्यांना सर्वसाधारण सभेने दिलेल्या ठराव क्र.१६० दि.०९.०१.२०१५ अन्वये प्रभाग क्र. १९ मध्ये १. वाघी रोड ते समिराबागला जाणा-या रस्यास कमी के.मकबुल रतलामी (शायर) मार्ग २. पक्कीचाळ ते खडकपुरा मुख्य रस्त्यास हाजी मोहम्मद पहेलवान मार्ग ३. बारा इमाम मस्जिद जवळील मोकळया जागेस कै.मो.असलम मौ.यासीन मैदान ४. रेल्वे पुलाला जाणा-या रोड लगतच्या मोकळया जागेस कै.सर सय्यद अहमद खान मैदान अशी नावे देणे बाबत मंजुरी देण्यात आली. सदर प्रकरणी या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन सदर काम तातडीने पुर्ण करणे गरजेचे असल्यामुळे जिल्हादर सूचि २०१४-२०१५ नुसार रु.१,१६,०००/- चे अंदाजपत्रक सादरकरुन सदर काम श्री एन.एन.भालेराव कंत्राटदार नांदेड यांचेकडुन करुन घेण्यात आले.कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री एन.एन.भालेराव कंत्राटदार नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले. त्यास व कामावर झालेला खर्च रु.१,१६,०००/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**उमेश पवळे** एक नावाचा बोर्ड तयार करण्यासाठी किती खर्च येतो ४ नावाचे बोर्ड लावण्यास रु.१,१६,०००/- खर्च करण्यात ला विषय क्र.१५ व एक नांवाचा बोर्ड लावण्यासाठी रु.२०.०००/- खर्च करण्यात आला यामध्ये फरक येत आहे

**का.अभियंता** विषय क्र.१० मधील असलेला नावाचे बोर्डाची क्वालीटी व दर्जा व विषय क्र.१५ मधील नावाचे बोर्डाची क्वालीटी दर्जा मध्ये फरक असल्यामूळे दर वेगवेगळे आहेत त्यामूळे हा फरक आहे.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १२२** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, चौकांना व रस्त्यांना सर्वसाधारण सभेने दिलेल्या ठराव क्र.१६० दि.०९.०१.२०१५ अन्वये प्रभाग क्र.१९ मध्ये १. वाघी रोड ते समिराबागला जाणा-या रस्यास कमी के.मकबुल रतलामी (शायर) मार्ग २. पक्कीचाळ ते खडकपुरा मुख्य रस्त्यास हाजी मोहम्मद पहेलवान मार्ग ३. बारा इमाम मस्जिद जवळील मोकळया जागेस कै.मो.असलम मौ.यासीन मैदान ४. रेल्वे पुलाला जाणा-या रोड लगतच्या मोकळया जागेस कै.सर सय्यद अहमद खान मैदान अशी नावे देणे बाबत मंजुरी देण्यात आली. सदर प्रकरणी या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन सदर काम तातडीने पुर्ण करणे गरजेचे असल्यामुळे जिल्हादर सूचि २०१४-२०१५ नुसार रु.१,१६,०००/- चे अंदाजपत्रक सादरकरुन सदर काम श्री एन.एन.भालेराव कंत्राटदार नांदेड यांचेकडुन करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री एन.एन.भालेराव कंत्राटदार नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले. त्यास व कामावर झालेला खर्च रु.१,१६,०००/- यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.११**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, विसावा नगर येथील १. कलंत्री यांचे घर ते उद्यान पर्यंत २. शक्करवार यांचे घर ते बगाळे यांचे घर ३. खेमका यांच्या घरासमोरील रस्ता ४. पाटणी ते रुबी हॉस्पीटल ५. गोकुळ यांचे घर ते चिद्रावार यांच्या घरापर्यंत डांबरी रस्ता करणे आवश्यक असल्याने कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता रस्ता करणे आवश्यक असून सदर सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे.शारदा कंस्ट्रक्शन, नांदेड यांचेकडुन करुन घेण्यात आले. त्यास रु.२९,४३,३००/- खर्च झालेला आहे. कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे.शारदा कंस्ट्रक्शन, नांदेड यांचेकडुन करुन घेण्यात आले. त्यास व कामावर झालेला खर्च रु.२९,४३,३००/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १२३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, विसावा नगर येथील १. कलंत्री यांचे घर ते उद्यान पर्यंत २. शक्करवार यांचे घर ते बगाळे यांचे घर ३. खेमका यांच्या घरासमोरील रस्ता ४. पाटणी ते रुबी हॉस्पीटल ५. गोकुळ यांचे घर ते चिद्रावार यांच्या घरापर्यंत डांबरी रस्ता करणे आवश्यक असल्याने कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता रस्ता करणे आवश्यक असून सदर सदरचे काम रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे.शारदा कंस्ट्रक्शन, नांदेड यांचेकडुन करुन घेण्यात आले. त्यास रु.२९,४३,३००/- खर्च झालेला आहे. कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे.शारदा कंस्ट्रक्शन, नांदेड यांचेकडुन करुन घेण्यात आले. त्यास व कामावर झालेला खर्च रु.२९,४३,३००/- यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.१२**

भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ६५ वा वर्धापना दिन समारंभ मुख्य शासकीय ध्वजा रोहनाचा कार्यक्रम दिनांक २६.०१.२०१५ रोजी पोलीस मुख्यलय नांदेड येथे साजरा करणेसाठी सदर ठिकाणी अतिमहत्वाच्या व्यक्ती करिता पुरेसे सोफासेट, पुरेश्या खुर्च्या व आसन व्यवस्था तसेच अवेळी पावसाची शक्यता लक्षात घेऊन वाटर प्रुफ शामीयाना इत्यादीची व्यवस्था करणेसाठी कार्यालयीन पत्र क्रं. साप्रवि/१८६८६/१५ दिनांक १५.०१.२०१५ अन्वये सहाय्यक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रं. ४ यांना आदेशीत करण्यात आले होते यानुसार सहाय्यक आयुक्त यांनी त्यांच्या दिनांक २४.०१.२०१५ च्या पत्रान्वये श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांना पत्र देऊन वरील नमुद केल्याप्रमाणे व्यवस्था करणेसाठी सुचीत केले होते. त्याप्रमाणे **श्री सहयोग सेवा, जुना मोंढा नांदेड** यांनी नमुद ठिकाणी मंडप, साईडींग, ग्रीन व रेड कार्पोट, सोफासेट चेअर व टेबल इत्यादउ ीची व्यवस्था करुन सदर कामाचे रु. २,२७,०२४/- चे देयक दाखल केले आहे.

करिता वरील प्रमाणे रु. २,२७,०२४/- च्या खचार्चस मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १२४** **ठराव**

भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ६५ वा वर्धापना दिन समारंभ मुख्य शासकीय ध्वजा रोहनाचा कार्यक्रम दिनांक २६.०१.२०१५ रोजी पोलीस मुख्यलय नांदेड येथे साजरा करणेसाठी सदर ठिकाणी अतिमहत्वाच्या व्यक्ती करिता पुरेसे सोफासेट, पुरेश्या खुर्च्या व आसन व्यवस्था तसेच अवेळी पावसाची शक्यता लक्षात घेऊन वाटर प्रुफ शामीयाना इत्यादीची व्यवस्था करणेसाठी कार्यालयीन पत्र क्रं. साप्रवि/१८६८६/१५ दिनांक १५.०१.२०१५ अन्वये सहाय्यक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रं. ४ यांना आदेशीत करण्यात आले होते यानुसार सहाय्यक आयुक्त यांनी त्यांच्या दिनांक २४.०१.२०१५ च्या पत्रान्वये श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांना पत्र देऊन वरील नमुद केल्याप्रमाणे व्यवस्था करणेसाठी

सुचीत केले होते. त्याप्रमाणे **श्री सहयोग सेवा, जुना मोंढा नांदेड** यांनी नमुद ठिकाणी मंडप, साईडींग, ग्रीन व रेड कार्पोट, सोफासेट चेअर व टेबल इत्यादठ‍ीची व्यवस्था करुन सदर कामाचे रु. २,२७,०२४/- चे देयक दाखल केले आहे.करिता वरील प्रमाणे रु. २,२७,०२४/- च्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानूमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.१३**

**प्रभाग क्रं. २२ मध्ये बडपुरा नांदेड या भागात मलनिस्सारण लाईन टाकणे** करिता उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन अंदाजपत्रक प्रचली म.जी.प्रा. दरसुचीनुसार रुपये ७,०५,४००/- (अक्षरी रुपये सात लक्ष पाच हजार चारशे फक्त) एवढा खर्च अपेक्षीत असुन **सोहेल कन्सट्रक्शन अन्ड स्टिलवर्कस, नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले आहे त्यास आयुक्त मनपा नांदेड यांनी दिनांक ०३.०१.२०१५ रोजी मान्यता प्रदान केली आहे. करिता सदरील कामावर होणारा खर्च रुपये ७,०५,४००/- (अक्षरी रुपये सात लक्ष पाच हजार चारशे फक्त) यास मलनिस्सारण प्रारंभीक कामे या लेखा शिर्षकातुन खर्च करण्यास कार्यात्तर प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्या करिता प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १२५** **ठराव**

**प्रभाग क्रं. २२ मध्ये बडपुरा नांदेड या भागात मलनिस्सारण लाईन टाकणे** करिता उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन अंदाजपत्रक प्रचली म.जी.प्रा. दरसुचीनुसार रुपये ७,०५,४००/- (अक्षरी रुपये सात लक्ष पाच हजार चारशे फक्त) एवढा खर्च अपेक्षीत असुन **सोहेल कन्सट्रक्शन अन्ड स्टिलवर्कस, नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले आहे त्यास आयुक्त मनपा नांदेड यांनी दिनांक ०३.०१.२०१५ रोजी मान्यता प्रदान केली आहे. करिता सदरील कामावर होणारा खर्च रुपये ७,०५,४००/- (अक्षरी रुपये सात लक्ष पाच हजार चारशे फक्त) यास मलनिस्सारण प्रारंभीक कामे या लेखा शिर्षकातुन खर्च करण्यास कार्यात्तर प्रशासकीय व आर्थीक मान्यता ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.१४**

**नावाशमनपा हद्दीत मुख्य प्रशाससकिय इमारती मधील विरोधी पक्षनेता कक्षाच्या बाजुला असलेल्या विश्रांती कक्षामध्ये बैठक रुम (मिटींग हॉल) करणे बाबत** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार रुपये २,४८,५००/- चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **श्री नितीन एन. भालेराव कंत्राटदार** नांदेड यांचेकडुन करुन घेण्यात आले. कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री नितीन एन. भालेराव कंत्र‍ाटदार नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. २,४८,५००/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मुजुरीसाठी प्रस्ताव मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१२६** **ठराव**

**नावाशमनपा हद्दीत मुख्य प्रशाससकिय इमारती मधील विरोधी पक्षनेता कक्षाच्या बाजुला असलेल्या विश्रांती कक्षामध्ये बैठक रुम (मिटींग हॉल) करणे करीता** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार रुपये २,४८,५००/- चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **श्री नितीन एन. भालेराव कंत्राटदार** नांदेड यांचेकडुन करुन घेण्यात आले.कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री नितीन एन. भालेराव कंत्र‍ाटदार नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. २,४८,५००/- यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.१५**

**नावाशमनपा गुरुव्दारा चौकास संत बाबा निधानसिंघजी चौक असे नामकरणाचा बोर्ड बसविणे बाबत** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार रुपये २०,०००/- चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **श्री एन एन. भालेराव कंत्राटदार नांदेड** यांचेकडुन करुन घेण्यात आले. कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री एन. एन. भालेराव कंत्राटदार नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. २०,०००/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मुजुरीसाठी प्रस्ताव मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १२७** **ठराव**

**नावाशमनपा गुरुव्दारा चौकास संत बाबा निधानसिंघजी चौक असे नामकरणाचा बोर्ड बसविणे करीता** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार रुपये २०,०००/- चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **श्री एन एन. भालेराव कंत्राटदार नांदेड** यांचेकडुन करुन घेण्यात आले. कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री एन.

एन. भालेराव कंत्राटदार नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च **रु. २०,०००/-** यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.१६**

**नावाशमनपा हद्दीत धुलीवंदन २०१५, हल्लाबोल व आंबेडकर जयंती कार्यक्रमा करिता बॅरीकेट व किरकोळ दुरुस्ती करणे व १४ एप्रिलसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा रंगरंगोटी करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार रुपये ५,८४,१००/- चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **श्री जुनैद अहेमद खान कंत्राटदार** यांचेकडुन करुन घेण्यात आले.

कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री जुनैद अहेमद खान कंत्राटदार यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ५,८४,१००/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मुजुरीसाठी प्रस्ताव मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१२८** **ठराव**

**नावाशमनपा हद्दीत धुलीवंदन २०१५, हल्लाबोल व आंबेडकर जयंती कार्यक्रमा करिता बॅरीकेट व किरकोळ दुरुस्ती करणे व १४ एप्रिलसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा रंगरंगोटी करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार रुपये ५,८४,१००/- चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **श्री जुनैद अहेमद खान कंत्राटदार** यांचेकडुन करुन घेण्यात आले.कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री जुनैद अहेमद खान कंत्राटदार यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च **रु. ५,८४,१००/-** यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.१७**

**नावाशमनपा हद्दीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त शहरातील रस्ते करणे करीता** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार रुपये ४,१६,२६०/- चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **विलायत खान करिम खान कंत्राटदार** यांचेकडुन करुन घेण्यात आले.

कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर विलायत खान करिम खान कंत्राटदार यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला **खर्च रु. ४,१६,२६०/-** यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मुजुरीसाठी प्रस्ताव मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १२९** **ठराव**

**नावाशमनपा हद्दीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त शहरातील रस्ते करणे करीता** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार रुपये ४,१६,२६०/- चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **विलायत खान करिम खान कंत्राटदार** यांचेकडुन करुन घेण्यात आले.

कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर विलायत खान करिम खान कंत्राटदार यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ४,१६,२६०/- यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.१८**

**दक्षिण नांदेड अंतर्गत येणारे सिडको जलशुध्दीकरण केंद्र येथून सिडको, हडको, वाघाळा शाहूनगर इत्यादी भागात या केंद्रातुन पाणी पुरवठा केला जातो या केंद्रातुन गेल्या कांही दिवसा पासुन क्लोरीफायर मध्ये गाळ जमा झालेला आहे** तो गाळ आज पर्यंत काढला जात नाही सदरील काम आवश्यक व महत्वाचे असल्याने **बी.जी. भास्कर गुत्तेदार** यांचेकडुन अंदाजपत्रकिय दरावर करुन घेण्यात आले त्यास अंदाजे रुपये १,९८,१६०/- खर्च अपेक्षीत असून त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे करिता सदरचा प्रस्ताव येत्या स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १३०** **ठराव**

**दक्षिण नांदेड अंतर्गत येणारे सिडको जलशुध्दीकरण केंद्र येथून सिडको, हडको, वाघाळा शाहूनगर इत्यादी भागात या केंद्रातुन पाणी पुरवठा केला जातो या केंद्रातुन गेल्या कांही दिवसा पासुन क्लोरीफायर मध्ये गाळ जमा झालेला आहे** तो गाळ आज पर्यंत काढला जात नाही सदरील काम आवश्यक व महत्वाचे असल्याने कामाची तातडी व निकड लक्षात घेवून सदरील काम **बी.जी. भास्कर गुत्तेदार** यांचेकडुन

अंदाजपत्रकिय दरावर करुन घेण्यात आले त्यास अंदाजे रुपये १,९८,१६०/- खर्च अपेक्षीत असून त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.१९**

**नांदेड शहराला पाणी पुरवठा करणा-या काबरानगर (६० MLD, ३५ MLD)** व असदवन (३५ **MLD**) जलशुध्दीकरण केंद्रातील क्लॅरिफ्लॉक्युलेटर मध्ये गाळ साचलेला आहे तो अजून काढण्यात आला नाही.

सदरील कामा करिता तीन वेळेस निविदा काढण्या आल्या होत्या त्यांना प्रतिसाद न मिळाल्यामुळे कामाची तातडी व आवश्यकता पाहता श्री जी.बी. भास्करे कंत्राटदार नांदेड यांच्याकडून MJP DSR च्या अंदाजपत्रकानुसार अंदाजे रु. ८०,२००/- खर्च अपेक्षीत आहे. त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणेसाठीचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**कार्यकारी अभियंता पापु** प्रस्तावात चुकीने ८०,२००/- टायपिंग झालेले आहे प्रत्येक्षात रुपये ८,०२,०६१/- असा खर्च झालेला आहे त्याप्रमाणे मान्यता देण्यात यावी.

**सभापती** दुरुस्तीनुसार कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१३१** **ठराव**

**नांदेड शहराला पाणी पुरवठा करणा-या काबरानगर (६० MLD, ३५ MLD)** व असदवन (३५ **MLD**) जलशुध्दीकरण केंद्रातील क्लॅरिफ्लॉक्युलेटर मध्ये गाळ साचलेला आहे तो अजून काढण्यात आला नाही.

सदरील कामा करिता तीन वेळेस निविदा काढण्या आल्या होत्या त्यांना प्रतिसाद न मिळाल्यामुळे कामाची तातडी व आवश्यकता पाहता श्री जी.बी. भास्करे कंत्राटदार नांदेड यांच्याकडून MJP DSR च्या अंदाजपत्रकानुसार अंदाजे रु. **८,०२,०६१/-** खर्च अपेक्षीत आहे. त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.२०**

नावाशमनपाकेच्या **स्टेडीयम परिसरातील इमारतीचे सांडपाणी व स्टेडीयम ग्राऊंड वरील पाऊस पाण्याचा निचरा करणेसाठी** MJP DSR नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे सदर काम करणेसाठी अंदाजे **रुपये ३८,७२,३६०/-** खर्च अपेक्षीत आहे.

स्टेडीयम ग्राऊंड अंतर्गत मैदानाचे काम अंतरराष्ट्रीय दर्जाचे काम प्रगतीपथावर आहे स्टेडीयम परिसरातील पाणी बाहेर काढणे आवश्यक व महत्वाचे आहे ड्रेनेज लाईनचे काम गोकुळनगर मेन लाईनला तातडीने जोडणे आवश्यक होते. सदरील काम **स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड** यांच्याकडून निविदा न मागविता अंदाजपत्रकीय दरावर करुन घेण्यात आले त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणेसाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १३२** **ठराव**

नावाशमनपाकेच्या **स्टेडीयम परिसरातील इमारतीचे सांडपाणी व स्टेडीयम ग्राऊंड वरील पाऊस पाण्याचा निचरा करणेसाठी** MJP DSR नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे सदर काम करणेसाठी अंदाजे **रुपये ३८,७२,३६०/-** खर्च अपेक्षीत आहे.

स्टेडीयम ग्राऊंड अंतर्गत मैदानाचे काम अंतरराष्ट्रीय दर्जाचे काम प्रगतीपथावर आहे स्टेडीयम परिसरातील पाणी बाहेर काढणे आवश्यक व महत्वाचे आहे ड्रेनेज लाईनचे काम गोकुळनगर मेन लाईनला तातडीने जोडणे आवश्यक असल्यामुळे कामाची तातडी व निकड लक्षात घेता सदरील काम **स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड** यांच्याकडून निविदा न मागविता अंदाजपत्रकीय दरावर करुन घेण्यात आले त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येते.

**विषय क्रं.२१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपाका योजने अंतर्गत क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. A, B, C, D अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती करिता रितसर निविदा ई-टेंडरिंग व्दारे व जाहिर वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्द केली असता क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. A तरोडा भागात पाणी पुरवठयासाठी ४ निविदा प्राप्त झाल्या व झोन क्रं. B, C, D प्रत्येकी झोनसाठी (तीन) निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदे पैकी निविदा धारकांनी निविदेत भरलेले दर १२ ते १३% जास्त दराने दिले होते. सदरील दर जास्त वाटत असल्याने मा. आयुक्त यांच्या कक्षात प्रत्यक्ष फेर वाटाघाटी करुन रकाना क्रं. ३ नुसार सर्वात कमी दराची निविदा सर्व झोन निहाय रकाना क्रं. ३ मध्ये दर्शविलेले दर अंतिम करण्यात आले आहेत. करिता खालील दर्शविलेल्या तक्त्यानुसार झोन क्रं. A साठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.९१% जास्त दराने व झोन क्रं. B, C, D साठी ६% जास्त दराने मान्य करुन त्यांचे लेखी संमती पत्रानुसार निविदा अंतीम करण्यात आले आहे.

| झोन क्रं. | निविदा किमंत | वाटाघाटी अंती मंजुर केलेले दर | त्यानुसार मंजुर निविदा किमंत | कंत्राटादाराचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. A तरोडा (बु. खु. व सांगवी) ( पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती ) | ४४,७२,०५०/- | ५.९१% जास्त | ४७,३६,३४८/- | बालाजी भास्करे, नांदेड |
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. B अशोकनगर/ शिवाजीनगर (पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती) | ४४,७२,०५०/- | ६.००% जास्त | ४७,४०,३७३/- | इंद्रजा कंस्ट्रक्शन उस्मानाबाद |
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. C इतवारा / वजीराबाद ( पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती ) | ६८,५५,०००/- | ६.००% जास्त | ७२,६६,३००/- | ईश्वरदास अँड कंपनी नांदेड |
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. D सिडको ( पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती ) | ४९,२३,१३९/- | ६.००% जास्त | ५२,१८,५२७/- | डी. एम. पाटील नांदेड |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. B अशोकनगर / शिवाजीनगर ( मलनिस्सासरण देखभाल दुरुस्ती ) | ५६,३५,९००/- | ६.००% जास्त | ५९,७४,०५४/- | सोहेल कन्सट्रक्शन नांदेड |
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. C इतवारा / वजीराबाद ( मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती ) | ८०,९५,६५०/- | ६.००% जास्त | ८५,८१,३८९/- | स्वान इन्फ्रा नांदेड |
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. D सिडको ( मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती ) | ४७,३६,४३८/- | ६.००% जास्त | ५०,२०,६२४/- | डी. एम. पाटील नांदेड |

वरील प्रमाणे तुलनात्मक तक्त्यानुसार क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. A, B, C, D मध्ये रकाना क्रं. ५ मधील निविदा धारकांचे दर चालु दरसुचिनुसार तुलना केली असता अंदाजपत्रकिय दरापेक्षा दर कमीच येत आहेत. करिता पाणी पुरवठा व मलनिस्सारणच्या कामाची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा ६.००% जास्त दराने मान्य करणेसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. तसेच रकाना क्रं. ४ मधील मान्य केलेल्या दरास पाणी पुरवठा व मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती अंतर्गत लाणा-या खर्चास मंजुर निविदा किमंतीनुसार प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यास प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेकरिता सादर तसेच मान्य केलेले दर करारनाम्याच्या दिनांका पासुन एक वर्षा पर्यंत अमलात राहतील.

**संजय मोरे** सिडको हडको झोनमध्ये पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीचे काम ब-याच वर्षापासुन श्री डिएम पाटील या एकाच गुत्तेदाराकडे आहे. सिडको झोन भागात अनेक ठिकाणी पाण्याची पाईप लाईन फुटून विनाकारण पाणी रस्त्यावरुन हजारो लिटर पाणी वाहून जात आहे. प्रत्येक ठिकाणी वॉल लिकेजेस आहेत .मी या सदंर्भात संबंधित अभियंत्यास दि.७.६.२०१४ व १४.११.२०१४ ला तक्रार केलेली आहे. गुत्तेदाराकडे कामगार नाहीत भैटल्यावर काम करु असे उडवाउडवीचे उत्तरे देत आहेत कुठेही जुनी नविन वॉल दुरुस्ती न करता बिल बनत आहे. दि.१.१२.२०१३ ते दि.३१.७.२०१४ या आठ महिण्याचे बिल रु.२१,७४,३०० व दि. १.८.२०१५ ते दि.३१.३.२०१५ या सात महिण्याचे रु.२१,१९,२०० चालू वर्षाचे जवळपास रु.८३.०० लाखाचे बिले तयार करण्यात आलेली आहे. श्री डि. एम. पाटील हे पाणी पुरवठा मलनिस्सारणाची वार्षिक देखभाल व दुरुस्ती अतर्गतची कामे न करता बिलाची रक्कम वाढवित आहेत, आज आर्थिक परिस्थितीमुळे महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना दोन दोन महिणे पगार देण्यात येत नाही.सफाई कंत्राटदारर देयका अभावी शहराची साफसफाई करण्यास तयार नाही.सिडको भागातील नवु नगसेवकांनी श्री डि.एम,पाटील यांनी केलेल्या कमाची चौकशी करण्यासाठी नगरसेवकांची एक चौकशी समिति गठित करावी असा ठराव सर्वसाधारण सभेत मांडलेला आहे. माझी सभागृहास विनंती आहे की, सिडको भागातील पाणी पुरवठा व देखभालीची ६टक्के जास्त दराची कामे डी.एम.पाटलांना देण्यात येवू नये.त्यांना काम देण्याचा विषय प्रंलबित ठेवण्यात यावा. या कामाची निविदा रध्द करुन नव्याने निविदा मागविण्यात याव्यात हा विषय प्रलंबित ठेवण्यात यावा.या गुत्तेदाराचे नाव काळया यादीत टाकण्यात यावे अशी आमची मागणी आहे.

**उपआयुक्त पापु** एखाद्या कामासाठी ओपन टैन्डर मागविण्यात आल्यानंतर मान्यता प्राप्त कंत्राटदाराना निविदा खरेदी करण्याचा निविदा भरण्याचा अधिकार आहे त्यांना निविदा भरण्यास कसे रोकता येईल. मात्र महानगरपालिकेने कंत्राटदारास काळया यादीत टाकण्याचा निर्णय घेतला असेल तर त्यास निविदाही विक्री करता येत नाही व त्यांचा निविदाही स्विकारता येत नाही. संबंधित कंत्राटदाराकडुन दिलेल्या कामाचे आदेशा प्रमाणे काम करुन घेणे त्यांचे कामावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.संबंधित कंत्राटदाराने केलेल्या कामात अनियमितता केली असेल तर त्यांचे कामाची चौकशी करता येईल.ओपन निविदा मागविण्यात आल्यानंतर निविदाच्या तुलनात्मक पत्रकानुसार कोणाची निविदा मंजुर करावयाची यावर निर्णय घेण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे ,तुलनात्मक पत्रकानुसार सर्वात कमी दराची निविदा का ना मंजुर करावयाची याची कारणे स्थायी समितीला ठरावात नमूद करावी लागतील. विषयांकिंत प्रस्तावावर स्थायी समितीने योग्य तो निर्णय घ्यावा.

**संजय मोरे** दिड वर्षापासून दुरुस्तीची कामे करणेसाठी अर्ज देत आहे परंतु कामे झालेली नाही.नागरीकांनी आम्हाला प्रभागातील सार्वजनिक कामे करण्यासाठी निवडून दिलेले आहे त्यांची कामे होत नाही. आमच्या अर्जाला केराची टोपली दाखविण्यात येत आहे.हा कंत्राटदार कोणतीच कामे करीत नसल्यामूळे ते आम्हाला चालत नाही.डी.एम.पाटील यांचा निविदा मंजुर करण्याचा विषय स्थगित ठेवण्यात यावा.

**किशोर यादव** वार्षिक देखभाल दुरुस्तीचे कामे कंत्राटदारास देण्यात येत असल्यामूळे प्रभागातील चेंबर बदलणे,ड्रेनेज चोकअप काढणे, लिकेजेस बंद करणे, छोटीमोठी पाईप लाईन टाकणे, मुरुम टाकून रस्त्याची खडे बुजविणे इत्यादी कामे लवकर होतात त्यामूळे नागरीकांना त्रास होत नाही. शहरातील कामे आपणास करुन घ्यावयाच आहेत त्यामूळे या विषयास सर्वाच्या संमत्तीने मान्यता देण्यात यावी.

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१३३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपाका योजने अंतर्गत क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. A, B, C, D अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती करिता रितसर निविदा ई-टेंडरिंग व्दारे व जाहिर वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्द केली असता क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. A तरोडा भागात पाणी पुरवठयासाठी ४ निविदा प्राप्त झाल्या व झोन क्रं. B, C, D प्रत्येकी झोनसाठी (तीन) निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदे

पैकी निविदा धारकांनी निविदेत भरलेले दर १२ ते १३% जास्त दराने दिले होते. सदरील दर जास्त वाटत असल्याने मा. आयुक्त यांच्या कक्षात प्रत्यक्ष फेर वाटाघाटी करुन रकाना क्रं. ३ नुसार सर्वात कमी दराची निविदा सर्व झोन निहाय रकाना क्रं. ३ मध्ये दर्शविलेले दर अंतिम करण्यात आले आहेत. करिता आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार खालील दर्शविलेल्या तक्त्यानुसार झोन क्रं. A साठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.९१% जास्त दराची व झोन क्रं. B, C, D साठी ६% जास्त दराची निविदा खालील अटी व शर्तीनुसार मान्य करुन त्यांचे लेखी संमती पत्रानुसार निविदा अंतीम करण्यात आले आहे.

| झोन क्रं. | निविदा किमंत | वाटाघाटी अंती मंजुर केलेले दर | त्यानुसार मंजुर निविदा किमंत | कंत्राटादाराचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. A तरोडा (बु. खु. व सांगवी) ( पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती ) | ४४,७२,०५०/- | ५.९१% जास्त | ४७,३६,३४८/- | बालाजी भास्करे, नांदेड |
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. B अशोकनगर/ शिवाजीनगर (पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती) | ४४,७२,०५०/- | ६.००% जास्त | ४७,४०,३७३/- | इंद्रजा कंस्ट्रक्शन उस्मानाबाद |
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. C इतवारा / वजीराबाद ( पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती ) | ६८,५५,०००/- | ६.००% जास्त | ७२,६६,३००/- | ईश्वरदास अँड कंपनी नांदेड |
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. D सिडको ( पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती ) | ४९,२३,१३९/- | ६.००% जास्त | ५२,१८,५२७/- | डी. एम. पाटील नांदेड |
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. B अशोकनगर / शिवाजीनगर ( मलनिस्सासरण देखभाल दुरुस्ती ) | ५६,३५,९००/- | ६.००% जास्त | ५९,७४,०५४/- | सोहेल कन्सट्रक्शन नांदेड |
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. C इतवारा / वजीराबाद ( मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती ) | ८०,९५,६५०/- | ६.००% जास्त | ८५,८१,३८९/- | स्वान इन्फ्रा नांदेड |
| क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. D सिडको ( मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती ) | ४७,३६,४३८/- | ६.००% जास्त | ५०,२०,६२४/- | डी. एम. पाटील नांदेड |

आयुक्तानी सादर केलेल्या प्रस्तावानुसार वरील प्रमाणे तुलनात्मक तक्त्यानुसार क्षेत्रीय कार्यालय झोन क्रं. B, C, D मध्ये रकाना क्रं. ५ मधील निविदा धारकांचे दर चालु दरसुचिनुसार तुलना केली असता अंदाजपत्रकिय दरापेक्षा दर कमीच येत आहेत. झोन क्रं. B, C, D करिता पाणी पुरवठा व मलनिस्सारणच्या कामाची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा ६.००% जास्त दराची व झोन क्रं. A, ची पाणी पुरवठा व देखभाल दुरुस्तीची ५.९१% जास्त दराची निविदा मंजुर करण्यास ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते. तसेच रकाना क्रं. ४ मधील मान्य केलेल्या दरास पाणी पुरवठा व मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती अंतर्गत लागणा-या खर्चास मंजुर निविदा किमंतीनुसार प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही नांवामना स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते तसेच मान्य केलेले दर करारनाम्याच्या दिनांका पासुन एक वर्षा पर्यंत अमलात राहतील असेही ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.२२**

मनपा हद्दीत **गोविंदनगर भागात मलवाहीनी टाकणे करिता** कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी स्थळाची प्रत्यक्ष पाहणी करुन **रुपये ३,८४,५००/-** चे DSR च्या मंजुर दरा प्रमाणे अंदाजपत्रक सादर केले आहे.सदरील काम **मे. इंद्रजा कन्सट्र. नांदेड** यांच्याकडून गोविंदनगर भागाचे Outlet हे Manhole ला जोडण्यात आले. कारण त्या भागात मा. मुख्यमंत्री यांच्या फंडाजून **नविन सी.सी. रोड तयार करणे** करिता सदरील भागातील मलनिस्सारण वाहीनीचे काम निविदा न मागविता अंदाजपत्रकीय दरावर तातडीने करुन घेण्यात आले त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे करिता सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**विनय गुर्रम** — माझ्या प्रभागात रस्ते व नालीची कामे करण्यात आली परंतु रस्ते खाली झाले नाल्या उंच झाल्या तसेच नाल्याचा उतार काढण्यात आलेला नसल्यामूळे यानाल्याव्दारे पाण्याचा निचरा होत नाही जागो जागी पाणी सांचुन रस्त्यावरुन धाण वाहत आहे. अंतर्गत मलनिस्सारण लाईन टाकण्यात आल्या परंतु त्यांचे क्रास कनेक्शन देण्यात आलेले नाही. जागो जागो मलनिस्सारण लाईन चोकअप होत आहे. १०० फुटाच्या नाल्यामध्ये क्रास कनेक्शन देण्यासाठी किती वेळ लागतो. यासंदर्भात मी मागील तीन वर्षापासुन लेखी पत्र देत आहे परंतू आज पर्यत त्याची दखल घेण्यात आलेली नाही. अशी अत्यावश्यक मलनिस्सारणाची पाणी पुरवठयाची कामे प्राधान्याने का करण्यात येत नाही.

**का.अभियता मलनिस्सारण** — श्री विनय गुर्रम यांच्या तक्रारीची दखल घेवून दोन दिवसात त्यांची कामे पुर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**अ.हबीब बागवान** — आमचे प्रभागातील विविध भागात बिएसयुपी योजने अंतर्गत घराचे बांधकाम करण्यात आले असून नागरी सुविधाची जी रस्ते,नाल्या, पाणी पुरवठा व मलनिस्सारण लाईन ई.जी कामे करण्यात आली ती लेव्हल न काढता चुकीची करण्यात आल्यामूळे याभागातील रस्त्यावर नाल्याचे व ड्रेनेजचे पाणी वाहत आहे.जागोजागी ड्रेनेज लाईन चोकअप होत आहे.घरे खाली व रस्ते,नाल्याचे बांधकाम उंच बांधकाम करण्यात आल्यामूळे

नागरीकांच्या घरात पाणी जात आहे. त्यामूळे ज्या कंत्राटदारानी ही कामे केलेली आहेत त्यांना ब्लक लिस्ट मध्ये टाकण्यात यावी. अंतर्गत टाकण्यात आलेल्या भूमिगत मलनिस्सारण लाईनचे मुख्य लाईन ला क्रॉस कनेक्शन दिले तर आमच्या प्रभागातील समस्या सुटू शकेल.आयुक्त साहेबांनी क्रॉस कनेक्शन देण्यासाठी मान्यता दिलेली आहे त्वरील क्रॉस कनेक्शन देण्यात यावे.क्रॉस कनेक्शन का देण्यात येत नाही.

**उपआयुक्त (पापु व मलनि)** ब्रम्हपुरी भागात एकाच वेळी बिएसयुपी योजने अंतर्गत घराचे बांधकाम ,त्यांना लागणा-या नागरी सुविधा जसे रस्ते, नाल्या, पाणी पुरवठा व मलनिस्सारण पाईप लाईन टाकणे ई.कामे सुरु करण्यात आल्यामूळे या समस्या निर्माण झालेल्या आहेत. काही कंत्राटदार काम करण्यास तयार नाही ,आयुक्त साहेबांनी यासदर्भात संबंधित कंत्राटदाराची बैठक घेतलेली असून ८० लक्षाची क्रॉस कनेक्शची कामे करण्यासाठी मान्यता दिलेली आहे.उद्यापासून कामे सुरु करण्यात येतील. जे कंत्राटदार मंजुर दराप्रमाणे कामे करण्यास तयार नाही त्याचे विरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. अंतर्गत मलनिस्सारण लाईन टाकण्याची कामे पुर्ण करण्यात आली परंतु अंतर्गत लाईनचे मुख्य मलवाहिणीस क्रॉस कनेक्शन देणार नाही तोपर्यत ड्रेनेजचा प्रश्न सुटणार नाही. शहरातील मोठ मोठे नांल्याची कामे करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या अटल अमृत योजनेत समावेश करण्यात येत आहे.

**सभापती** शहरात अंतर्गत टाकण्यात आलेल्या मलनिस्सारण लाईनचे मुख्य लाईनला क्रॉस कनेक्शन देण्याची कार्यवाही लवकरात लवकर करण्यात यावी. विषयांकित प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१३४** **ठराव**

मनपा हद्दीत **गोविंदनगर भागात मलवाहीनी टाकणे करिता** कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी स्थळाची प्रत्यक्ष पाहणी करुन **रुपये ३,८४,५००/-** चे DSR च्या मंजुर दरा प्रमाणे अंदाजपत्रक सादर केले आहे.

सदरील काम **मे. इंद्रजा कन्सट्र. नांदेड** यांच्याकडून गोविंदनगर भागाचे Outlet हे Manhole ला जोडण्यात आले. कारण त्या भागात मा. मुख्यमंत्री यांच्या फंडातून **नविन सी.सी. रोड करावाचा असल्यामूळे कामाची तातडी लक्षात घेता** सदरील भागातील मलनिस्सारण वाहीनीचे काम निविदा न मागविता अंदाजपत्रकीय दरावर तातडीने करुन घेण्यात आले त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.२३**

मनपा हद्दीत सार्वजनिक पथदिव्यांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती व पथदिवे दैनंदिन चालू बंद करणे (ज्या पाईटसवर मनपा तर्फे टायमर बसविण्यात आले ते पाईटस वगळुन) या कामाची निविदा सुचना क्रमांक NWCMCM(ELECT)E Tender/६६३१/२०१५-१६ नुसार व मनपाकेच्या जाहिरातीच्या रोटेशन रजिस्टरच्या नोंद नुसार दैनिंक सामना औरंगाबाद व दैनिक प्रजावाणी नांदेड मध्ये दिनांक २५.०८.२०१५ च्या अंकात प्रसिध्द करुन Online निविदा दर मागविण्यात आले असता या कामासाठी एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त निविदाधारकांनी मागणी केलेल्या सर्व प्रमाणपत्र सादर केले असल्यामुळे त्यांचे Commercial documents उघडण्यात आले आहेत व प्राप्त दरांचे तुलनात्मक तक्त्यानुसार मे. सोनू इलेक्ट्रीकल्स नागपूर यांनी सादर केलेल्या दरानुसार या कामासाठी वार्षिक खर्च रुपये १,४६,८३,९०१/- एवढा खर्च लागणार होता व सदर खर्च महाराष्ट्र शासनाने सा.बा. विधुत विभागच्या चालु दर सुची २०१३-१४ दरानुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरानुसार या कामासाठी लागणारा वार्षिक खर्चपेक्षा ६.१% जास्त रक्कमेची असल्यामुळे **मे. सोनु इलेक्ट्रीकल्स नागपुर** यांना दर कमी करणेसाठी वाटाघाटी करणेसाठी बोलविण्यात आले असता संबंधीत हे वाटाघाटीसाठी उपस्थित राहून वाटाघाटी अंती सदरील काम अंदाजपत्रक दरापेक्षा ३% जास्त दराने म्हणजे खालील प्रमाणे रकाना क्रमांक २ मधील कामासाठी रकाना क्रमांक ४ मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे दराने सदरील काम करणेसाठी लेखी संमती दिलेली आहे.

| अ.क्र. | पथदिव्याचे प्रकार / कामाचे प्रकार | संख्या | मे. सोनु इलेक्ट्रीकल्स नागपुर यांनी वाटाघटी अंती दर कमी करुन मान्य केलेले दर रुपये | एकूण वार्षिक खर्च रुपय |
|---|---|---|---|---|
| १ | ३६ व्हॅट टयुबलाईट | ६६६२ | ३९२.०१५ प्रतिनग प्रति वर्ष | २६,११,६०४/- |
| २ | १२५ व्हॅट मरक्युरी | ६९७ | ७३२.२९० प्रतिनग प्रति वर्ष | ५,१०,४०६/- |
| ३ | ७० व्हॅट सोडियम | २७६४ | ८९९.४४५ प्रतिनग प्रति वर्ष | २४,८६,०६६/- |
| ४ | १५० व्हॅट सोडियम | ४०७७ | १०९१.४६५ प्रतिनग प्रति वर्ष | ४४,४९,९०३/- |
| ५ | २५० व्हॅट सोडियम | १७७ | १२९९.८५७ प्रतिनग प्रति वर्ष | २,३०,०७५/- |
| ६ | ४०० व्हॅट सोडियम | ८० | १४९४.५१९ प्रतिनग प्रति वर्ष | १,१९,५६२/- |
| ७ | ७० व्हॅट मेटल | १७ | १९७८.१७८ प्रतिनग प्रति वर्ष | १८,३२९/- |
| ८ | १५० व्हॅट मेटल | ६२ | ११८१,१५१ प्रतिनग प्रति वर्ष | ७३,२३१/- |
| ९ | २५० व्हॅट मेटल | ७० | १५७४.०४० प्रतिनग प्रति वर्ष | १,१०,१८३/- |
| १० | ४०० व्हॅट मेटल | ८० | १७२०.०२७ प्रतिनग प्रति वर्ष | १,३७,६०२/- |
| ११ | १x३६ व्हॅट सीएफएल स्वतंत्र चौक | ३०६ | ४२६.९०३ प्रतिनग प्रति वर्ष | १,३०,६३२/रु- |
| १२ | १x३६ व्हॅट सीएफएल | ८९१ | ४९६.९८८ प्रतिनग प्रति वर्ष | ४,४२,८१६/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | २x२४ व्हॅट टी-५ | १८९६ | ६४३.४२९ प्रतिनग प्रति वर्ष | १२,१९,९४१/- |
| १४ | ४x२४ व्हॅट टी-५ | ११८४ | १२८६.८५९ प्रतिनग प्रति वर्ष | १५,२३,६४१/- |
| १५ | पथदिवे दैनंदिन चालू बंद करणे | ३८० | ३५८.६९७ प्रतिपाईट प्रति वर्ष | १,३६,३०५/- |
| १६ | मनपाकेने पुरवठा केलेले नविन पथदिवा खांबावर बसवुन देणे | ०१ | ४०.९९४ प्रति नग | ४०.९९४ |
| १७ | डिजीटल टायमर | ०१ | ७४२९.३९ प्रति नग | ७४२९.३९ |
| १८ | टायमर | ०१ | २२२३.७७ प्रति नग | २२२३.७७ |
| १९ | कॉन्टॅक्टर | ०१ | ३६०९.१२ प्रति मीटर | ३६०९.१२ |
| २० | Cable २ x १० Sqmm | ०१ | १४१.११ प्रति मीटर | १४१.११ |
| २१ | Cable ४ x ६ Sqmm | ०१ | १५४.५ प्रति मीटर | १५४.५ |
| २२ | Cable ४ x १० Sqmm | ०१ | १७६.१३ प्रति मीटर | १७६.१३ |
| २३ | Cable ४ x १६ Sqmm | ०१ | २००.८५ प्रति मीटर | २००.८५ |
| २४ | MCCB १०० A | ०१ | ५०२३.३१ प्रति मीटर | ५०२३.३१ |
| २५ | MCCB ३२ A | ०१ | १८०.२५ प्रति मीटर | १८०.२५ |
| २६ | LEED Street Light दुरुस्ती करुन देणे | ०१ | ३०९०/- प्रति नग | ३०९०/- |
| २७ | नविन ९०w LED Street Light पुरवठा करुन बसविणे | ०१ | २९०२२.३१ प्रति नग | २९०२२.३१ |
| | | | | **१,४२,५१,५८८/-** |

वरील प्रमाणे प्राप्त दरानुसार मनपा हद्यीतील सार्वजनिक पथदिव्यांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे (दुरुस्तीच्या कामात लागणारे विधुत साहित्य व मजुर खर्चसह) व पथदिवे दैनंदिन चालू बंद करणे (ज्या पाईटसवर मनपा तर्फे टायमर बसविण्यात आले ते पाईटस वगळुन) या कामासाठी वरील प्रमाणे लागणारा **वार्षिक खर्च रुपये १,४२,६१,५८८/- या प्रमाणे ३ वर्षा करिता खर्च रुपये ४,२७,५४,७६४/- अपेक्षीत आहे.** करिता लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणेसाठी व निविदा मंजुरीसाठीचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विनय गुर्रम** प्राप्त झालेले इलेट्रीकल साहित्याचे दर हे मार्कट रेटशी मिळते जूळते आहे किंवा नाही याचा अभ्यास करणे आवश्यक आहे त्यामूळे सदरचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा.

**संजय मोरे** श्री विनय गुर्रम यानी मांडलेल्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे. तुर्त हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**सभापती** श्री विनय गुर्रम यानी मांडलेल्या प्रस्तावा प्रमाणे प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्रं.१३५** **ठराव**

मनपा हद्यीत सार्वजनिक पथदिव्यांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती व पथदिवे दैनंदिन चालू बंद करणेचे कामासाठी निविदा मंजुरीचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्रं.२४**

**नावाशमनपा हद्यीतील प्रभाग क्रं. २६ मधील प्लॉट क्रं. ६२ व हमीदीया कॉलनी ड्रेनेज लाईनच्या खोदकामा मुळे नादुरुस्त झालेले रस्ते दुरुस्त करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार **रुपये ५,१०,९९५/-** चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **मे. कामारीकर कंस्ट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षा तघेता सदरचे काम विना निविदा रास्त रध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. कामारीकर कंस्ट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ५,१०,९९५/- यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठीचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता देवून हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १३६** **ठराव**

**नावाशमनपा हद्यीतील प्रभाग क्रं. २६ मधील प्लॉट क्रं. ६२ व हमीदीया कॉलनी ड्रेनेज लाईनच्या खोदकामा मुळे नादुरुस्त झालेले रस्ते दुरुस्त करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार **रुपये ५,१०,९९५/-** चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **मे. कामारीकर कंस्ट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षा तघेता सदरचे काम विना निविदा रास्त रध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. कामारीकर कंस्ट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ५,१०,९९५/- यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.२५**

नावाशमनपा नांदेड अंतर्गत विविध विभागाचे संरक्षण करण्यासाठी कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/७९७६/१४ दि. २३.०७.१४ अन्वये मे. कलोटी, सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेले (५२) सुरक्षारक्षकांच्या सेवेस माहे ०१.०५.२०१४ ते ३०.०४.२०१५ या कालावधीसाठी पुर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुदतवाढ देण्यात आली सदर आदेशांची नोंद स्थायी समिती सभेत घेण्यात आली.

उपरोक्त मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेल्या सुरक्षकांची मुदतवाढ दि. ३०.०४.१५ रोजी संपली असल्यामुळे नवीन सुरक्षारक्ष पुरवठा करण्यासाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेली असुन सदर प्रक्रिया पुर्ण होवुन नवीन सुरक्षा एजन्सीकडून पुरवठा करण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीस कालावधी लागणार असल्यामुळे दिनांक ०१.०५.१५ ते ३१.०५.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/१७७३/१५ दि. ११.०५.१५ अन्वये दिनांक ०१.०६.१५ ते ३०.०६.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/२९८०/१५ दिनांक ०२.०६.१५ अन्वये व दि. ०१.०७.१५ ते दि. ३१.०७.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/४९९८/१५ दि. १५.०७.१५ अन्वये मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेल्या सुरक्षारक्षकांच्या सेवेस मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती सभे समोर निर्णयास्तव ठेवण्यात आले होते त्यानुसार स्थायी समिती मनपा नांदेड यांचे आयोजीत बैठक दि. ३०.०७.१५ ठराव क्रं. ५६, ५७ व १०३ अन्वये उक्त (३) ही महिण्याच्या मुदतवाठीस मंजुरी देण्यात आलेली आहे. तरी नव्याने मागविण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या पुनश्चः कार्यालयीन निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साप्रवि/ई-निविदा /८०७७/१५ दिनांक २२.०९.२०१५ अन्वये चौथ्यांदा प्रसिध्दी देण्यात आलेली असुन सदर निविदेच्या अनुषंगाने (४) निविदा विक्री झाल्या आहेत पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुरच्या सुरक्षारक्षकांच्या सेवेत पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार दिनांक ०१.०८.१५ ते ३१.१०.१५ या तीन महिण्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्या करिता प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर निर्णयास्तव ठेवण्यात येते.

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

नावाशमनपा नांदेड अंतर्गत विविध विभागाचे संरक्षण करण्यासाठी कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/७९७६/१४ दि. २३.०७.१४ अन्वये मे. कलोटी, सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेले (५२) सुरक्षारक्षकांच्या सेवेस माहे ०१.०५.२०१४ ते ३०.०४.२०१५ या कालावधीसाठी पुर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुदतवाढ देण्यात आली सदर आदेशांची नोंद स्थायी समिती सभेत घेण्यात आली.

उपरोक्त मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेल्या सुरक्षकांची मुदतवाढ दि. ३०.०४.१५ रोजी संपली असल्यामुळे नवीन सुरक्षारक्ष पुरवठा करण्यासाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेली असुन सदर प्रक्रिया पुर्ण होवुन नवीन सुरक्षा एजन्सीकडून पुरवठा करण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीस कालावधी लागणार असल्यामुळे दिनांक ०१.०५.१५ ते ३१.०५.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/१७७३/१५ दि. ११.०५.१५ अन्वये दिनांक ०१.०६.१५ ते ३०.०६.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/२९८०/१५ दिनांक ०२.०६.१५ अन्वये व दि. ०१.०७.१५ ते दि. ३१.०७.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/४९९८/१५ दि. १५.०७.१५ अन्वये मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेल्या सुरक्षारक्षकांच्या सेवेस मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती सभे समोर निर्णयास्तव ठेवण्यात आले होते त्यानुसार स्थायी समिती मनपा नांदेड यांचे आयोजीत बैठक दि. ३०.०७.१५ ठराव क्रं. ५६, ५७ व १०३ अन्वये उक्त (३) ही महिण्याच्या मुदतवाठीस मंजुरी देण्यात आलेली आहे.

तरी नव्याने मागविण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या पुनश्चः कार्यालयीन निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साप्रवि/ई-निविदा /८०७७/१५ दिनांक २२.०९.२०१५ अन्वये चौथ्यांदा प्रसिध्दी देण्यात आलेली असुन सदर निविदेच्या अनुषंगाने (४) निविदा विक्री झाल्या आहेत पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुरच्या सुरक्षारक्षकांच्या सेवेत पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार दिनांक ०१.०८.१५ ते ३१.१०.१५ या तीन महिण्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे योग्य राहील.

**सभापती** आयुक्तांच्या प्रस्तावानुसार मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१३७** **ठराव**

नावाशमनपा नांदेड अंतर्गत विविध विभागाचे संरक्षण करण्यासाठी कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/७९७६/१४ दि. २३.०७.१४ अन्वये मे. कलोटी, सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेले (५२) सुरक्षारक्षकांच्या सेवेस माहे ०१.०५.२०१४ ते ३०.०४.२०१५ या कालावधीसाठी पुर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुदतवाढ देण्यात आली सदर आदेशांची नोंद स्थायी समिती सभेत घेण्यात आली.

उपरोक्त मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेल्या सुरक्षकांची मुदतवाढ दि. ३०.०४.१५ रोजी संपली असल्यामुळे नवीन सुरक्षारक्ष पुरवठा करण्यासाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेली असुन सदर प्रक्रिया पुर्ण होवुन नवीन सुरक्षा एजन्सीकडून पुरवठा करण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीस कालावधी लागणार असल्यामुळे दिनांक ०१.०५.१५ ते ३१.०५.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/१७७३/१५ दि. ११.०५.१५ अन्वये दिनांक ०१.०६.१५ ते ३०.०६.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/२९८०/१५ दिनांक ०२.०६.१५ अन्वये व दि. ०१.०७.१५ ते दि. ३१.०७.१५ या कालावधीसाठी कार्यालयीन प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/४९९८/१५ दि. १५.०७.१५ अन्वये मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुर यांनी पुरवठा केलेल्या सुरक्षारक्षकांच्या सेवेस मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती सभे समोर निर्णयास्तव ठेवण्यात आले होते त्यानुसार स्थायी समिती मनपा नांदेड यांचे आयोजीत बैठक दि. ३०.०७.१५ ठराव क्रं. ५६, ५७ व १०३ अन्वये उक्त (३) ही महिण्याच्या मुदतवाठीस मंजुरी देण्यात आलेली आहे. तरी नव्याने मागविण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांच्या पुनश्चः कार्यालयीन निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साप्रवि/ई-निविदा

/८०७७/१५ दिनांक २२.०९.२०१५ अन्वये चौथ्यांदा प्रसिध्दी देण्यात आलेली असुन सदर निविदेच्या अनुषंगाने (४) निविदा विक्री झाल्या आहेत पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मे. कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस नागपुरच्या सुरक्षारक्षकांच्या सेवेत पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार दिनांक ०१.०८.१५ ते ३१.१०.१५ या तीन महिण्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.२६** **प्रस्ताव**

श्री केरोजी सिताराम दासरे यांची भुतपुर्व नगरपालिकेत दि. २०.१२.८९ रोजी फायरमन या पदावर नियमीत झाली श्री दासरे अनु.जमाती प्रवर्गातील आहेत. तदनंतर त्यांची सेवा जेष्ठता, गुणवत्ता, गोपनिय अहवाल, अनुशेष इ. बाबी विचारात घेता त्यांची पदोन्नती लीडींग फायरमन या पदावर सन २००६ ला झाली सदर पदावर नियमीतपणे त्यांनी चांगल्या प्रकारे काम केले. अग्नीशमन विभागात सब फायर ऑफिसर हे पद रिक्त होते सदरचे पद हे पदोन्नतीने भरावयाचे असल्यामुळे लिडींग फायरमन या प्रवर्गातुन जेष्ठता, अनुभव, गोपनिहय अहवाल, अनुशेष इ. बाबी लक्षात घेऊन लिडींग फायरमन या संवर्गात श्री केरोजी सिताराम दासरे हे जेष्ठता यादीनुसार सदर संवर्गात सेवाजेष्ठ असल्यामुळे निवड समितीच्या दि. ०१.०८.०९ चे बैठकीत सब फायर ऑफिसर या पदावर पदोन्नती देणे संबधीत शिफारस केली कार्यालयातील नतदृष्ट अधिकारी व कर्मचारी यांनी हेतु पुरस्सर श्री दासरे यांची पदोन्नतीचे आदेश निर्गमीत होऊ दिले नाही. व कार्यालयाने श्री दासरे यांचेवर अन्याय केला असल्यामुळे नाराजीने श्री दासरे औद्योगीक न्यायालयात प्रकरण न्याय प्रविष्ठ केले सदर प्रकरणात अद्याप निर्णय झालेला नाही. श्री दासरे हे औद्योगीक न्यायालयात नाराजीने त्यांचे हक्कासाठी गेले ही वस्तुस्थिती आहे तथापि कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी संगनमत करुन त्यांना सेवेतुन कमी करण्याचा कठ रचला व त्यात ते यशस्वी झाले.

वस्तुस्थि अशी आहे की श्री दासरे यांनी प्रथम अर्ज दिला व त्यानंतर दि. १३.१२.१२ ते २०.०२.१३ एकूण ७० दिवसाची अर्जीत रजा खाजगी कारणास्तव उपभोगली होती तदनंतर वाढीव रजेसाठी रितसर अर्ज दिला परंतु संबंधीतांची वाढीव रजा मंजुर अथवा नामंजुर केली असल्याचे कळविले देखीन नाही. उलट ४० दिवसाचे नंतर अग्नीशमन अधिकारी यांनी अनाधिकृत गैर हजेरीचा अहवाल सादर केला नियमातील तरतुदीनुसार एखादा कर्मचारी रजा मंजुर झाल्यानंतर सलग रजा उपभोगतो. त्यानंतर त्यास वाढीव रजमा म.ना.ले. रजा नियम १९७९ मधील तरतुदीनुसार देता येऊ शकतो त्यास अनाधिकृत गैरहजर म्हणजा येत नाही तथापी वरील प्रमाणे ४० दिवस उशिरा दिलेला अग्नशीन अधिकारी यांचा अहवाल खोटारडा दिशाभुल करणारा व नियमाबहय आहे.श्री केरोजी सिताराम दासरे यांनी रितसर रजेचा अर्ज देऊन रजा उपभोगली रजा संपल्यानंतर वाढीव रजेचा अर्ज म.ना.से. रजा नियम १९७९ चे तरतुदीनुसार दिला त्यास अनाधिकृत गैरहजर म्हणता येणार नाही. अनाधिकृतपणे गैरहजर राहणे हा दोषारोप ठेवला गेला चौकशी अधिकारी यांनी कोणतीही बाजु न तपासता आंधळेपणाने दोषारोप सिध्द होतो असा चौकशी अहवाल नियमबाहय बेकायदेशीर सादर केला बडतर्फीची शिक्षा ही गंभीर स्वरुपाची शिक्षा आहे अशी शिक्षा अपहार, चोरी, कार्यालयाची फसवणुक, सौदेबाजी करणा-या कर्मचा-यांवरच केली जाते असा एकही दोषारोप श्री दासरे यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपात नाही. अनाधिकृतपणे गैरहजर असलेल्या कर्मचा-यास किरकोळ स्वरुपाची शिक्षा देण्याचे प्रवधान आहे. त्यास विभागीय चौकशीची आवश्यकता नसते परंतु श्री दासरे हे अनाधिकतपणे गैरहजर नसतांना देखील त्यांना कोणत्याही प्रसंगी सोडू नये कुठील कारस्थान करुन प्रावधान नसतांना विभागीय चौकशी केली खोटा अहवाल चौकशी अधिकारी यांचेकडून मागवुन श्री दासरे यांचेवर कठोर अन्याय केला आहे.

प्रस्तुत प्रकरणात मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(३) मधील तरतुदीनुसार एखादा कर्मचा-यास बडतर्फ करावयाचे झाल्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे तथापी प्रशासनाने स्थायी समितीची मंजुरी घेतली नाही श्री दासरे यांना वाजवी संधी दिली नाही पुर्व पिठीका नमुद करुन त्यांना बोलकी नोटीस दयावयास पाहीजे होती पण तशी नोटीस देखील नाही.

वरील सर्व बाबी न पाहता श्री दासरे यांना नियमबाहय सेवेतुन बडतर्फ केले तो बडतर्फीचा आदेश ही स्थायी समिती रद्द बातल करते तसेच श्री दासरे यांना पुर्ववत पुर्वलक्षी प्रभावाने सेवेत रुजु करुन घेण्याचा ठराव सर्वानुमते समंत करते निलंबन काळा हा कर्तव्यकाळ करण्याची मंजुरी देण्यात येते तसेच या इतिवृत्तास याच ठरावाव्दारे मान्यता देते.

**सुचक** :- प्रविण बालाप्रसाद बियाणी **अनुमोदक** :- मोरे संजय गंगाधर

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

उपरोक्त संदर्भीय विषयी श्री केरोजी सिताराम दासरे, लिडींग फायरमन, अग्निशमन विभाग मनपा नांदेड येथे कार्यरत असतांना त्यांनी दिनांक 13.12.2012 ते 27.12.2012 (15) दिवस , दिनांक 28.12.2012 ते 21.01.2013 (25) दिवस व दिनांक 22.01.2013 ते 20.02.2013 (30) दिवस असे एकुण 70 दिवसाची सलग अर्जित रजा अनाधिकृतरित्या उपभोगून कामावर अनुउपस्थित असल्या बाबत अग्निशमन अधिकारी यांनी दिनांक 06.04.2013 रोजी अहवाल सादर केला त्या अनुषंगाने अग्निशमन विभागासारख्या अत्यावश्यक सेवे मधिल कर्मचा-यांने सतत 70 दिवस अर्जित रजा उपभोगून त्यानंतर रजा अथवा सूचना न देता प्रथम रजा उपभोगून रजा अर्ज सादर केल्या संदर्भात संबंधितास कार्यालयीन आदेश नांवाशमनपा/अवअसे/41/13 दिनांक 18.04.2013 अन्वये निलंबीत करण्यात आले.निलंबीत प्रकरणे संबंधितास कार्यालयीन ज्ञापन क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-1/8159/13 दिनांक 23.07.2013 अन्वये ज्ञापन व दोषारोप जोडपत्र 1 ते 4 बजाविण्यात येवून त्याच्या वर ठेवण्यात आलेल्या दोषारोपा बाबत खुलासा मागविण्यात आला.संबंधिताने ठेवण्यात आलेले दोषारोप अमान्य केल्यामुळे संबंधिता विरूध्द विभागीया चौकशी आरंभिन्यात आली. चौकशी अधिकारी यांनी विभागीया चौकशी करून दिनांक 10.02.2014 रोजी चौकशी अहवाल सादर केला असून चौकशीअंती त्यांच्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप अग्निशमन विभागासारख्या अत्यावाश्यक सेवे मध्ये कर्मचा-याने 70 दिवस अर्जित रजा उपभोगून त्यानंतर रजा अथवा सूचना न देता प्रथम रजा उपभोगून नंतर रजेसाठी अर्ज सादर केल्याचे सिध्द झाले असल्याचा अहवाल चौकशी अधिकारी यांनी दिला.

अग्निशमन विभागातील सेवा अत्यावाश्यक सेवा आहे.अर्जित रजा प्रथम उपभोगून त्यानंतर रजेचा अर्ज सादर करणे व पूर्व सूचना न देता , गैरहजर राहणे हे कार्यालयीन शिस्तीच्या विरूध्द आहे.

निलंबन प्रकरणी चौकशीत दोषरोप सिध्द होत असल्यामुळे मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56 (2) नूसार संबंधिता विरूध्द कार्यवाही का करण्यात येवू नये.? याबाबतचा खुलासा 7 दिवसाच्या आत सादर करावा अशी दिनांक 14.03.2014 रोजीची नोटीस वाजवी संधी म्हणून संबंधितास देण्यात आली होती. संबंधिताने दिनांक 21.03.2014 रोजी अर्जसादर करून नोटीसाचा खुलासा सादर करण्यासाठी 7 दिवसाचा अवधी वाढून देण्या बाबत विनंती केली होती. त्यांनूषंगाने संबंधितास खुलासा सादर करण्यासाठी 7 दिवसाचा अवधी वाढवून देण्यात आला. त्यानंतर संबंधिताने उक्त नोटीशीच्या अनुषंगाने खुलासा दि.29.03.2014 रोजी सादर केला. परंतु, सदरचा खुलासा हा संयुक्तीक व समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आले. याउपरही प्रस्तुत प्रकरणी संबंधितास वाजवी संधी म्हणून पुनश्चः दि.19.04.2014 रोजीच्या पत्रान्वये दि.21.04.2014 रोजी आयुक्त यांच्या कक्षात समक्ष सुनावणीसाठी पाचारण करण्यात आले. परंतु, सुनावणी दरम्यान सुद्धा संबंधिताने दिलेला खुलासा व सादर केलेले पुरावे ते समाधानकारक नसल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे.

तसेच, संबंधिताचा सेवा कालावधीचा विचार करता यापूर्वी सुद्धा कामावर अनाधिकृतपणे गैरहजर राहून वैद्यकीय रजेचा अर्ज सादर केला होता. त्यावेळी तत्कालीन आयुक्तांनी/प्रशासनाने संबंधितास वैद्यकीय मंडळाकडे तपासणीसाठी पाठविले होते व वैद्यकीय मंडळाने संबंधिताची वैद्यकीय कारणस्तव रजा मंजूर करण्यात येऊ नये अशी शिफारस केली होती. त्या अनुषंगाने संबधित हे त्यावेळी सतत अनुपस्थित राहिल्यामुळे दि.06.03.2003 रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये संबंधिताची 145 दिवसांची रजा विनावेतनी करून यापुढे कामावर गैरहजर राहिल्यास बडतर्फीची कार्यवाही करण्यात येईल, अशी ताकीद देऊन आदेशाची नोंद सेवापटात घेण्यता आलेली आहे.

करिता, वरील सर्व बाबींचा विचारात घेता तसेच अग्निशमन विभागासारख्या अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी असून सुद्धा कर्तव्याची जाणीव न ठेवता अनधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर राहणे, रजा उपभोगून रजा अर्ज सादर करणे तसेच यापूर्वी बडतर्फीची ताकीद देऊन सुद्धा वर्तनात सुधारणा न होणे ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची व कार्यालयीन शिस्तीच्या विरुद्ध असल्याने संबंधितांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (2) (ग) मधील तरतूदीनुसार कार्यालयीन आदेश जा.क्र./नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-1/737/2014, दि.23.04.2014 अन्वये मनपा सेवेतून लिडींग फायरमन या पदावरून पुढे नोकरी मिळण्यास अपात्र होणार नाही, अशा प्रकारे सेवेतून कमी करण्यात आले आहे. सदरील आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवापटात घेण्यात आली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड) च्या तरतूदीच्या अधिन ज्या कोणत्याही नगरपालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालिके व्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, असा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिन्याच्या आत ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील करता येईल अशी तरतूद आहे.

करीता संबंधितावर लादलेली शास्तीबाबत संबंधितांने उक्त तरतुदीनुसार विहित मुदतीत अपिल केले नसल्यामुळे व संबंधिताची सेवा महानगरपालिकेच्या हिताची नसल्याने त्यांना कामावर घेता येणार नाही. तसेच संबंधीताने बडतर्फीच्या विरोधात प्रकरण न्यायालयात दाखल केले असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

**संजय मोरे** आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे त्यास सभागृहाने मान्यता द्यावी अशी आमची विनंती आहे. प्रस्ताच्या अनुषंगाने देण्यात आलेली प्रशासकीय टिप्पणी वाचून दाखविण्यात आली.

**संजय मोरे** मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(३) मधील तरतुदीनुसार एखादा कर्मचा-यास बडतर्फ करावयाचे झाल्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे तथापी प्रशासनाने स्थायी समितीची मंजुरी घेतली नाही श्री दासरे यांना वाजवी संधी दिली नाही पुर्व पिठीका नमुद करुन त्यांना बोलकी नोटीस दयावयास पाहीजे होती पण तशी नोटीस देखील नाही. श्री दासरे हे खुप गरीब कुटुंबातील मानूस आहे त्यांना कामावरुन कमी करण्यात आल्यामूळे त्यांच्या बायका पोर उपासी मरत आहे त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबियावर अन्याय करण्यात येवू नये. त्यांना कामावर कसे घेता येईल ते पहावे आमचा प्रस्ताव पास करण्यात यावा.

**उपआयुक्त (प्रा.अधिकारी)** संबंधितानी शास्ती लादल्यानंतर नियमाप्रमाणे ३० दिवसाचे आंत स्थायी समितीकडे अपिल करावयास पाहिजे होते ते त्यांनी केलेले नसुन सध्या प्रकरण न्याय प्रविष्ट आहे, नियमानुसार न्यायालयात चालू असलेल्या प्रकरणात सभागृहात चर्चा येत नाही ही बाब आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

**संजय मोरे** श्री दासरे यांनी त्यांच्यावर अन्याय झाल्यामुळे औद्योगिक कामगार न्यायालयात दाद मागितली होती औद्योगिक कामगार न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल दिलेला आहे परंतु महानगरपालिकेच्या त्या निकालाविरुध्द उच्च न्यायालयात अपिल दाखल केलेले आहे.

**सभापती** संबंधीताने बडतर्फीच्या विरोधात प्रकरण न्यायालयात दाखल केले असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामूळे स. सदस्यांचा प्रस्ताव ना मंजुर करण्यात येतो. न्यायालयाच्या निर्णयानुसार आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.१३८** **ठराव**

श्री केरोजी सिताराम दासरे बडतर्फे लिडिग फायरमन यांनी बडतर्फीच्या विरोधात प्रकरण न्यायालयात दाखल केले असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामूळे स. सदस्यांचा प्रस्ताव ना मंजुर करण्यात येतो. न्यायालयाच्या निर्णयानुसार आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी असे ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्र.२७**

**अपिल**

**प्रति,**

**मा.सभापती,**

स्थायी समिती,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**विषय:- सक्तीने सेवा निवृत्त केल्याबाबत.**

**संदर्भ:-** कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-4/7936/2013, दि.20.07.2013

मा. महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सेवेत सादर अपिल सादर करण्यात येते की, मी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यालयात दिनांक 01.04.1983 पासुन लिपीक या पदावर कार्यरत होतो. तथापि, संदर्भीय आदेशान्वये मला महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम 1979 चे नियम भाग 3 (शिक्षा आणि शिस्तभंग विषयक प्राधीकरणे) नियम 5 (1) मधील मोठया शिक्षा सात मधील तरतुदीनुसार सक्तीने सेवा निवृत्त करण्यात आले आहे.

मला सक्तीने सेवा निवृत्त केल्यामुळे माझ्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली असून मी माझ्या कुटुंबात एकमेव कमावता पुरुय्ष असल्याने माझ्या कुटुंबाला रस्त्यावर येण्याची वेळ आलेली आहे.

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे कलम 56 (4) मधील तरतुदीनुसार ज्या कोणत्याही नगरपालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालिकेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडुन खालच्या पदावर आणण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल त्यास, खालच्या पदावर आणण्याचा, काढुन टाकण्याचा किंवा बडतर्फ करण्याचा आदेश त्यास कळविल्यापासुन एक महिण्याचा आत, ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील करता येईल आणि अपील प्राधिका-यास, ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्याकडुन अभिप्राय मिळवल्यानंतर दिलेला आदेश कायम करता येईल किंवा अशा आदेशाऐवजी त्यास न्याय वाटेल असा आदेश देता येईल. यात एखाद्दी की शास्ती लादण्याच्या आदेशाचा समावेश होतो आणि अपील प्राधिका-याने दिलेला आदेश ताबडतोब अंमलात येईल व तो निर्णायक असेल.

परंतु या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी स्थायी समिती आयुक्तांची निकट वरीष्ठ प्राधिकारी आहे असे मानले जाईल आणि महानगरपालिका स्थायी समितीची निकट वरिष्ठ प्राधिकारी आहे असे मानले जाईल.

त्याअनुषंगाने उक्त तरतुदीच्या अधिन राहुन मी आपल्याकडे अपील करीत आहे. तरी मे.साहेबांनी माझ्यावर झालेल्या अन्यायावर योग्य तो निर्णय घेऊन मला कामावर पुनस्थापित: करण्यासाठी ठराव पारीत करावा, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,
स.महेमुद स.करीम, लिपीक,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेङ

**प्रशासकिय टिप्पणी**

सय्यद महेमुद स. करीम हे मनपा कार्यालयात लिपीक या पदावर कार्यरत होते. त्यांना कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/ आस्था-4/7976/2013 दि.20.0.2013 च्या आदेशान्वये सक्तीने सेवानिवृत करण्यात आले. संबंधिताचे दि.15.03.2014 रोजी निधन झोले.

संबांधित हे दिनांक 17.08.2012 पासुन कोणत्याही प्रकारची मौखीक अथवा लेखी सुचना किंवा रजेचा अर्ज सादर न करता विनापरवानगी अनधिकृतरित्या कामावर गैरहजर असल्याचा अहवाल सादर करण्यात आला होता. तसेच त्यांच्या संपुर्ण सेवा कालावधीतील सेवापाहता संबंधित हे नियुक्ती पासुनच त्यांच्या कर्तव्याबाबत एकनिष्ठ नसल्याचे तसेच संबंधितास वारंवार संधी देऊनही त्याचे वर्तनात व मनपा सेवे प्रती कोणतीच सुधारण होत नसल्याने संबंधितास मनपा सेवेची आवश्यकता वाटत नसल्यामुळे व संबंधितास महानगरपालिका सेवेत ठेवणे मनपाच्या हितोच नसल्यामुळे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे कलम 56 अन्वये शिस्तभंग विषयक कार्यवाही का करण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा 7 दिवसाचे आत सादर करावा. अन्यथा सदर संबंधीताचे कांहीही म्ळणने नाही असे गृहित धरुन सेवेतून बडतर्फ करण्यात येईल, अशी नोटीस बजावण्यात आली होती. परंतु संबंधिताने सदरील नोटीसीच्या अनुषगांने कोणत्याही प्रकारचा खुलासा सादर केला नाही. उक्त् बाब विचारात घेऊन संबंधित हे दि. 17.08.2012 पासुन विनापरवानगी कामावर गैरहजर असल्यामुळे संबंधीतास निलंबित करण्यात आले होते. निलंबन प्रकरणी संबंधिता विरुध्द विभागीय चौकशी आरंभिण्यासाठी संबंधितास ज्ञापन व दोषारोप जोडपत्र 1 ते 4 बजावण्यात आले. त्याअनुषंगाने संबंधितांनी खुलासा सादर करुन त्यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप संबंधितांनी मान्य केलेले आहेत. त्यामुळे संबंधिताच्या एकुण सेवा कालावधीचा विचार करता उपरोक्त प्रमाणे संबंधितास वारंवार संधी देऊनही त्यांच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झाल्याने दिसुन येत नसल्यामुळे तसेच संबंधितास मनपा सेवेत ठेवणे मनपाच्या हिताचे नसल्यामुळे श्री स. महेमुद स. करीम, लिपीक यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम 1979 नियम भाग 3 (शिक्षा आणि शिस्तभंग विषयक प्राधिकरणे) नियम 5 (1) मधील मोठ्या शिक्षा नियम सात मधील तरतुदीनुसार कार्यालयीन आदेश क्र.नांवशमनपा/साप्रवि/आस्था-4/7936/13 दि.20.07.2013 अन्वये सेवेतून सक्तीने सेवा निवृत्त करण्यात आले आहे.

संबंधित कर्मचा-यांच्या पत्नीने अर्ज सादर करुन त्यांचे पतीवर करण्यात आलेली कार्यवाही ही उचित नुसन प्रस्तुत प्रकरणी योग्य निर्णय देण्याबाबत मा.सभापती स्थायी समिती, यांना अपील करण्यात आलेली आहे.

तथापि महाराष्ट्र मनपा अधिनियम चे कलम 56 (4) मधील तरतुदीनुसार ज्या कोणत्याही नगरपालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालकव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल. काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल त्यास, खालच्या पदावर आणण्याचा, काढून टाकण्याचा किंवा बडतर्फ करण्याचा आदेश त्यास कळविल्यापासून एक महिण्याच्या आत, ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरीष्ठ प्राधिका-याकडे अभिप्राय मिळवल्यानंतर दिलेला आदेश ताबडतोब अंमलात येईल व तो निर्णायक असले.

परंतु या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी स्थायी समिती आयुक्ताची निकट वरिष्ठ प्राधिकारी आहे. असे मानले जाईल आणि महानगरपालिका स्थायी समितीची निकट वरिष्ठ प्राधिकारी आहे असे मानले जाईल.

तसेच यापुर्वी संबंधीत कर्मचा-यास सक्तीने सेवानिवृत्त केल्यानंतर संबंधीत कर्मचा-याने मृत्युपूर्वी दिनांक 12.11.2013 व दि.03.12.2013 रोजी मा.आयुक्त यांना अर्ज सादर करुन सेवेत पुनस्थापित करण्याची विनंती केली होती. त्याअनुषंगाने संबंधितास कार्यालयीन पत्र क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-4/2211/13 दि.06.12.2013 अन्वये सक्तीने सेवानिवृत्तीचे आदेश प्राप्त झालेल्या 30 दिवसांचे आत स्थायी समितीकडे अपिल करणे अभिप्रेत होते. परंतु मा.आयुक्त यांचेकडे अर्ज सादर केलेला अर्ज सनदशीर नसल्याचे नमुद करुन संबंधितास कामावर पुन:स्थापित करता येणार नाही. असे कळविण्यात आले होते. तदनंतर ते दि.15.03.2014 रोजी मृत्यूपावले आहे. त्यामुळे आता संबंधितास कामावर घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही

**सभापती** कै. स.महेमुद स.करीम, सेवानिवृत्त लिपीक, यांना आदेश क्र.नांवशमनपा/साप्रवि/आस्था-4/7936/13 दि.20.07.2013 अन्वये सेवेतून सक्तीने सेवा निवृत्त करण्यात आले होते तदनंतर ते दि.15.03.2014 रोजी मृत्यूपावले असुन त्यांचे कुटूंबांची उपासमार होत असल्याने त्यांच्या पत्नीस कुटूंब निवृत्ती वेतन मंजुर करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. व आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं. १३९** **ठराव**

कै. स.महेमुद स.करीम, सेवानिवृत्त लिपीक, यांना आदेश क्र.नांवशमनपा/साप्रवि/आस्था-4/7936/13 दि.20.07.2013 अन्वये सेवेतून सक्तीने सेवा निवृत्त करण्यात आले होते तदनंतर ते दि.15.03.2014 रोजी मृत्यूपावले असुन त्यांचे कुटूंबांची उपासमार होत असल्याने त्यांच्या पत्नीस कुटूंब निवृत्ती वेतन मंजुर करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. व आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.२८** **अपील अर्ज** **दिनांक १०.०९.२०१५**

**प्रति,**

**मा. सभापती साहेब,**

**स्थायी समिती,**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**विषय** :- माझ्यावरील अन्याय दुर करुन कामावर पुर्ववत रुजु करणे बाबत

**अर्जदार**:- गोविंद बालाप्रसाद करवा बाथीत जनसंपर्क अधिकारी नांदेड वाघाळा शहर मनपा

**संदर्भ** :- १) नांदेड वाघाळा मनपा सर्व साधारण सभेची प्रशासकीय ठराव क्रं. ४५ दिनांक ३०.०६.२०११

२) जनसंपर्क अधिकारी पदावर एकत्रीत वेतनावर नियुक्तीचा आदेश दिनांक २४.०८.२०११

३) मा. उच्च न्यायालय यांचिका क्रं. २५६२/२०१२ चाच निर्णय दिनांक २२.०१.२०१३

४) मुदतवाढीसाठी सर्व साधारण सभेकठे पाठवलेला प्रशासकीय प्रस्ताव दि. ११.२.२०१४

५) शेवटची मुदतवाढ आदेश दि. २१.०५.२०१४

६) पो. स्टेश वजिराबाद येथील गु. रं. नं. ३८/२०१३

७) मनपा स्थायी समिती ठराव क्रं. ५ दिनांक ०७.०७.२०१४

८) दिनांक १४.०८.१४ रोजीच्या महासभेच्या पुरवणी विषय पत्रिकेत स. सदस्यांचा प्रस्ताव क्रं. ६

९) मनपा सर्व साधारण सभा ठराव क्रं. ८६ दि. १४.०८.२०१४

१०) मा. आयुक्त यांचे आदेश क्रं. २०.०८.२०१४

महोदय,

उपरोक्त विषयी विनंती की, सर्व प्रथम मी आपले लक्ष संदर्भ क्रं. १ ते ३ कडे वेधु इच्छितो, संदर्भ क्रं. १ मधील महानगरपालिकेने सर्वानुमते समंत केलेल्या ठरावानुसार जनसंपर्क अधिकारी या पदासाठी संदर्भ क्रं. २ अन्वये शासनाच्या मंजुर सेवाभरती प्रवेश नियमाच्या आधारे जाहिरातीव्दारे वर्तमानपत्रात सुचनेव्दारे अर्ज मागवुन लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा अशा विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन मनपा निवड समितीने गुणवत्तेच्या आधारे जनसंपर्क अधिकारी या पदासाठी माझी एकत्रीत वेतनावर निवड केली आहे. जनसंपर्क अधिकारी या पदाला शासन मान्यतेसाठी प्रशासना मार्फत पाठपुरावा सुरु आहे.

संदर्भ क्रं. ३ अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे माझ्या नियुक्ती विरुध्द दाखल याचिका क्रं. २५७२/२०१२ चा निकाल दिनांक २२.०१.२०१४ रोजी लागला त्यात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या क्रं. ३ परिच्छेदात नमूद मजकुर खालील प्रमाणे मराठीत भाषंातरीत होईल.

प्रतिवादी क्रं. ३ (म्हणजे मी) ने न्यायालया समोर सांगितले की प्रतिवादी क्रं. ३ याची सेवा सध्या सुरु आहे आणि महानगरपालिकेने मान्यता दिलेली शेवटी मुदतवाढ दि. ३१.१२.२०१३ रोजी संपली आहे. सदर प्रकरणात प्रतिवादी क्रं. ३ च्या नियुक्तीला दिलेले आव्हान निरर्थक आहे. महानगरपालिकेस यासंबंधीच्या कायदेशीर बाबीचे निरिक्षण केल्यानंतरच योग्यतो निर्णय घेण्याची मुभा असेल जर महानगरपालिकेत कंत्राटी कर्मचा-यांच्या बाबतीत एखादा योजना असेल तर महानगरपालिकेत त्या प्रमाणेदेखील निर्णय घेता येईल.

सदरची याचिका ही सन्माननीय उच्च न्यायालयात माझ्या नियुक्तीच्या विरुध्द दाखल करण्यात आली होती त्यात माझ्या जन्म प्रमाणपत्रा बाबत आक्षेप नोंदवण्यात आला होता. वास्तविकतः माझ्या जन्म दाखल्याबाबत ग्रामपंचायत, आष्टी, ता. हदगांव व जिल्हा परिषद नांदेड मार्फत चौकशी केल्याचे आणि संबंधीतांनी जन्म दाखल योग्य असल्याचे चौकशी अंती निष्पन्न झाल्याचा अहवाल दिल्याचे तसेच निवडप्रक्रिया योग्य असल्याचे मा. न्यायालयासमोर महापालिकेच्या वतीने निदर्शनास आणुन देण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणातील निकालाचा माझ्या नियुक्तीवर परिणाम होणे स्वाभविक नाही.

नियुक्ती विषयक याचिका फेटाळून लावताना स. उच्च न्यायालयाने माझ्या बाबत सहानुभुतीपूर्वक निर्णय घेण्यासाठी महापालिकेला उलट संधीच दिलेली आहे. मला कामावरुन कमी करण्या बाबत किंवा पुर्वीचा ठराव रद्द करण्या बाबत कोणतेही निर्देश नाहीत कर्मचा-यांचे संरक्षण व महापालिकेची स्वायत्तता या दोन्ही बाबी स. उच्च न्यायालयाने आपल्या निकालपत्रात नमूद केल्या असल्याने त्यात विरोधाभास करण्याचे कोणतेही कारण नाही.

माणी यापुर्वीची सेवा समाधानकारक असून माझ्या सेवेची महापालिकेला गरज असल्याचे याआधीच्या मा. आयुक्तांनी वेळोवेळी संचिकेत अभिप्राय नोंदवलेले आहेत. तसेच संदर्भ क्रं. ४ मध्ये सदर बाब महासभेलाही कळविण्यात आल्याचे दिसून येते.

महोदय, प्रशासनाकडून मला आजवर कधीच वेळेवर मुदतवाढ मिळाली नाही मुदतवाढीचे आदेश दिले नसले तरी वेळोवेळी मुदतीनंतरही माझ्याकडून काम करुन घेतले जात होते. तांत्रिक खंडाच्या दिवशीही माझ्याकडून काम करुन घेतले गेले, परंतु त्याचा मोबदला कधीच मिळाला नाही सार्वजनिक तसेच अन्य सुट्टीच्या दिवशीही काम करुन घेतांना मला साप्ताहिक किंवा बदली सुट्टीचा लाभ दिला गेला नाही याउलट मला रजेवर जावे लागल्यास सदर रजा विनावेतन स्वरुपात गृहित धरली गेली सदर बाब आपल्या वेळोवेळी निदर्शनास आणून देण्यात आली आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या या निकालानंतर संदर्भ क्रं. ४ अन्वये मा. आयुक्त यांनी माझ्या पुढील कालावधीच्या मुदतवाढीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेकउे पाठवला होता. दरम्यानच्या काळात वेतन मिळाले नसल्याने मी मुदतवाढीसाठी अर्ज केल्यानंतर विधी अधिकारी व मा. उपआयुक्त (प्रशासन) यांनी मुदतवाढ देण्याची अधिकार मा. आयुक्तांना असल्याचा अभिप्राय दिल्यानंतर संदर्भ क्रं. ५ अन्वये मला दिनांक ०१.०१.२०१४ पासुन दर सहा महिन्यास एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मला पुढील आदेशापर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

संदर्भ क्रं. ६ अन्वये माझे नियुक्तीचे प्रकरण मा. प्रथच वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयासमोर सध्या न्यायप्रविष्ट असून सदर प्रकरणाच्या पोलीस तपासात मी निर्देष असल्याचे निषपन्न झाले आहे त्याआधारे माझ्या विरुध्द दाखल झालेला गुन्हा ब-अंतीम करुन निकाली काढण्याची विनंती पोलीसांनी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचेकडे केलेली आहे.

संदर्भ क्रं. ३ च्या अनुषंगाने मा. आयुक्त यांनी संदर्भ क्रं. ४ अन्वये मला प्रशासनाने दिलेल्या मुदतवाढीच्या विषयाबाबत संभ्रम निर्माण केल्या गेल्यामुळे स. पदाधिकारी व स. सदस्यांच्या झालेल्या गैरसमजाच्या भावनेतुन संदर्भ क्रं. ७ आणि ९ मधील अनुक्रमे स्थायी समिती आणि महासभेने ठराव घेतल्याचे दिसून येते. प्राधिकरणाने घेतलेले निर्णय प्रशासकीय आणि कायदेशिररित्या योग्य आहे की अयोग्य, हे तपासुन योग्य आणि पुरक भूमिका मांडण्याची जबाबदारी प्रशासनाची असते त्याचबरोबर प्रशासकीय किंवा कायदेशीर दृष्टया अयोग्य निर्देश दिले असतील किंवा ठराव घेतला तर योग्य निर्णय घेऊन अमलबजावणी करण्याचे आणि गरज भासत असेल ठराव विखंडीत करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहेत परंतु या प्रकरणात प्रशासनाने ही जबाबदारी पार पाडलेली नाही त्यामुळे माझ्यावर अन्याय झाला आहे. गैरसमजाच्या भावनेतुन संदर्भ क्रं. ९ नुसार महासभेने सदर ठराव मंजुर करतांना मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा वेगळा अर्थ काढून माझी एकत्रीत वेतनावर नियुक्ती करण्यासाठी विहित पध्दतीचा केलेला अवलंब रद्द करुन त्याअधारे माझ्या सेवेची मुदतवाढ संपुष्टात आणून मला सेवेतुन बडतर्फ (कमी) करण्याचा ठराव पारीत केला आहे सदरचा प्रस्ताव प्रशासना मार्फत ठेवण्यात आला नव्हता त्या करिता त्याची पूर्ण चौकशी केल्याशिवाय त्याची अमलबजावणी करणेही प्रशासनास बंधनकारक नव्हते.

गेल्या सलग तीन वर्षापासुन कमी मुनष्यबळ आणि अतिरिक्त स्वरुपाचे काम दिले तरी सर्व जबाबदारी समर्थपणे पेलून मी आजपर्यंत महापालिकेच्या वतीने राबवल्या जाणा-या विविध योजना, उपक्रम यांची प्रभावीपणे प्रसिध्दी करण्यासाठी महत्वाची भुमिका बजावून आपल्या मार्गदर्शनाखाली महापालिकेची प्रतिमा उंचावण्याचा प्रमाणिक प्रयत्न केला आहे. माझ्या कामाबद्दल आजवर कोणतीही तक्रार नाही किंवा माझ्यावर कधीच ठपका ठेवलेला नाही. मनपा सार्वत्रिक निवडणूक-२०१२ आणि लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०१४ मध्ये देखील मी प्रभावीपणे स्वतंत्रपणे जबाबदारी हाताळली आहे नागरिकांचा महापालिकेबद्दल असणारा रोष कमी करुन महापालिकेची योग्य भुमिका मांडण्याचा सातत्याने प्रयत्न करतांना कार्यालयीन मनुष्यबळ विकासातही हातभार लावला आहे या सर्व बाबीची आपल्यालाही जाणीव आहे.परंतु या बाबीकडे साफ दुर्लक्ष करुन महासभेने गैरसमजाच्या भावनेतुन केलेल्या अप्रशासकीय ठरावाची थेट अमलबजावणी करुन संदर्भ क्रं. १० अनवये कोणतीही पुर्वकल्पनास न देता मला अचानक सेवेतुन कमी करण्याचे आदेश निर्गमीत करुन मला नैसर्गिक न्यायापासून देखील वंचित ठेवण्यात आले आहे. महासभा ही सर्वभौम आहे, यात दुमत असण्याचे कोणतेच कारण नाही परंतु महासभेने घेतलेला निर्णय प्रशासकीय आणि कायदेशिररित्या योग्य आहे की अयोग्य या बाबत महासभेसमोर भुमिका मांडण्याची जबाबदारी प्रशासनाची असते. त्याच बरोबर महासभेने प्रशासकीय किंवा कायदेशीरदृष्टया अयोग्य निर्देश दिले किंवा ठराव घेतला तर योग्य निर्णय घेण्याचे आणि प्रसंगी ठराव

विखंडीत करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवण्याचे अधिकार प्रशासनाला आहेत परंतु या प्रकरणात प्रशासनाने ही जबाबदारी पार पाडलेली नाही त्यामुळे माझ्यावर अन्याय झाला आहे.

मनपा अधिनियम १९४९ च्या कलम ५६ शास्ती लादणे मधील पोटकलम (३) अन्वये कोणत्याहरी अधिसका-यास किंवा कर्मचा-यास या कलमान्वये खालच्या पदावर आणणे, सेवेतुन काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे याविरुध्द कारण दाखवण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय अशा रितीने खालच्या पदावर आणता येणार नाही. सेवेतुन काढून टाकता येणार नाही किंवा बडतर्फ करता येणार नाही असे स्पष्ट नमुद आहे.

माझ्याअधी ज्या कंत्राटी कर्मचा-यांना प्रशासनाने कमी केले त्यांना त्यांच्या कामकाजातील निष्काळजीपणा बदल कारण दाखवण्याची वाजवी संधी दिलेली होती परंतु माझ्याविरुध्द कोणतीही प्रशासकीय शास्वती लादलेली नसतांना मला थेट सेवेतुन कमी करण्याचा निर्णय घेऊन लगेच त्या बाबत आदेश काढण्यात आला. माझ्यावर सोपवलेले काम प्रकल्प अथवा योजना यांच्याकरिता विशिष्ट काळासाठी किंवा हंगामी स्वरुपाची नाही. तर सदर कामाची महापालिकेस दैनंदिन व कायमस्वरुपी गरज आहे असे असतांना मला काणतीही पुर्वकल्पना न देता अचानकपणे सेवेतुन कायमचे कमी केल्यामुळे माझ्यासह कुटूंबावर उपासमारीची वेळ आली असून माझ्यावर खूप मोठा अन्याय झाला आहे.

महापालिका सर्व साधारण सभा ही सार्वभौम आहे आणि आजवर स्थायी समिती आणि महासभेने कर्मचा-यांच्या बाजुनेच निर्णय घेतले आहेत परंतु प्रशासकीय स्तरावर घेतलेल्या याआधी घेतलेल्या निर्णयाबाबत संभ्रम निर्माण केल्याने माझ्यावर अन्याय झाला आहे.

आजमितीस शासकीय सेवेसाठी माझी वयोमर्यादा उलटली असल्याने मला आता भविष्यात कोणतीही शासकीय / निमशासकीय नौकरी मिळू शकत नाही कुटूंबात मी एकटाच कर्ता असून माझ्यावरच पत्नी व शिक्षण सुरु असणारी दोन मुले यांच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे मला या नौकरीशिवाय उत्पन्नाचे अन्य कोणतेही साधन नाही महापालिकेने सेवेतुन अचानकपणे कमी केल्यामुळे माझे कौटूंबीक जीवन उध्दवस्त झाले आहे. भविष्यात महापालिकेत नियमीत काम करण्याची संधी मिळेल या आशेवर पगार आणि मुदतवाढ दोन्ही उशिरा मिळत असतांना मी अतिशय सक्षमपणे काम करण्याचा प्रयत्न केला आहे.

करिता आपणास नम्रपुर्वक विनंती की मनपा अधिनियमातील तरतुदीनुसार मा. आयुक्तांची निकट अपिलय समिती या नात्याने मी आपल्याकडे माझ्यावर झालेल्या अन्यायाची दाद मागत आहे नैसर्गिक न्यायाप्रमाणे मला बाजु मांडण्याची संधी न देता महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम ५६ (३) च्या तरतुदीकडे दुर्लक्ष करुन कायदेशीर तरतुदीशी विसंगत असलेला मा. आयुक्तांचा संदर्भ क्रं. १० चा आदेश रद्द करुन मला सेवेत पुर्ववत रुजु करुन घेण्याची आदेश द्यावेत ही विनंती.

आपला विश्वासु,<br>
स्वाक्षरीत/-<br>
गोविंद बालाप्रसाद करवा<br>
बाधित जनसंपर्क अधिकारी, नांदेड वाघाळा मनपा नांदेड

**प्रशासकीय टिप्पणी**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेसाठी कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर जनसंपर्क अधिकारी या अभिनामाचे पद भरण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 45 दिनांक 30.06.2011 अन्वये मान्यता प्रदान केल्यानुसार दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन दिनांक 23.08.2011 रोजी लेखी परिक्षा आणि दिनांक 24.08.2011 रोजी तोंडी मुलाखत घेण्यात आली होती.

श्री गोविंद बालाप्रसाद करवा यांनी नियुक्तीच्या वेळी सादर केलेल्या शैक्षणिक पात्रतेच्या कागदपत्रावरील जन्म तारीख 12.08.1977 ही होती या जन्मतारखेनुसार संबंधीत हा मुलाखतीस अपात्र ठरत असल्याने शैक्षणिक कागदपत्रासह साध्या कागदावर शपथपत्र देवुन जन्म तारीख 21.10.1978 अशी समजावी म्हणून विनंती केली व त्या पुष्टयर्थ ग्राम पंचायत कार्यालय मौजे आष्टी ता. हदगांव जि. नांदेड (महाराष्ट्र) येथील जन्माच्या मुळ अभिलेखाच्या नोंद वही वरुन सादर केलेला जन्म प्रमाणपत्रावर जन्म तारीख 21.10.1978 (एकवीस दहा एकोणीशे अठयाहत्तर) अशी नमुद आहे. उपरोक्त कागदपत्रा अधारे तोंडी मुलखती अंती निवड समितीने श्री गोविंद बालाप्रसाद करवा यांची निवड केल्यानुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/3298/11 दिनांक 24.08.2011 अन्वये कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावर प्रथम सहा महिण्या करिता नियुक्ती केलेली होती.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रं. जन्मदि-1092/प्र.क्र.62/92/(01/13-अ दिनांक 27 सप्टेंबर 1994 व महाराष्ट्र नागरी सेवा (सेवाच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 चा नियम 38 (2) (एक) मध्ये नमुद आहे की, वयाचा खात्रीलायक आणि निर्णयाक पुरावा मिळतो आहे याची शक्य तीतकी खात्री करुन घेण्यासाठी, शासकिय कर्मचा-याला जन्म तारीख दर्शविणारा जन्म नोंद वहीतील किंवा नामसंस्कार नोंदवहीतील उतारा आणि शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षेचे / मॅट्रीकचे प्रमाणपत्र किंवा विद्यापिठाचे प्रमाणपत्र सादर करण्यास सांगावे त्याचा जन्माचा वेळी ज्या मुळ जन्म नोंदवही त्याचे नांव नोंदले आहे त्या नोंदवहीतील उतारा किंवा जन्माचे प्रमाणपत्र (नामसंस्कार प्रमाणपत्रासारखे) हे मात्र पुरेसा पुरावा म्हणून स्विकारले पाहिजे असे नमुद आहे. ही तरतुद जे उच्च शिक्षीत उमेदवार किमान दहावी उत्तीर्ण आहे त्यांचेसाठी शैक्षणिक अर्हतेचे इयत्ता 10वीचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र आणि सनद हेच जन्म तारखेसाठी ग्राहय धरल्या जातात आणि जे उमेदवार इयत्ता 10वी पेक्षा कमी शिकलेले आहे ज्यांना वर्ग-4 अंतर्गत नियुक्ती द्यावयाचे आहे आणि त्यांचेकडे शैक्षणिक अर्हतेचे पुरावे नाहीत त्या बाबतीत ग्राम पंचायतचा दाखल हा ग्राहय मानण्यात येतो. आणि या बाबत वेळोवेळी मा. सर्वोच्च न्यायालयाने देखील इयत्ता 10वीचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र आणि सनद हेच कागदपत्र जन्म तारखेचा पुरावा म्हणुन ग्राहय धरण्या बाबतचे निर्देश दिलेले आहे.

तदनंतर श्री गोविंद बालाप्रसाद करवा यांच्या कंत्राटी नियुक्ती संदर्भात श्री लक्ष्मीकांत पंडीतराव टाकळकर यांनी मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथील रिट याचिका क्रं.2572/2012 ही दाखल केली. याच कालावधीत सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन

वजिराबाद नांदेड यांनी त्यांचे पत्र क्रं. 976/2013 दिनांक 18.03.2013 अन्वये मा. मुख्य न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग नांदेड यांचे कोर्टात आरोपी गोविंद बालाप्रसाद करवा यांचे विरुध्द पोलीस स्टेशन गु.र.नं. 38/2013 कलम 420, 467, 468, 471 भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल झालेला असल्याचे नमुद करुन संबंधीतांची नियुक्ती बाबतची मुळ संचिका तपास कामी मिळण्यास विनंती केली. त्यानुसार पोलीस स्टेशन वजिराबाद यांच्याकडे कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/आस्था-सेल/9346/13 दिनांक 20.03.2013 अन्वये मुळ संचिका पोलिस स्टेशन वजिराबाद नांदेड येथे जमा करण्यात आली आहे.

या दरम्यान मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्रं. 2572/2012 अन्वये दाखल याचिकेत याचिकाकर्त्यांने मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांचे निदर्शनास आणून दिले आहे की, संबंधीतांच्या शैक्षणिक अर्हतेच्या इयत्ता दहावीची टी.सी. आणि सनद इत्यादी महाविद्यालयीन कागदपत्रांवर जन्म तारीख 12.08.1977 अशी असतांना संबंधीतांने साद्या कागदावर शपथपत्र देवुन आणि ग्रामपंचायतचे खोटे दस्तावेज तयार करुन त्यावर स्वता:ची जन्म तारीख ही 21.10.1978 दर्शवून शासकिय नौकरी मिळविलेली आहे त्यामुळे त्यांची केलेली नियुक्ती रद्द करावी म्हणून श्री लक्ष्मीकांत टाकळकर यांनी याचिका दाखल केली त्या याचिकेच्या अनुषंगाने दिनांक 22.01.2014 रोजी मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांनी निर्णय दिला तो पुढील प्रमाणे आहे. **Learned counsel for respondent no.3 informs that in view of renewal of the contract, respondent no.3 continued in employment and the last extension granted by the Municipal Corporation has expired on 31.12.2013. In this view of the matter, the challenge raised to the contractual employment of respondent no.3 is rendered infructuous. It would be open for the Municipal Corporation to take appropriate steps and after observing the procedure prescribed in that behalf, the Municipal Corporation may take decision afresh in the matter of providing for contractual employment under the scheme if any.**

"कंत्राटी जनसंपर्क अधिकारी" श्री गोविद बालाप्रसाद करवा यांना दि. 31.12.2013 चा तांत्रीक खंड देवुन दि. 01.01.2014 ते 29.06.2014 पर्यंत मुदतवाढ देणे बाबत निर्णय घेणेसाठी महापालिका सर्वसाधारण सभेपुढे महापालिका प्रशासना मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तदनंतर संबंधीतास कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आस्था-सेल/3219/14 दि. 21.05.2014 अन्वये दिनांक 31.12.2013 चा तांत्रीक खंड देवुन दिनांक 01.01.2014 पासुन दर सहा महिण्याला एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन पुढील आदेशा पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

दरम्यानच्या काळात स्थायी समितीने ठराव क्रं. 5 दिनांक 07.07.2014 अन्वये निर्णय घेतला की नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत खोटया दस्तावेजाचा आधार घेवुन श्री गोविंद बालाप्रसादजी करवा यांनी जनसंपर्क अधिकारी या पदावर नियुक्ती मिळविली म्हणून त्यांचे विरुध्द भा.द.वि. 420 आणि तत्सम कलमा अंतर्गत वजिराबाद पोलीस स्टेशनला गुन्हयाची नोंद असून सध्या हे प्रकरण मा. जिल्हा सत्र न्यायालय नांदेड येथे न्यायप्रविष्ठ आहे. तसेच श्री गोविंद करवा यांनी त्यांच्या नेमणूकीच्या संदर्भात दाखल केलेल्या याचिकेत मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांनी दि.22 जानेवारी 2014 च्या निर्णयात जनसंपर्क अधिकारी या पदावर नियुक्ती करण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत आणि महानगरपालिकेने रितसर भरती प्रक्रियेचा अवलंब करुन जनसंपर्क अधिकारी हे पद भरण्यात यावे असे नमुद आहे. त्याअनुंषगाने आयुक्तानी श्री गोविंद करावा यांना मुदतवाढ देण्या संबंधीतचा प्रस्ताव महानगरपालिका सभेसमोर मान्यतेसाठी नगर सचिवाकडे पाठविला होता परंतु आचारसंहितेमुळे महानगरपालिकेची सभा होवू शकली नाही. त्यामुळे सदरचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या महासभेसमोर मांडता आला नाही. दरम्यानच्या काळात आयुक्तांनी नगरसचिवांना पत्र देवुन जनसंपर्क अधिकारी यांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मागे घेत असल्याचे कळविले आणि महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची मान्यता न घेता श्री गोविंद करवा यांना मुदतवाढ देण्याचा आदेश पारीत केला, आयुक्तांची ही कार्यवाही मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांचे निर्णयाचा व महासभेच्या अधिकाराचा अवमान करणारी असल्याने ही नांवामनपा स्थायी समितीची सभा असा निर्णय घेते की, श्री गोविंद बालाप्रसाद करवा "कंत्राटी जनसंपर्क अधिकारी" यांना दिलेली मुदतवाढ आज रोजी रद्द करते. श्री गोविंद बालाप्रसाद करवा यांना कोणत्याही प्रकारचे वेतन/मानधन/भत्ते आणि इतर लाभ देण्यात येवु नये. तसेच आयुक्तांनी मुदतवाढ व नियुक्ती रद्द केल्याचे आदेश हा ठराव प्राप्त होताच निर्गमीत करावे. तसेच मुख्यलेखा परिक्षक यांनी श्री गोविंद करवा यांना महानगरपालिकेचे कोणत्याही प्रकारचे वेतन किंवा इतर कोणतेही लाभ मिळणार नाहीत याची दक्षता घ्यावी असे ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. त्यानंतर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने दिनांक 14.08.2014 रोजी ठराव क्रं. 86 दिनांक 14.08.2014 अन्वये नियुक्ती प्राधिकरण या नात्याने प्रशासनास निर्देशीत केले की, यापुर्वी सर्वसाधारण सभेने "जनसंपर्क अधिकारी" या पद निर्मीतीसाठी पारीत केलेला ठराव क्रं. 45 दि. 30.06.2011 हा ठराव रद्द करुन श्री गोविंद करवा यांच्या बोगस जन्म दाखल्या बाबतीत त्यांच्यावर भा.द.वि. कलम 420 चा गुन्हा नोंद असल्याने व सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांचे दिनांक 22.1.2014 रोजीचे आदेश नजरअंदाज करुन आयुक्तांनी नगरसचिव विभागास दि. 11.2.2014 रोजी प्रस्ताव पाठवुन तो प्रस्ताव दि. 21.5.2014 रोजी परत घेवुन संबंधीतास स्वत:च्या अधिकारात मुदतवाढ देवुन मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद व या सर्वसाधारण सभेची अवहेलना केली आहे. त्यामुळे आयुक्तांची शासन स्तरावरुन विभागीय चौकशी करण्यात यावी, तसेच श्री गोविंद करवा यांना तात्काळ बडतर्फ करुन दि. 01.01.2014 पासुन त्यांना दिलेले वेतन वसुल करावे तसेच महानगरपालिकेची आर्थीक परिस्थिती नाजुक असल्यामुळे आस्थापना विभागाची खर्चाची टक्केवारी 35 टक्के पेक्षा जास्त झाली असल्याने "जनसंपर्क अधिकारी" पद निर्मिती बाबत सर्वसाधारण सभेने दिनांक 30.6.2011 रोजी संमत केलेला ठराव क्रं. 45 या व्दारे रद्द करण्याचे सर्वानुमते ठरविले आहे.

या दोन्ही ठरावाच्या अनुषंगाने महापालिका प्रशासनाने अंमलबजावणी करतांना कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आस्था-सेल/9805/14 दिनांक 20.08.2014 अन्वये श्री गोविंद करवा यांना महानगरपालिका सेवेतुन कायमचे कमी करण्यात आले आहे. तसेच कार्यालयीन पत्र क्रं.नावाशमनपा/आस्था-सेल/10101/14 दिनांक 26.08.2014 अन्वये जनसंपर्क अधिकारी या अभिनामाचे पद मंजुरीसाठी या

या

कार्यालया तर्फे सादर केलेला प्रस्ताव रद्द करण्यात यावा असे मा. प्रधान सचिव (2) नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना कळविण्यात आलेले आहे.

वरील प्रमाणे या प्रकरणात कार्यवाही झाल्यानंतर सुध्दा महापालिका प्रशासनाने, संबंधीतास महापालिका सेवेत पून्हा सामावून घेणेसाठी **विशेष बाब समजून** कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/ आस्था-सेल/13663/14 दि. 28.10.2014 अन्वये श्री गोविंद करवा यांनी कामावर पुर्ववत रुजु करुन घेण्या बाबत विनंती अर्ज सादर केलेला होता. त्यांच्या सेवेचा अनुभव व त्यांच्या सेवेची महानगरपालिकेला असलेली आवश्यकता लक्षात घेवुन तसेच त्यांच्या अर्जावर सकारात्मक विचार करुन महापालिका सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्रं. 86 दि. 14.08.2014 चा पुर्नविचार करुन त्यांना सेवेत पुर्ववत ठेवणे उचीत वाटते त्याकरिता महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 86 चा पुर्नर विचार करुन त्यांना जनसंपर्क अधिकारी पदावर सेवेत पुर्ववत रुजु करण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासना मार्फत सर्वसाधारण सभे समोर नियुक्ती प्राधिकरण या नात्याने ठेवण्यात आला होता. परंतु महानगरपालिका सर्वसाधारण सभेने नियुक्ती प्राधिकरण या नात्याने ठराव क्रं. 135 दिनांक 24.11.2014 नुसार श्री गोविंद करवा यांना जनसंपर्क अधिकारी पदावर सेवेत पुर्ववत रुजु करण्याचा **आयुक्तांचा प्रस्ताव सर्वानुमते ना मंजुर केलेला असुन** महापालिके करीता नव्याने कंत्राटी तत्वावर रु. 10,000/- एवढया एकत्रीत वेतनावर यापुर्वी निश्चित करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार वर्तमानपत्रात जाहीरात देवुन विहित प्रक्रिया अवलंबुन गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांची जनसंपर्क अधिकारी म्हणुन प्रथम सहा महिण्या करिता नेमणुक करण्याचे निर्देशित केलेले आहे. या ठरावातील निर्देशानुसार महापालिकेच्या आस्थापना विभागा मार्फत "कंत्राटी जनसंपर्क अधिकारी" या अभिनामाचे पदाची जाहीरात देवुन नव्याने पद भरण्याची कार्यवाही प्रस्तावित केलेली होती.महाराष्ट शासन निर्देशानुसार आकृतीबंध मंजुरीस्तव सादर केला आहे. मंजुरीनंतर त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदरील प्रकरणाची वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेवुन मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद आणि या नियुक्ती प्राधिकरणाच्या निर्णयानुसार महानगरपालिका प्रशासना मार्फत श्री गोविंद बालाप्रसाद करवा यांना मनपा सेवेतुन कायमचे कमी करुन नियुक्ती प्राधिकरणाच्या निर्णयाची अंमलबजावणी केलेली आहे. करिता त्यांना महानगरपालिका सेवेतून कायमचे कमी करण्यात आले असल्याने अपिलाच्या अनुषंगाने संबंधीतास सेवेत पुर्ववत रुजु करून घेता येणार नाही.

**उमेश पवळे** या अपिलावर निर्णय घेण्यासाठी सभापती,यांना अधिकार देण्यात यावे

**संजय मोरे** गरीब कर्मचारी आहेत त्यांचेवर अन्याय करण्यात येवू नये.त्यांना नियमात बसून कामावर कसे घेता येईल ते पहावे. सर्व कर्मचा-याचे अपिल मंजुर करण्यात यावे कोणावरही अन्याय करण्यात येवू अशी सभागृहास विनंती आहे.

**सभापती** मा. उच्च न्यायालयाचे आदेश व महासभेने घेतलेला निर्णयाचा विचार करुन श्री गोविंद बालाप्रसाद करवा यांनी केलेले अपिल फेटाळण्यात येते.तसेच शासनास सादर करण्यात आलेल्या आकृतीबंधात सदरील पद मंजुर झाल्यानंतर विहित प्रक्रिया अवलंबुन नव्याने पद भरण्यासाठी आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १४०** **ठराव**

श्री गोविंद बालाप्रसाद करवा तत्कालीन कंत्राटी जनसंपर्क अधिकारी यांच्या नेमणुक बाबत मनपा स्थायी समितीने ठराव क्रं. 5 दिनांक 07.07.2014 अन्वये निर्णय घेतला की नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत खोटया दस्तावेजाचा आधार घेवुन श्री गोविंद बालाप्रसाद करवा यांनी जनसंपर्क अधिकारी या पदावर नियुक्ती मिळविली म्हणून त्यांचे विरुध्द भा.द.वि. 420 आणि तत्सम कलमा अंतर्गत वजिराबाद पोलीस स्टेशनला गुन्हयाची नोंद असून सध्या हे प्रकरण मा. जिल्हा सत्र न्यायालय नांदेड येथे न्यायप्रविष्ठ आहे. तसेच श्री गोविंद करवा यांनी त्यांच्या नेमणूकीच्या संदर्भात दाखल केलेल्या याचिकेत मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथील रिट याचिका क्रं.2572/2012 ही दाखल करण्यात आली होती सदरील याचिकेवर दि. 22 जानेवारी 2014 च्या निर्णयात जनसंपर्क अधिकारी या पदावर नियुक्ती करण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत आणि महानगरपालिकेने रितसर भरती प्रक्रियेचा अवलंब करुन जनसंपर्क अधिकारी हे पद भरण्यात यावे असे नमुद आहे. संबंधीताची कंत्राटी जनसंपर्क अधिकारी यांना दिलेली मुदतवाढ आज रोजी रध्द करते त्यांना कोणत्याही प्रकारचे वेतन/मानधन/भत्ते आणि इतर लाभ देण्यात येवू नये तसेच आयुक्तांनी मुदतवाढ व नियुक्ती रध्द केल्याचे आदेश हा ठराव प्राप्त होताच निर्गमीत करावे तसेच मुलेप यांनी संबंधीतांस कोणत्याही प्रकारचे वेतन किंवा इतर कोणतेही लाभ मिळणार नाही याची दक्षता घ्यावी असे ही स्थायी समितीची सभा सर्वानुमते समंत करते असा ठराव पारीत केलेला आहेत.

तसेच संबंधीता विरुध्द मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथील रिट याचिका क्रं.2572/2012 ही दाखल करण्यात आली होती सदरील याचिकेवर दि. 22 जानेवारी 2014 च्या निर्णयानुसार महानगरपालिका सभा सक्षम असल्याने दिलेल्या निर्णयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने दिनांक 14.08.2014 रोजी ठराव क्रं. 86 अन्वये नियुक्ती प्राधिकरण या नात्याने प्रशासनास निर्देशीत केले की, यापुर्वी सर्वसाधारण सभेने "जनसंपर्क अधिकारी" या पद निर्मीतीसाठी पारीत केलेला ठराव क्रं. 45 दि. 30.06.2011 हा ठराव रद्द केलेला आहे तत्कालीन कार्यरत असलेल्या कंत्राटी जनसंपर्क अधिकारी श्री गोविंद करवा यांना कायमचे कामावरुन बडर्फ (कमी) करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संबंधीतास प्रशासना मार्फत कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आस्था-सेल/9805/14 दिनांक 20.08.2014 अन्वये संबंधीतास सेवेतुन कायमचे कमी करण्यात आले आहे.

कार्यालयीन पत्र क्रं.नावाशमनपा/आस्था-सेल/10101/14 दिनांक 26.08.2014 अन्वये जनसंपर्क अधिकारी या अभिनामाचे पद मंजुरीसाठी या कार्यालया तर्फे सादर केलेला प्रस्ताव रद्द करण्यात यावा असे मा. प्रधान सचिव (2) नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना कळविण्यात आलेले आहेत.

मा. उच्च न्यायालयाचे आदेश व महासभेने घेतलेला निर्णयाचा विचार करुन श्री गोविंद बालाप्रसाद करवा यांनी केलेले अपिल ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते फेटाळण्यात येते.

तसेच शासनास सादर करण्यात आलेल्या आकृतीबंधात सदरील पद मंजुर झाल्यानंतर विहित प्रक्रिया अवलंबुन नव्याने पद भरण्यासाठी आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावे असे ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.२९**

**अपील** **दिनांक १७.०८.२०१५**

**प्रति,**
**मा. सभापती साहेब,**
**स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**प्रकरण:-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ची कलम ५६ (४) मधील तरतुदीनुसार

मा. सभापती महोदय यांचे न्यायालयात मी दिनांक ०१.०७.२०१४ चे बडतर्फीच्या आदेश विरुध्द अपिल करीत आहे.

माझी नियुक्ती आपल्या कार्यालयात दिनांक १४.०६.०७ रोजी पुरुष मजुर या पदावर झाली नेमणुक दिनांका पासुन माझ्या निलंबन दिनांका पर्यंत म्हणजे दिनांक ०३.०७.१३ पर्यंत मी नियमीत व प्रमाणीकपणे सेवा केली मी कर्तव्यात कोणतीही चुक कंली नाही निलंबीत केल्या नंतर मला दिनांक ०१.०७.१४ रोजी अचानकपणे सेवेतुन बडतर्फ करणेचा आदेश देण्यात आला त्यामुळे मी हताश झालो आता आपल्या कुटूंबाचे कांही खेरे नाही त्यामुळे माझे मानसिक संतुलन बिघडले माझे शिक्षण अतिशय कमी झालेले आहे मला कायदा फारसा कळत नाही बडतर्फीचे आदेशा विरुध्द विहित मुदतीत अपिल दाखल करावे हे ही मला निट कळत नव्हते भांभावलेल्या अवस्थेत मानसिक संतुलन बिघडलेले असल्यामुळे मला अपिल करण्यास विलंब झालेला आहे मा. महोदयांना विनंती करण्यात येते की सदर प्रकरणात झालेला विलंबन क्षमापित करुन माझे अपिल मान्य करावे झालेल्या विलंबा बाबत मला क्षमा करावी

मा. महोदय मी माझे अपिल खालील प्रमाणे सादर करीत आहे

मी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत दि. १४.०६.०७ रोजी पुरुष मजुर या पदावर सेवत नियमीत होतो मला झोन क्रं. ३ इतवारा नांदेड यांनी प्रभारी वसुली लिपीकाचे काम करण्यास आदेशीत केले त्यानुसार मी वसुलीचे काम केले मी अत्यंत निष्ठेने आणि प्रमाणीकपणे वसुलीचे काम करीत होतो कामात कुचराई करीत नसे वरिष्ठांचे आदेशांचे मी नेहमीच पालन केले आहे माझ्या सेवा कालावधीत मला कर्तव्यात कसुर केल्या बाबत एकही नोटीस दिली नाही.

कोणतीही पुर्व सुचना अथवा नोटीस न देता मला अचानक पणे दि. ३१.०७.१३ रोजी निलंबीत केले निलंबीत केल्या नंतर मला ज्ञापन व जोडपत्र १ ते ४ देण्यात आले जोडपत्र १ मध्ये माझ्यावर खालील प्रमाणे दोषा आरोप करण्यात आले.

१) मालमत्ता धारकांना मालमत्ता कराची रक्कम वसुल करुन मालमत्ता धारकांना पावती दिल्यानंतर मुळ पावती पुस्तके मध्ये खाडाखोड करणे.
२) मालमत्ता धारकाकडून सालसन २०११ मध्ये मालमत्ता कराची रक्कम वसुल करुन सदरची रक्कम ही कार्यालयात सालसन २०१३ या वर्षा मध्ये भरणे
३) कर निरीक्षक यांना वसुलीसाठी लागणारे अभिलेखे तपासणीसाठी न देणे
४) वसुल केलेल्या रक्कमेची नोंद नमुना क्रं. ५० या रजिस्टर मध्ये नोंद न घेणे
५) ज्या वर्षा मध्ये दिलेल्या पावती पुस्तीका त्याच वर्षामध्ये न वापरने
६) मालमत्ता धारकाकडून वसुल केलेली मालमत्ता कराची रक्कम दिर्घकाळ वापरुन सदरची रक्कम कार्यालयात न भरणे
७) वसुलीसाठी लागणारे अभिलेखे कार्यालयात न ठेवणे
८) मालमत्ता कराची वसुल केलेल्या रक्कम पैकी रुपये ४,५७,६०२/- एवढया रक्कमेचा अपहार केला असून सदरची रक्कम अद्याप पर्यंत कार्यालयात भरणा केलेली नाही.

माझ्यावर लादलेल्या वरील दोषारोपाचे लेखी स्पय्ष्टीकरणे मी दि. ०७.०९.१३ रोजी सदर केले माझ्यावर लादलेले सर्व दोषारोप खोटे असल्यामुळे माझ्या स्पष्टीकरणात ते मी अमान्य केले दोषारोप अमान्य केल्यामुळे माझ्या विरुध्द विभागीय चौकशी करुन चौकशी अधिकारी यांची नेमणुक करण्यात आली चौकशी अधिकारी यांच्या समोर मी माझ्या बयानात माझ्यावर लादलेले सर्वच खोटे दोषारोप असल्यामुळे ते मी अमान्य केले उलट माझ्यावर एकही दोषारोप सिध्द होत नाही हे सुध्दा मी दाखवून दिले. साक्षीदाराच्या घेण्यात आलेल्या साक्षीनुसार माझ्यावर लादलेला एकही दोषारोप सिध्द होत नाही असे असतांना देखील चौकशी अधिकारी यांनी वस्तुस्थितीचा व नियमाचा तसेच साक्षीदाराच्या साक्षीचा कायदेशीर दृष्टीचा विचार न करता अकस बुध्दीने माझ्यावर लादलेले दोषारोप सिध्द होतात असा चुकीचा चौकशी अहवाल सादर केला आहे.माझ्यावर मुख्यदोषारोप हा ४,५७,६०२/- एवढा रक्कमेचा अपहार करुन सदरची रक्कम कार्यालयात भरली नाही असा आहे. मी माझ्या सेवा कालावधीत दररोज वसुल केलेली रक्कम दररोज कार्यालयात भरते असे त्याची नोंद सुध्दा नमुना क्रं. ५० या रजिस्टर मये लिहित होतो. दरवर्षी सदर अभिलेखाचे ऑडीट ऑडीटर कडून होत असते आत पर्यंत झालेल्या ऑडीट मध्ये माझ्या विरुध्द कोणताही ऑडीट

प्यॉरा आला नाही तरी सुध्दा सालसन २०१०-११, २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ या आर्थीक वर्षात वरील रक्कमेचा अपहार केला असल्याचा खोटा दोषारोप लावुन अतिशय चुकीच्या पध्दतीने नियम बाहय रीतीने कायद्याला बगल देवुन दोषारोप सिध्द होतो असा चौकशी अहवाल चौकशी अधिकारी यांनी सादर केला जो चुकीचा आणि निराधार आहे. माझ्याकडे असलेले अभिलेखे व इतर साहीत्य मी दिनांक ०३.१०.१३ रोजी कार्यालयात जमा केले असतांना देखील वसुल केलेल्या रक्कमेची दरररोज नोंद नमुना क्रं. ५० या रजिस्टर मध्ये घेतली असतांना देखील माझ्यावर रक्कमेचा अपहार सिध्द होतो असा चौकशी अहवाल सादर करुन चौकशी अधिका-यांनी माझ्यावर अन्याय केला सदर चौकशी अहवाला वरुन मला मनपा सेवेतुन दिनांक ०१.०७.१४ रोजी बडतर्फ करुन माझ्यावर व माझ्या कुटूंबियावर अन्याय केला आहे.

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ (३) मधील तरतुदीनुसार कर्मचा-यास सेवेतन बडतर्फ करणे पुर्वी त्यांना वाजवी संधी देणे आवश्यक आहे स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे अशा कार्यपवाही करीत असतांना चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला चौकशी अहवालाची एक प्रत अपचारी कर्मचारी यांना देवुन त्यांचे संपूर्ण सेवा कालावधीतील अनियमीतता, केलेला अपहार, कर्तव्यात कसुर, दंड, शिक्षा इत्यादी या तपशिल देवुन अपचारी कर्मचा-यास बोलकी नोटीस देणे आवश्यक आहे परंतु मला कोणतीच नोटीस मिळाली नाही चौकशी अहवालाची प्रत ही मिळाली नाही स्थायी समितीची मान्यताही घेतली नाही. वरील कायद्यातील तरतुदी लक्षात न घेता मला मनपा सेवेतुन नियमबाहय रितीने बेकायदेशीर बडतर्फ करुन माझ्यावर अन्याय केला आहे तसेच माझ्या कुटूंबियावर सुध्दा घोर अन्याय झाला आहे.

**विनंती**

मा. महोदयांना विनंती करण्यात येते की, अपिल करणेस झालेला विलंब क्षमपित करुन माझे अपिल स्वीकारण्यात यावे तसेच मी कोणताही कसुर केला नाही तसेच मी मनपा रक्कमेचा अपहार केला नसल्यामुळे चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या चौकशी अहवाला वरुन मला मनपा सेवेतुन बडतर्फ केल्याचा दिनांक ०१.०७.१४ चा आदेश रद्द करण्यात यावा व मला पुर्व लक्षी प्रभावाने सेवेत रुजु करुन घ्यावे ही विनंती

अपिलार्थी
स्वाक्षरीत/-
मनोज शंकर शितळे
बडतर्फ पुरुष मजुर (प्र. वसुली लिपीक) नावाशमनपा नांदेड

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

उपरोक्त संदर्भीय विषयी श्री मनोज शंकरराव शितळे, पुरूष मजुर (प्र.लिपीक) यांनी मालमत्ता धारकांना मालमत्ता कराची रक्कम वसुल करुन मालमत्ता धारकांना पावती दिल्यानंतर मुळ पुस्तिकेमध्ये खाडाखोड करुन महानगरपालिकेच्या रु.4,57,602/- (अक्षरी चार लाख सत्तावन हजार सहाशे दोन रुपये) रक्कमेचा अपहार केल्यामुळे कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-3/8787/13, दि.31.07..2013 अन्वये संबंधितांस निलंबीत करण्यात आले. निलंबन प्रकरणी संबंधिताविरुध्द कार्यालयीन ज्ञापन व दोषारोप जोडपत्र 1 ते 4 क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-3/10615/13, दि.26.08.2013 अन्वये ज्ञापन व दोषारोप जोडपत्र 1 ते 4 बजावण्यात येवुन खुलासा मागविण्यात आला. संबंधितांने दिनांक 07.09.2013 अन्वये खुलासा सादर करुन लादण्यात आलेले दोषारोप अमान्य केल्यामुळे कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-3/20892/13, दि.27.11.2013 अन्वये संबंधिताविरुध्द विभागीय चौकशी आदेशीत करुन चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली.

सदरील प्रकरणी चौकशी अधिकारी यांनी अपचारी कर्मचा-याविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची चौकशी केली असुन चौकशी अधिकारी यांनी दिनांक 20.06.2014 रोजी अहवाल सादर केला. सदर अहवालामध्ये संबंधिता विरुध्द लावण्यात आलेल्या दोषारोपा पैकी 1 ते 8 सिध्द होत असुन दोषारोप क्र.9 मधील रक्कमेसंबंधी श्री मनोज शंकरराव शितळे, पुरूष मजुर (प्र.लिपीक) यांनी पदभार घेतल्यापासुन प्रत्यक्षात रु.5,50,543/- (अक्षरी पाच लाख पन्नास हजार पाचशे त्रेचाळीस) वसुल करुन मनपा फंडात रु.3,01,263/- (तीन लक्ष एक हजार दोनशे त्रेसष्ठ रु.) जमा केली व उर्वरीत रु.2,49,380/- (अक्षरी रु.दोन लक्ष एकोन पन्नास हजार तीनशे ऐंशी) रुपयाचा अपहार केला असल्याचा पावती पुस्तकाच्या वसुल केलेल्या रक्कमेचा व चलनाव्दारे मनपात जमा केलेल्या रक्कमेवरुन निदर्शनास येते. श्री मनोज शंकरराव शितळे, पुरूष मजुर (प्र.लिपीक) यांनी प्रत्यक्षात रु.2,49,380/- (अक्षरी रु.दोन लक्ष एकोन पन्नास हजार तीनशे ऐंशी) पावत्यात खाडाखोड करुन वसुल केलेल्या रक्कमेपेक्षा कमी भरणा केली आहे. ही रक्कम चौकशी अहवाल सादर झाल्यानंतरही दिनांक 18.06.2014 पर्यंत भरणा केलेला नाही असा अभिप्राय सहाय्यक आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी, क्षेत्रिय कार्यालय क्रमांक 3 इतवारा मनपा नांदेड यांनी अहवाल दिला आहे. शासकीय रक्कमेचा अपहार करणे ही अतिशय गंभीर स्वरुपाची बाब असुन कार्यालयीन शिस्तीच्या विरुध्द असल्याने संबंधितांस कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-3/6202/14, दिनांक 01.07.2014 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (2) (ह) मधील तरतुदीनुसार मनपा सेवेतुन पुरुष मजुर (प्र.वसुली लिपीक) या पदावरुन पुढे नौकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशा प्रकारे कायमचे बडतर्फ करण्यात आले आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतूदीच्या अधिन ज्या कोणत्याही नगर पालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालिके व्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, असा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिन्याच्या आत ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील करता येईल अशी तरतूद आहे.

करीता संबंधितावर लादलेली शास्तीबाबत संबंधितांने उक्त तरतुदीनुसार विहित मुदतीत अपिल केले नसल्यामुळे व संबंधिताची सेवा महानगरपालिकेच्या हिताची नसल्याने त्यांना कामावर घेता येणार नाही.

**सभापती** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत अपिल केले नसल्यामुळे व संबंधिताची सेवा महानगरपालिकेच्या हिताची नसल्याने त्याचे अपिल फेटाळण्यात येते.

**ठराव क्रं.१४१** **ठराव**

श्री मनोज शंकर शितळे. बडतर्फ पुरुष मजुर (प्र. वसुली लिपीक) यांना नांदेड कार्यलयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-3/6202/14, दिनांक 01.07.2014 अन्वये महाराष्ट्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (2) (ह) मधील तरतुदीनुसार मनपा सेवेतुन पुरुष मजुर (प्र.वसुली लिपीक) या पदावरुन पुढे नौकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशा प्रकारे कायमचे बडतर्फ करण्यात आले असून या शास्ती विरुध्द श्री मनोज शंकर शितळे. यांनी स्थायी समितीकडे केलेले अपिल असून सदरील अपिल हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत नसल्यामुळे व संबंधिताची सेवा महानगरपालिकेच्या हिताची नसल्याने त्याचे अपिल ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते फेटाळते.

**विषय क्रं.३०** **अपील** **दिनांक ०७.०८.२०१५**

**प्रति,**
**मा. सभापती साहेब,**
**स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**प्रकरण:-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ची कलम ५६ (४) मधील तरतुदीनुसार

मा. सभापती महोदय यांचे न्यायालयात मी दिनांक ०४.०७.२०१४ चे बडतर्फीच्या आदेश विरुध्द अपिल करीत आहे.

**महोदय,**

१) मला कार्यालयाने दि. ०४.०७.१४ रोजी मनपा सेवेतुन बडतर्फ केल्यचा आदेश दिला त्यामुळे हाताष व निराश होऊन सर्व कांही संपले असे समजुन मी माझी शुध्द हरवुन बसलो हातो त्यामुळे विहित मुदतीत मी हे अपिल दाखल करु शकलेला नाही. त्यामुळे सर्व प्रथम मी विलंबा बद्दल माफी मागतो आहे आणि मी माझे अपिल पुढील प्रमाणे सादर करीत आहे.

२) मी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत दि. २१.०२.२०२२ रोजी पुरुष मजुर या पदावर सेवत नियमीत होतो मला झोन क्रं. ३ इतवारा नांदेड यांनी प्रभारी वसुली लिपीकाचे काम करण्यास आदेशीत केले त्यानुसार मी वसुलीचे काम केले वसुलीचे काम मी अत्यंत निष्ठेने आणि प्रामणिकपणे केले आहे वसुल करण्यात आलेली रक्कम नियमीतपणे कार्यालयात जमा करीत होतो सालसन २०१३-१४ मध्ये माझ्या घरगुती अडचणीमुळे माझे मानसिक संतुलन बिघडले होत माझी प्रकृती ठिक नव्हीती नतर चुकीने वसुल केलेली रक्कम भरण्यास विलंब झाला त्याबाबत माझ्या मानसिक स्थितीचा विचार करुन मला क्षमा करण्यात यावी.

३) तदनंतर मला कार्यालयाने वसुल करण्यात आलेली रक्कम २४ तासाचे आत कार्यालयात जमा करावी असे लेखी कळविण्यात आले मी २४ तासासचे आतच वसुल केलेली रक्कम रु. ३,०५,१४१/- कार्यालयात जमा केली.

४) तदनंतर मला कोणतीही पुर्व कल्पना अथवा नोटीस न देता दि. ३१.०७.१३ रोजी निलंबित करुन माझ्यावर खालील प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आले.

१) सालसन २००८-०९ ते २०१३-१४ या आर्थीक वर्षाचे वसुलीसाठी लागणारे अभिलेखे कार्यालयात न ठेवणे
२) शासकिय रक्कमेचा अपहार करणे
३) मालमत्ता धारकांकडून सालसन २०११ मध्ये मालमत्ता कराची रक्कम वसुल करुन सदरची रक्कम ही कार्यालयात सन २०१३ मध्ये भरणे
४) सालसन २०१३ हे आर्थीक वर्ष संपल्यानंतर पुस्तीकेतील न वापरण्यात आलेल्या पावत्या रद्द न करता त्या पावत्या चालु वर्षात वापरुन वसुल केलेली रक्कम कार्यालयात न भरणे
५) सालसन २०१३-१४ या आर्थीक वर्षा मध्ये नविन पावती पुस्तक घेवुन त्या पावती पुस्तीके मध्ये मालमत्ता कराची वसुली करुन सदरील रक्कम कार्यालयात न भरणे
६) सालसन २०१३-१४ या आर्थीक वर्षामध्ये नविन पावती पुस्तक घेवुन त्या पावती पुस्तीकेमध्ये मालमत्ता कराची वसुली करुन सदरील रक्कम कार्यालयात न भरणे
७) कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित न राहणे
८) मालमत्ता धारकाकडून वसुल केलेली मालमत्ता कराची रक्कम दिर्घकाळ वापरुन रक्कम कार्यालयात न भरणे.

माझ्यावर वरील लावलेले दोषारोप ज्ञापना सोबत मला देण्यात आले त्याचे स्पष्टीकरण मी सादर करुन लादण्यात आलेले दोषारोप मी अमान्य केले कार्यालयाने माझ्या विरुध्द खातेनिहाय विभागीय चौकशी करुन चौकशी अधिका-यांची नेमणुक केली, चौकशी अधिकारी यांच्यापुढे साक्षीदाराच्या साक्षी, माझी जबानी घेण्यसात आली तर कांही साक्षीदारानी त्यांच्या जबनित माझेवर लादलेले जबाब सिध्द होतात अशा आशयाची जबानी नोंदविली नाही मी ही माझ्यावर लादलेले दोषारोप नाकारले असे असतांना देखील चौकशी अधिकारी यांनी वस्तुस्थितीचा वनियमांचा विचार न करता माझ्यावर लादलेले दोषारोप सिध्द होतात असा चौकशी अहवाल सादर केला जो की माझ्यावर अन्याय करणारा

आहे सदर झालेल्या चौकशी अहवाला वरुन मला दि. ०४.०६.१४ रोजी नियम बाहय व बेकायदेशीर रित्या मनपा सेवेतुन बडतर्फ करुन माझ्यावर व माझे कुटूंबियावर अन्याय केला आहे.

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ (३) नुसार अपचारी कर्मचा-यास सेवेतुन बडतर्फ करणेपुर्वी त्यांना वाजवी संधी देवुन स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे त्याशिवाय बडतर्फ करता येत नाही असे अधिनियमात प्रावधान आहे तथापि मी चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला चौकशी अहवाल मिळणे संबंधी दि. १०.०७.१४ रोजी कार्यालयात लेखी अर्ज दिला असतांना देखील मला चौकशी अहवालाची प्रत कार्यालयाने दिली नाही मला बडतर्फ करणेपुर्वी बोलकी नोटीस द्यावयास पाहिजे होती ती सुध्दा दिली नाही. मला माझे म्हणणे मांडण्यासाठी वाजवी सुधी सुध्दा दिली नाही माझे म्हणणे ऐकूण न घेता नियमबाहयरितीने बेकायदेशीर दृष्टया स्थायी समितीची मान्यता घेतलीनसतांना सुध्दा मला सेवेतुन बडतर्फ करुन माझेवर व माझे कुटूंबियावर घोर अन्याय केला आहे.

मला कार्यालयाने लेखी कळविल्यानुसार पत्रातील नमुद संपूर्ण रक्कम रु. ३,०५,१४१/- मी कार्यालयात त्वरीत भरली आहे त्यामुळे रक्कमेचा अपहार करण्याचा प्रश्नच उदभवत नाही माझ्याकडील असलेली सर्व अभिलेखे कार्यालयात माझ्या कपाटात होती माझ्या कपाटास कार्यालयाने सिल लावले होते त्यामुळे मला अभिलेखे देता आली नाही अभिलेखे कार्यालया व्यतिरिक्त मी इतरत्र कुठेही ठेवले नव्हते आजमितीस सुध्दा माझ्याकडे असलेले सर्व अभिलेखे पावत्या, पुस्तीके, कार्यालयातच जमा आहेत माझेवर लादलेले संपूर्ण दोषारोप निराधार आणि निखालस खोटे आहेत तेंव्हा लादलेले दोषारोप फेटाळाण्यात येवून चौकशी अधिकारी यांनी सदर केलेला चौकशी अहवाल फेटाळण्यात यावा.

**विनंती**

मा. महोदयांना विनंती करण्यात येते की, माझे अपिल स्विकारण्यात यावे माझ्याकडे कार्यालयाचे कांहीही येणे नसल्यामुळे चाक्शी अधिकारी यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालावरुन निर्गमीत करण्यात आलेला दि. ०४.०७.१४ चा बडतर्फीचा आदेश रद्द ठरविण्यात यावा व मला पुर्ववत पुर्वलक्षी प्रभावाने सेवेत रुजु करुन घ्यावे ही विनंती.

अपिलार्थी
स्वाक्षरीत/-
राजु पि. मुंजाजी कांबळे
बडतर्फ पुरुष मजुर (प्र. वसुली लिपीक) नावाशमनपा नांदेड

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

**श्री राजु मुंजाजी कांबळे, पुरूष मजूर (प्र.वसुली लिपीक), (निलंबीत),** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हे क्षेत्रिय कार्यालय क्रं.3 येथे प्र.वसुली लिपीक म्हणून कार्यरत असताना त्यांनी मालमत्ता धारकांकडून मालमत्ता कराची रक्कम रु.3,05,141/- (अक्षरी रुपये तीन लक्ष पाच हजार एकशे एक्केचाळीस) वसुल करून त्या रक्कमेचा कार्यालयात भरणा न करता सदरच्या रक्कमेचा खाजगी स्वरुपात वापर केल्याचे कार्यालयाचे निर्दशनास आल्यानंतर ती रक्कम संबंधितांनी तीन टप्प्यात महापालिका फंडात भरणा केल्याचा अहवाल सहाय्यक आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी, क्षेत्रिय कार्यालय क्रं.3 (इतवारा), मनपा नांदेड यांनी दिनांक.29.07.2013 रोजी सादर केल्यामुळे संदर्भ क्र.2 च्या आदेशान्वये संबंधितास निलंबीत करण्यात आले.

निलंबन प्रकरणी संबंधीतांविरूध्द संदर्भ क्र.3 अन्वये ज्ञापन व दोषारोप जोडपत्र 1 ते 4 बजावण्यात येऊन त्याबाबत खुलासा मागविण्यात आला असता, संदर्भ क्र.4 अन्वये संबंधितांनी खुलासा सादर केला असुन त्याद्वारे त्यांच्याविरूध्द ठेवण्यात आलेले दोषारोप संबंधितांनी अमान्य केल्यामुळे संदर्भ क्र.5 अन्वये संबंधितांविरूध्द विभागीय चौकशी करणेसाठी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली.

चौकशी अधिकारी यांनी संबंधितांविरूध्द ठेवण्यात आलेल्या खालील दोषारोपांची चौकशी केली आहे.

**<u>संबंधितांवर ठेवण्यात आलेले दोषारोप खालील प्रमाणे आहे</u> :-**

a) सालसन 2008-09 ते 2013-14 या आर्थिक वर्षाचे वसुलीसाठी लागणारे अभिलेखे कार्यालयात न ठेवणे.
b) शासकीय रक्कमेचा अपहार करणे.
c) मालमत्ता धारकांकडून सालसन 2011 मध्ये मालमत्ता कराची रक्कम वसुल करून सदरची रक्कम ही कार्यालयात सालसन 2013 या वर्षामध्ये भरणे.
d) कर निरीक्षक यांना वसुलीसाठी लागणारे अभिलेखे तपासणीसाठी न देणे.
e) सालसन 2012-13 हे आर्थिक वर्ष संपल्यानंतर पावतीपुस्तिकेतील न वापरण्यात आलेल्या पावत्या रद्द न करता त्या पावत्या चालु वर्षात वापरुन वसुल केलेली रक्कम कार्यालयात न भरणे.
f) सालसन 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये नविन पावती पुस्तक घेवून त्या पावती पुस्तिकेमध्ये मालमत्ता कराची रक्कम वसुल करुन सदरील रक्कम कार्यालयात न भरणे.
g) कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित न राहणे.
h) मालमत्ता धारकांकडून वसुल केलेली मालमत्ता कराची रक्कम दिर्घकाळ वापरुन सदरची रक्कम कार्यालयात न भरणे.

चौकशी अधिकारी यांनी अपचारी कर्मचा-यांविरूध्द ठेवण्यात आलेल्या वरील सर्व दोषारोपांची चौकशी केली असून संदर्भ क्र.6 अन्वये अंतिम चौकशी अहवाल सादर केला आहे, त्यानुसार अपचारी कर्मचा-याविरूध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांपैकी दोषारोप क्र.1,3 व 4, 5, 6, 7 व 8 हे सिध्द होत असून दोषारोप क्र.2 हा शासकीय रक्कमेचा तात्पुरता अपहार झालेला आहे व अपहारीत रक्कम रु.3,05,141/- (अक्षरी

रुपये तीन लक्ष पाच हजार एकशे एक्केचाळीस) ही संबंधितांनी चा.क्रं.1 द्वारे दि.08.07.2013 रोजी रु.1,50,384/-(अक्षरी रुपये एक लक्ष पन्नास हजार तिनशे चौ-याऐं शी ) एवढी रक्कम व चालान क्रं.2 द्वारे दि.09.07.2013 रोजी रु.1,24,070/- (अक्षरी रुपये एक लक्ष चोविस हजार सत्तर) त्यानंतर दि.15.07.2013 चालान द्वारे रु.1877/- (अक्षरी रुपये एक हजार आठशे सत्त्यातर) अशी महापालिका फंडात उशिराने जमा केली आहे, असा अहवाल दिला असुन दोषारोप क्रं.2, 3 व 8 हे एकाच प्रकारात मोडणारे आहेत म्हणजे पैसे वसुल करुन विलंबाने भरणे व शासकीय पैशाचा तात्पुरता अपहार केल्याचे सिध्द झाले असल्याचा अहवाल दिला आहे.

याशिवाय संबंधितांकडून पुढीलप्रमाणे 22 पावती पुस्तके कार्यालयात जमा करण्यात आलेली नसुन ती गहाळ आहेत, असेही चौकशी अहवालामध्ये नमुद आहे.

| अ.क्रं. | आर्थिक वर्ष | देण्यात आलेली पावती पुस्तकांची संख्या | उपलब्ध पावती पुस्तकांची संख्या | गहाळ पावती पुस्तकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1) | सन 2007-08 | 02 | --- | 02 |
| 2) | सन 2008-09 | 07 | 06 | 01 |
| 3) | सन 2009-10 | 08 | 05 | 03 |
| 4) | सन 2010-11 | 06 | 02 | 04 |
| 5) | सन 2011-12 | 06 | 01 | 05 |
| 6) | सन 2012-13 | 06 | --- | 06 |
| 7) | सन 2013-14 | 01 | --- | 01 |
| **एकूण** | | **36** | **14** | **22** |

करिता, उक्त सर्व बाबी विचारात घेता संबंधिताविरूध्दचे दोषारोप सिध्द झाले असून संबंधितांनी रु.3,05,141/- (अक्षरी रुपये तीन लक्ष पाच हजार एकशे एक्केचाळीस) चा तात्पुरता अपहार केल्याचे व वरील नमुद पावती पुस्तके गहाळ केल्याचे सिध्द झाल्यामुळे त्यांना यापुढे महानगरपालिका सेवेत ठेवणे महापालिकेच्या हिताचे नसल्यामुळे **श्री राजु मुंजाजी कांबळे, पुरूष मजूर** (प्र.वसुली लिपीक) (निलंबीत) यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (2) (ह) मधील तरतुदीनुसार महानगरपालिका सेवेतून त्यांच्या **पुरूष मजूर** या मुळ पदावरून पुढे नौकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल, अशा प्रकारे सेवेतून कायमचे बडतर्फ कार्यालयीन आदेश क्रमांक जा.क्रं.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-2/6577/14 दिनांक 04.07.2014 अन्वये त्यांना बडतर्फ करण्यात आले. व त्यांच्या विरूध्द पोलिस स्टेशन इतवारा येथे गुरन 88/2014 कलम 420,206,409 भादवी मधील गुन्हा नोंदवीला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतूदीच्या अधिन ज्या कोणत्याही नगर पालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालिके व्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, असा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिन्याच्या आत ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील करता येईल अशी तरतूद आहे. संबधितास दिनांक 04.07.2014 रोजी बडतर्फ केल्यावर जवळ जवळ 1 वर्ष 2 महिने नंतर त्यांनी स्थायी समितीकडे आपील केले व संबधितास लावलेले गुन्हे हे गंभिर स्वरूपाचे असून त्यांना महानगरपालिका सेवेत ठेवणे मनपाच्या हिताचे नसल्यामुळे त्यांना पुर्नरस्थापीत करता येत नाही.

**सभापती** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत अपिल केले नसल्यामुळे व संबधितास लावलेले गुन्हे हे गंभिर स्वरूपाचे असून त्यांना महानगरपालिका सेवेत ठेवणे महानगरपालिकेच्या हिताचे नसल्यामुळे त्यांचे अपिल फेटाळण्यात येते.

**ठराव क्रं.१४२** **ठराव**

श्री राजु पि. मुंजाजी कांबळे बडतर्फ पुरुष मजुर (प्र. वसुली लिपीक) नावाशमनपा नांदेड जा.क्रं.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-2/6577/14 दिनांक 04.07.2014 अन्वये त्यांना बडतर्फ करण्यात आलेले आहे व त्यांच्या विरूध्द पोलिस स्टेशन इतवारा येथे गुरन 88/2014 कलम 420,206,409 भादवी मधील गुन्हा नोंदवीला आहे या शास्ती विरुध्द श्री राजु पि. मुंजाजी कांबळे बडतर्फ पुरुष मजुर यांनी स्थायी समितीकडे केलेले अपिल असून सदरील अपिल हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड) च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत नसल्यामुळे व संबधितास लावलेले गुन्हे हे गंभिर स्वरूपाचे असून त्यांना महानगरपालिका सेवेत ठेवणे महानगरपालिकेच्या हिताचे नसल्यामुळे त्यांना पुर्नरस्थापीत करता येत नाही. करीता त्याचे अपिल ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते फेटाळते.

**विषय क्रं.३१** **अपील** **दिनांक ०४.०६.२०१५**

**प्रति,**
**मा. सभापती साहेब,**
**स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**विषय :-** गोठविण्यात आलेली एक वार्षीक वेतनवाढ पुर्ववत चालु करणे बाबत.

संदर्भ :- १) कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/आस्था-६/९४१६/०६ दि. ०४.१०.०६

२) महाराष्ट्र शासन सामानय प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं. सीडीआर-१३९६/प्र.क्र.६/११-अ दि. ३० जुलै २००६

३) कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/आस्था-१/१४६७८/०७ दि. ०८.०२.०७

४) कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/आस्था-६/२५३८/१५ दि. २५.०५.१५

आदरणीय सभापती महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भ क्रं. १ चे आदेशान्वये मला गैरशिस्तीमुळे कार्यालयाने निलंबीत केले होते त्या बाबत मी माझे स्पष्टीकरण सादर करुन माझी चुक कबुल केलेली असल्यामुळे संदर्भ क्रं. २ चे शासन निर्णयात जैसे फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही, परंतु गैर वर्तणुकीच्या कारणास्तव शासकिय सेवकास (विभागीय चौकशी सुरु केलेली असेल अथवा नसेल) निलंबित केलेले असल्यास अशा प्रकरणात पुर्नस्थापित करण्या बाबतचा निर्णय प्रकरण परत्वे गुणवत्तेनुसार घ्यावा असे नमुद असल्यानुसार माझी महानगरपालिकेतील सेवा जेष्ठता लक्षात घेवुन मा. आयुक्त सोबांनी संदर्भ क्रं. ४ चे आदेशान्वये मला कामावर पुन:स्थापित करण्यात आले असून सध्या मी आरोग्य विभागात लिपीक या पदावर कार्यरत आहे. तसेच संदर्भ क्रं. ४ चे कार्यालयीन आदेशाव्दारे मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) मधील तरतुदीनुसार कालावधी क्षमापणाची याचना करुन वरिश्ठ प्राधिकरण स्थायी समितीकडे मर्सी अपिल करण्यात यावे असे कळविण्यात आल्यानुसार यापुर्वीच माझी चुक मी कबुल केलेली असल्यामुळे व पुनश्च अशा प्रकारचे गैरकृत्य माझ्याकडून होणार नसल्या बाबत मी लेखी ग्वाही देत असून मला एवढी मोठी शिक्षा न करता संदर्भ क्रं. ३ चे आदेशान्वये गोठविण्यात आलेली माझी एक वर्षाची वेतनवाढ पुर्ववत चालु करण्यात यावी व त्या बदल्यात कमी शिक्षा माझेवर लादुन माझा उक्त तिन महिण्याचा निलंबन कालावधी शिल्लक असलेल्या रजेत समाविष्ठ करण्यात यावा ही नम्र विनंती.

आपला विश्वासु,<br>स्वाक्षरीत/-<br>दिलीप गोविंदराव गायकवाड<br>लिपीक आरोग्य विभाग नावाशमनपा नांदेड

## प्रशासकिय टिप्पणी

उपरोक्त संदर्भीय विषयी, श्री दिलीप गोविंदराव गायकवाड यांना गैरशिस्तीमुळे कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-6/9416/2006 दिनांक 04.10.2006 अन्वये निलंबित करण्यात आले होते.त्यांची एक वार्षीक वेतन वाढ कायम स्वरुपी गोठवून निलंबन कालावधी निलंबन काळ म्हणून ग्रहित धरुन त्यांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-1/14678/2007 दिनांक 08.02.2007 अन्वये रुजू करुन घेऊन त्यांची पूर्नस्थापना कर विभागात करण्यात आली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56(2)(क) नूसार आयुक्तास महानगरपालिकेने नेमलेल्या कोणत्याही अधिका-यावर पोट कलम (2) खंड (अ)(ब)(ड) व (ख) मध्ये विनिदिष्टी केलेल्या शास्ती पैकी कोणतीही शास्ती लादता येईल त्यानूसार संबंधितास उक्त अधिनियमातील तरतूदीनूसार किरकोळ शास्ती लादण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतूदीच्या अधिन ज्या कोणत्याही नगर पालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालिके व्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, असा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिन्याच्या आत ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील करता येईल अशी तरतूद आहे.

कार्यालयीन पत्र क्र.नांवामनपा/साप्रवि /आस्था-6/2538/15 दिनांक 25.05.2015 अन्वये त्यांना निलंबन प्रकरणी लादलेली शास्ती किरकोळ स्वरुपाची असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56(2)(ब) अन्वये लावण्यात आलेली शास्ती योग्य आहे असे त्यांना कळविण्यात आले आहे.

करीता संबंधितावर लादलेली शास्ती किरकोळ स्वरूपाची असल्यामुळे ती रद्द किंवा त्यात बदल करता येणार नाही व या प्रकरणी अपीलाची तरतूद नाही.

**उपआयुक्त तथा प्रा.अधिकारी** एकाद्या कर्मचा-यांने अधिका-यांनी गैरवर्तन केले असेल किवा कामात निष्काळजीपणा केला असेल तर अशा अधिका-यास कर्मचा-यास दंड लावणे, वार्षिक वेतनवाढ रोकणे, अशा प्रकारची किरकोळ स्वरुपाची शास्ती लादण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत. मात्र खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, तर अशा शास्ती विरुध्द एक महिन्याच्या आत ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील करता येईल अशी महानगरपालिका अधिनयमात तरतूद आहे. मायनर किरकोळ शास्ती विरुध्द अपिल करण्याची तरतूद नाही.

**सभापती** उपाआयुक्तांनी दिलेल्या अभिप्रायानुसार अपिल फेटाळण्यात येते.

**ठराव क्रं.१४३** **ठराव**

श्री दिलीप गोविंदराव गायकवाड, लिपीक आरोग्य विभाग नावाशमनपा नांदेड यांनी कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/आस्था-१/१४६७८/०७ दि. ०८.०२.०७ यानी गोठविण्यात आलेली माझी एक वर्षाची वेतनवाढ पुर्ववत चालु करण्यात यावी व त्या बदल्यात कमी शिक्षा माझेवर लादुन माझा उक्त तिन महिण्याचा निलंबन कालावधी शिल्लक असलेल्या रजेत समाविष्ठ करण्याचे संदर्भात अपिल केलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतूदीनूसार अधिका-यास किंवा कर्मचा-यास खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, असा आदेश त्यास

कळवल्यापासून एक महिन्याच्या आत निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील तरतूद आहे परतु एखाद्या पालिका कर्मचा-यांने अधिका-यांने गैरवर्तन केले असेल किवा कामात निष्काळजीपणा केला असेल तर अशा अधिका-यास कर्मचा-यास दंड लावणे ,वार्षिक वेतनवाढ रोकणे, अशा प्रकारची किरकोळ स्वरुपाची शास्ती लादण्याचे अधिकार आयुक्तांना असून अशा किरकोळ शास्ती विरुध्द अपिल करण्याची महानगरपालिका अधिनियमात तरतूद नसल्यामूळे श्री दिलीप गोविंदराव गायकवाड, लिपीक आरोग्य विभाग नावाशमनपा नांदेड यांचे उपरोक्त अपिल ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते फेटाळते.

**विषय क्रं.३२**

**अपील** **दिनांक २४.०५.२०१४**

**प्रति,**
**मा. सभापती साहेब,**
**स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**विषय :-** विभागीय चौकशी प्रकरणात मा. आयुक्त नावाशमनपा नांदेठ यांनी लादलेल्या शास्ती विरुध्द अपील.
संदर्भ :- माझा यापुर्वीचा अर्ज दिनांक २७.०२.२०१३

**महोदय,**

उपरोक्त विषयी आपणास विनंती करण्यात येते की मी क्षेत्रीय कार्यालय तरोडा येथील क्षेत्रीय अधिकारी म्हणून कार्यरत असतांना मला तरोडा पोटनिवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या आचारसंहिता पथकात काम करण्यासाठी आदेशीत करण्यात आले होते. दिनांक २३.१०.२०१२ रोजी सौभद्र मंगल कार्यालयात निवडणुक प्रचार सभा चालु असतांना, त्या ठिकाणी मी मद्यप्राशन करुन कर्तव्यावर उपस्थित होते असा माझ्यावर आरोप लावुन मला निलंबीत करुन माझ्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात आली.

विभागीय चौकशी प्रकरणात माझ्यावर खालील प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

१) मद्यप्राशन करुन कर्तव्यावर उपस्थित राहणे.

२) महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम १९७९ चे नियम २८ चे उल्लंघन करणे.

सदर विभागीय चौकशी प्रकरण नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी नियुक्त केलेले चौकशी अधिकारी श्री गोणारकर साहेब यांच्या समक्ष चालविण्यात आले सदर प्रकरणात मी चचौकशी अधिकारी यांच्या समक्ष उपस्थित राहून सदर प्रकरणातील नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांच्या वतीने सादर करण्यात आलेले कागदोपत्री पुरावे कसे बरोबर नाहित आणि हजर करण्यात आलेले साक्षीदार यांच्या साक्षी कशा विसंगत आहेत या बाबत सविस्तर लेखी युक्तीवाद सादर केला आहे.

मा. चौकशी अधिकारी यांनी नावाशमनपाकेच्या वतीने सादर करण्यात आलेले लेखी पुरावे, साक्षीदार यांच्या साक्षी व सादरकर्ता अधिकारी यांचा युक्तीवाद आणि माझ्यावतीने हजर करण्यात आलेल्या साक्षीदाराच्या साक्षी आणि मी सादर केलेल्या लेखी युक्तीवाद यावर विचार करुन आयुक्त मनपा नांदेड यांना अहवाल सादर केला सदर अहलावात चौकशी अधिकारी यांनी मला वरील दोन्ही दोषारोपातुन दोषमुक्त केले आहे. असे असतांना मा. आयुक्त मनपा नांदेड यांनी मा. चौकशी अधिकारी यांचा निष्कर्ष ग्राहय न धरता माझ्या दोन वार्षीक वेतनवाढी पुढील पाच वर्षा पर्यंत स्थगित का करण्यात येवु नये या बाबत खुलासा सादर करण्यासाठी मला दि. ०५.०१.१२ रोजी नोटीस दिली या नोटीसीनुसार मी माझा सविस्तर खुलासा दि. ११.०१.१२ रोजी मा. आयुक्त मनपा नांदेड यांना सादर केला आहे.

असे असतांना मी सादर केलेला खुलासा आणि मा. चौकशी अधिकारी यांचा अहवाल ग्राहय न धारता वैद्यकिय अधिकारी श्री गुरुगोविंदसिंघ्जजी हॉस्पीटल नांदेड यांचा अहवाल दि. २३.१०.१० चा अहवाल आणि फॉरेंसिक लॅब औरंगाबाद यांचा अहवाल दि. २९.१०.१० या दोन पुराव्याचा आधार घेवुन कार्यालयाने आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आसथा-१/११६९८/१० दिनांक १३.०३.१२ अनवये माझ्या दोन वार्षीक वेतनवाढी पुढील ५ वर्षा पर्यंत गोठविण्याचे आदेश् दिले आहेत तसेच निलंबन कालावधी दि. २५.१०.११ ते ०६.०५.११ हा निलंबन कालावधी म्हणुन गृहीत धरण्यात येतो असा आदेश पारीत केला आहे.

उक्त आदेश दि. १३.०३.१२ हा कसा वस्तुनिष्ठ नाही याची कारणे खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम ११ मधील तरतुदीशी विसंगत असा आहे या नियमाप्रमाणे मा. चौकशी अधिकारी यांच्या निष्कर्षाशी सहमत नसेल तर त्याची थोडक्यात कारणे आणि चौकशी प्राधिकारणाने काढलेल्या निष्कर्षासह शिस्तभग विषयक प्राधिकरणाच्या (मा.आयुक्त) निष्कर्षाचे विवरणपत्र, आदेशासोबत मला दयावयास पाहीजे. परंतु असे कोणतेच कागदपत्र मला देण्यात आलेले नाहीत पुर्वग्रहदुषीतपणे शासती करणारा आदेश काढण्यात आला असावा असे यावरुन दिसुन येते.

शास्ती करणारा आदेश दि. १३.०३.१२ हया ज्या पुराव्या आधारे काढण्यात आले आहे ती म्हणजे वैद्यकीय अधिकारी श्री गुरुगोविंदसिंघजी हॉस्पीटल नांदेड यांचा अहवाल दि. २३.१०.१० आणि फॉरेंसिक लॅब औरंगाबाद यांचा अहवाल दि. २९.१०.१० ही होत या दोन्ही अहवालाचे अवलांकन करता मी दि. २३.१०.१०. रोजी किती वाजल्यापासुन मद्याच्या प्रभावाखाली होतो हे त्यात कोठेच नमुद करण्यात आले नाही. माझा बचाव हा मी दि. २३.१०.१०. रोजी कर्तव्यावर असतांना मद्य प्राश्नन केलो नव्हते कर्तव्य संपल्यानंतर घरी जावुन मद्यप्राशन केलो असा आहे मी घरी गेल्यानंतर श्री रत्नाकरराव वाघमारे उपआयुक्त मनपा नांदड यांनी फोन करुन मला बोलावुन घेतले व गुरुगोविंदसिंघजी हॉस्पीटल नांदड येथे नेले त्यामुळे त्याप्रमाणे अहवाल आला आहे वरील दोन्ही अहवाल आणि श्री रत्नाकरराव वाघमारे यांची जबानी कशी वस्तुनिष्ठ नाही हे मा. चौकशी अधिकारी यांच्या समक्ष सिध्द करण्यात आले आहे.

मी कर्तव्यावर हजर असतांना मद्य प्राश्न केलो होतो या बाबत कोणताही साक्षीदार हजर करण्यात आला नाही त्याउलट माझ्या तर्फे मनपा नांदेडचे कर्मचारी जे माझ्या सोबत कर्तवयावर होते त्यांना साक्षीदार म्हणुन हजर करुन मी कर्तव्यावर असतांना मद्यप्राशन केलो नव्हतो हे सिध्द केले आहे.

वरील सर्व बाबी असतांना मा. चौकशी अधिकारी यांचा अहवाल कारणे न देता ग्राहय धरणे अयोग्य आहे मा. चौकशी अधिकारी यांनी सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर केला आहे तो ग्राहय धरणे आवश्यक आहे.

मा. महोदय वरील सर्व बाबीचा सहानुभुतीपूर्वक विचार करुन स्थायी समितीनक माझे म्हणणे ऐकुन घेवुन मा. आयुक्त मनपा नांदेड यांचा आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-१/११६९८/१२ दि. १३.०३.१२ रद्द करुन लादण्यात आलेली शिक्षा रद्द करुन उपकृत करावे ही विनंती.

आपला विश्वासु,

जगदिश वसंतराव कुलकर्णी सहाय्यक आयुक्त नावाशमनपा नांदेड

**प्रशासकिय टिप्पणी**

उपरोक्त संदर्भीय विषयी, श्री जगदीश वसंतराव कुलकर्णी सहाय्यक आयुक्त मनपा नांदेड यांना तरोडा पोट निवडनूकीमध्ये क्षेत्रिय अधिकारी म्हणुन कार्यरत असतांना पोट निवडणूकीमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या आचारसंहिता पथकात काम करण्यासाठी आदेशीत करण्यात आले होते.

निवडणूक संदर्भात दिनांक 23.10.2010 रोजी मा.मुख्यमंत्री यांची रात्री 9.00 वाजता सौभद्र मंगल कार्यालय चैतन्यनगर येथे निवडणूक प्रचार सभेच्या वेळी श्री जगदिश वसंतराव कुलकर्णी सहाय्यक आयुक्त मनपा यांनी मद्यप्राशन केल्याचे समजल्यामुळे मा.उप आयुक्त (विकास) मनपा नांदेड यांनी पोलीस निरिक्षक, भाग्यनगर पोलीस स्टेशन यांना दिनांक 23.10.2010 रोजी पत्र देवुन संबंधितांची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी कळविण्यात आले होते.

मा.वैद्यकीय अधिकारी श्री गुरु गोविंदसिंघजी मेमोरियल हॉस्पीटल यांना पत्र देवुन दिनांक 23.10.2010 रोजी रात्री 10.50 वाजता वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. मा.वैद्यकीय, श्री गुरु गोविंदसिघजी मेमोरियल हॉस्पीटल नांदेड यांनी संबंधितांचे दिनांक 23.10.2010 रोजी वैद्यकीय तपासणी करुन दिलेल्या अहवालामध्ये संबंधित हे मद्यपान केल्याचे सिध्द झाले. त्याआधारे कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा /साप्रवि/आस्था-1/5859/10 दि.25.10.2010 अन्वये संबंधितास निलंबीत करण्यात आले.

तदनंतर पोलीस निरिक्षक पोलीस स्टेशन भाग्यनगर यांनी सविस्तर अहवाल दिला. त्यानुसार संबंधित हे दिनांक 23.10.2010 रोजी रात्री 10.50 वाजता मद्यप्राशन करुन कर्तव्यावर होत असे आढळुन आल्याचे कळविलेले आहे.

पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन भाग्यनगर यांनी संबंधिताचे काढुन ठेवलेले रक्ताचे नमुने सी.ए. तपासणीसाठी मा.उप संचालक न्याय, वैद्यकीय प्रयोगशाळा औरंगाबाद यांच्याकडे पाठविले. पोलीस निरिक्षक पोलीस स्टेशन भाग्यनगर यांनी दिनांक 23.11.2010 रोजी पत्र देवुन फॉरेन्सीस लॅब औरंगबाद यांनी संबंधितांच्या रक्ताच्या नमुण्याचा अहवाल कळविला, तो दिनांक 24.11.2010 रोजी प्राप्त झाला सदरच्या रिपोर्टमध्ये संबंधितांच्या रक्तामध्ये अल्कोहल असल्याचे सिध्द झाले.

तदनंतर संबंधितांस ज्ञापन व दोषारोप जोडपत्र 1 ते 4 बजावण्यात आले व विभागीय चौकशी करण्यात आली. संबंधिताविरुध्द लावण्यात आलेले दोषारोप चौकशी अधिका-यांने सिध्द होवु शकत नाही असा अहवाल दिला. तथापि, मा. वैद्यकीय अधिकारी यांचा रिपोर्ट व फॉरेन्सीस लॅब औरंगाबाद यांच्या अहवालानुसार संबंधित हे कर्तव्यावर असतांना मद्यप्राशन केल्याचे सिध्द होत आहे. वस्तुस्थिती लक्षात घेता संबंधिताच्या दोन वार्षिक वेतनवाढी पुढील 5 वर्षापर्यंत स्थगित का करण्यात येवु नयेत ? याबाबत नोटीस देवुन खुलासा मागविण्यात आला. संबंधिताने दिलेला खुलासा संयुक्तीक नसल्यामुळे तसेच संबंधित हे दोषी असल्याचे सिध्द झाल्यामुळे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे कलम 56 (2) (ब) मधील तरतुदीनुसार संबंधितांच्या दोन वार्षिक वेतनवाढी पुढील 5 वर्षाकरिता गोठविण्यात आल्या आहेत. तसेच संबंधितांचा दिनांक 25.10.2010 ते 26.05.2011 या कालावधीचा निलंबन कालावधी हा कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा /साप्रवि/आस्था-1/11698/12, दिनांक 13.03.2012 अन्वये निलंबन काळ म्हणुन गृहीत धरण्यात आला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56(2)(क) नूसार आयुक्तास महानगरपालिकेने नेमलेल्या कोणत्याही अधिका-यावर पोट कलम (2) खंड (अ)(ब)(ड) व (ख) मध्ये विनिदिष्टी केलेल्या शास्ती पैकी कोणतीही शास्ती लादता येईल त्यानूसार संबंधितास उक्त अधिनियमातील तरतूदीनूसार किरकोळ शास्ती लादण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड) च्या तरतूदीच्या अधिन ज्या कोणत्याही नगर पालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालिके व्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, असा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिन्याच्या आत ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील करता येईल अशी तरतूद आहे.

कार्यालयीन पत्र क्र.नांवामनपा/साप्रवि /आस्था-6/2538/15 दिनांक 25.05.2015 अन्वये त्यांना निलंबन प्रकरणी लादलेली शास्ती किरकोळ स्वरुपाची असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56(2)(ब) अन्वये लावण्यात आलेली शास्ती योग्य आहे असे त्यांना कळविण्यात आले आहे. करिता संबंधितावर लादलेली शास्ती कमी करता येणार नाही.

**सभापती** श्री जगदीश वसंतराव कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त मनपा नांदेड यांनी त्यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी पुढील 5 वर्षाकरिता गोठविण्यात आल्या आल्यामूळे तसेच दिनांक 25.10.2010 ते 26.05.2011 या कालावधीचा निलंबन कालावधी हा निलंबन काळ म्हणुन गृहीत धरण्यात आल्याच्या संदर्भात लादण्यात आलेल्या शास्ती विरुध्द

केलेल्या अपिलामध्ये मा. चौकशी अधिकारी यांनी सविस्तर चौकशी करुन अहवाल व मा. वैद्यकीय अधिकारी यांचा रिपोर्ट व फॉरेन्सीस लॅब औरंगाबाद यांच्या अहवाल ग्राहय न धरता आयुक्तांनी आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-१/११६९८/१२ दि. १३.०३.१२ अन्वये लादण्यात आलेली शिक्षा रद्द करावी अशा प्रकारची विनंती केलेली आहे. करिता चौकशी अधिकारी यांनी श्री जगदिश कुलकर्णी यांना निर्दोष ठरविले असल्यामुळे त्यांची अपिल मंजुर करण्यात येते. आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १४४** **ठराव**

श्री जगदीश वसंतराव कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त मनपा नांदेड यांनी त्यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी पुढील 5 वर्षाकरिता गोठविण्यात आल्या आल्यामूळे तसेच दिनांक 25.10.2010 ते 26.05.2011 या कालावधीचा निलंबन कालावधी हा निलंबन काळ म्हणुन गृहीत धरण्यात आल्याच्या संदर्भात लादण्यात आलेल्या शास्ती विरुध्द अपिल केलेले आहे त्यांच्या विभागीय चौकशीतील चौकशी अधिकारी यांनी संबंधिताविरुध्द लावण्यात आलेले दोषारोप चौकशी अधिका-यांने सिध्द होवु शकत नाही असा अहवाल दिलेला असल्यामुळे श्री जगदीश वसंतराव कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त यांची अपिल मंजुर करुन आयुक्त नावाशमनपा यांनी काढलेला आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-१/११६९८/१२ दि. १३.०३.१२ रद्द करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते आयुक्तांनी नियमानुसार वैधानिक कार्यवाही करावी. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.३३** **अपील** **दिनांक १२.०१.२०१५**

**प्रति,**
**मा. सभापती साहेब,**
**स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**विषय :-** विनंती अर्ज सादर करणे बाबत

**महोदय,**

सेवेत विनंती अर्ज सादर करण्यात येते की, मी राजु मुंजाजी कांबळे (पुरुष मजुर) प्रभारी वसुली लिपीक (बडतर्फ) हे की मी झोन क्रं. ३ इतवारा येथे प्रभारी वसुली लिपीक म्हणुन कार्यरत होते हे की दि. ३१.०७.१३ जा.क्रं. ८७८९ हया आदेशा अन्वये मला निलंबीत करण्यात आले व दि. ०४.०७.१४ रोजी जा.क्रं. ६५७७/१४ या आदेशान्वये मला (बडतर्फ करण्यात आले असुन) हे की वरील आदेशाने माझ्या कुटूंबावर उपास मारीची वेळ आली आहे. तरी माझ्या कुटूंबाचा निर्वाह होत नसल्यामुळे माझी परिस्थिती खुप बिकट झाली असून तरी मला मे. साहेबांनी माझ्या अर्जावर सहानुभुतीपुर्वक विचार करुन मला कामावर रुजु करुन घ्यावे ही नम्र विनंती.
अर्जदार

राजु मुंजाजी कांबळे
पुरुष मजुर बडतर्फ प्रभारी वसुली लिपीक

**सभापती** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत अपिल केले नसल्यामुळे त्यांचे अपिल फेटाळण्यात येते.

**ठराव क्रं. १४५** **ठराव**

श्री राजु मुंजाजी कांबळे, पुरुष मजुर बडतर्फ प्रभारी वसुली लिपीक यांनी कामावर रुजु करुन घेण्याचे संदर्भात केलेले अपिल हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत केलेले नसल्यामुळे श्री राजु मुंजाजी कांबळे, पुरुष मजुर बडतर्फ प्रभारी वसुली लिपीक यांचे कामावर रुजु करुन घेण्याचे अपिल ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते फेटाळते.

**विषय क्रं.३४** **अपील** **दिनांक १८.०२.२०१५**

**प्रति,**
**मा. सभापती साहेब,**
**स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**विषय :-** एका प्रकरणात एक वार्षीक वेतन व दुस-या प्रकरणात दोन वार्षीक वेतनवाढ कायम स्वरुपी बंद करुन अनुपस्थिती काळ निलंबन काळ गृहीत ठेवल्या बाबत.

संदर्भ :- १) का.आ.क्रं. पापुवजनि/२२/१२ दि. १२.४.१२
२) ज्ञापन क्रं. पापुवि/१९९७/१२ दि. ०२.०७.१२.
३) माझा खुलासा दि. ०४.०७.१२.
४) का.आ.क्रं. आसथा-५/८९७९/१३ दि. ०४.०३.१३
५) ज्ञापन क्रं. आसथा-५/७९५५/१३ दि. ०२.०७.१३
६) माझा खुलासा दि. २५.०८.१३

**महोदय,**

वरील विषयी आपणास विनंती करण्यात येते की मी चंद्रकांत नरसिंगराव रत्नपारखे पुरुष मजुर मनपा नांदेड मला एक प्रकरणात संदर्भ क्रं. १ अन्वये निलंबीत करण्यात आले होते संदर्भ क्रं. २ अनवये मी उध्दपटपणे वर्तन केल्याबाबत माझ्यावर ठपका ठेवण्यात आला असता मी संदर्भ क्रं. ३ अन्वये आपला खुलासा सादर केला असता मज्ञण्या खुलासावर कोणत्याही प्रकारचा सहानुभुतीपुर्वक विचार न करता एकतर्फी मला एक वार्षीक वेतनवाढ कायम स्वरुपी बंद करुन कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/आस्था-५/२६१६/१२ दि. २१.०७.१२ अन्वये शास्ती लावुन कामावर पुन:स्थापित करण्यात आलेले आहेत.

तदनंतर पुन्हा मला संदर्भ क्रं. ४ अनवये निलंबीत करुन संदर्भ क्रं. ५ अन्वये ज्ञापन बजावून जोडपत्र १ ते ४ नुसार दोषारोप लावण्यात आले होते सदरील दोषारोपा बाबत मी संदर्भ क्रं. ६ अनवये आपला खुलाशात माझे मानसिक संतुल बिघडल्यामुळे माझ्याकडून अनवधानाने चुक झाली असेल तर या पुढे अश्या प्रकारची चुक माझ्याकडून भविष्यात कधीही होणार नाही व मला एक वेळ माफ करावा म्हणुन खुलासा सादर केलेला असतांना कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/आस्था-५/१३२२३/१३ दि. २३ सप्टेंबर १३ च्या आदेशात माझे दोन वार्षीक वेतनवाढ कायम स्वरुपी बंद करण्यात येते तसेच दिनांक ०१.१२.१२ ते ०३.०३.१३ दरम्यानचा अनुपस्थिती कालावधी हा अनुपस्थिती काळ व दि. ०४.०३.१३ ते कामावर रुजु होईलपर्यंतचा निलंबनकाळ गृहीत धरुन कामावर पुनस्थापित करण्यात आलेले आहे.

तरी मे. साहेबांनी मी एक चतुर्थश्रेणी कर्मचारी असुन मी दोन्ही प्रकरणात माझे खुलासा सादर करुन अनवधानाने माझ्याकडून चुकी झाली असल्यास मला माफ करावा म्हणुन विनंती केलेली असतांना प्रशासनाकडून माझ्या अर्जावर सहानुभुतीपुर्वक विचार न करता माझ्यावर अन्याय झालेला आहेत. तरी मे. साहेबांनी कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/आस्था-५/२६१६/१२ दि. २१.०७.१२ व आदेश क्रं. साप्रवि/आस्था-५/१३२२३/१३ दिनांक २३ सप्टेंबर १३ च्या आदेशात लावण्यात आलेल्या वार्षीक वेतनवाढी पुर्ववत चालु करणे व निलंबनकाळ हा सेवाकाळ म्हणून धरण्यात यावा व माझ्यावर झालेला अन्याय दुर केल्यास आपला अत्यंत आभारी राहील ही विनंती.

आपला विश्वासु<br>
स्वाक्षरीत/-<br>
चंद्रकांत नरसिंगराव रत्नपारखे<br>
पुरुष मजुर मा. उपआयुक्त (विकास) कक्ष मनपा नांदेड

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

श्री चंद्रकांत नरसिंगराव रत्नपारखे, पुरूष मजुर यांना उध्दटपणे वर्तन केल्यामुळे व सतत अनुपस्थित राहिल्यामुळे कार्यालयीन आदेश क्र.पापुवजनि/22/12 दि.12.04.2012 अन्वये निलंबीत करण्यात आले होते. तद्रंतर कार्यालयीन ज्ञापनाव्दारे संबंधिताविरुध्द दोषारोप बजावुन त्या बाबत खुलासा मागविण्यात आला असता, संबंधितांनी दिनांक 25.07.2013 रोजी खुलासा अर्ज सादर करुन त्यांच्यावर लावण्यात आलेले सर्व दोषारोप मान्य केले असल्याने दिनांक 01.12.2012 ते 03.03.2013 दरम्यानचा अनुपस्थित काळ व दिनांक 04.03.2013 व कामावर रुजु होईपर्यंत चा निलंबन कालावधी हा निलंबन काळ गृहीत धरुन कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/13223/13 दि.23 सप्टेबर 2013 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 मधील तरतुदीनुसार संबंधिताची दोन वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करुन संबंधितास कामावर रुजु करुन घेण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56(2)(क) नूसार आयुक्तास महानगरपालिकेने नेमलेल्या कोणत्याही अधिका-यावर पोट कलम (2) खंड (अ)(ब)(ड) व (ख) मध्ये विनिदिष्टी केलेल्या शास्ती पैकी कोणतीही शास्ती लादता येईल त्यानूसार संबंधितास उक्त अधिनियमातील तरतूदीनूसार किरकोळ शास्ती लादण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतूदीच्या अधिन ज्या कोणत्याही नगर पालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालिके व्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, असा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिन्याच्या आत ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील करता येईल अशी तरतूद आहे.

करीता संबंधितावर लादलेली शास्ती किरकोळ स्वरूपाची असल्यामुळे ती रद्द किंवा त्यात बदल करता येणार नाही व या प्रकरणी अपीलाची तरतूद नाही.

**सभापती** श्री चंद्रकांत नरसिंगराव रत्नपारखे .पु.मजुर. यांना लादण्यात आलेली शास्ती ही किरकोळ स्वरुपाची असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात या शास्ती विरुध्द अपिल करण्याची तरतूद नसल्याने त्याचे अपिल फेटाळण्यात येते.

**ठराव क्रं. १४६** **ठराव**

श्री चंद्रकांत नरसिंगराव रत्नपारखे .पु.मजुर यांनी आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/13223/13 दि.23 सप्टेबर 2013 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 मधील तरतुदीनुसार संबंधिताची दोन वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद केल्या मूळे या शास्ती विरुध्द स्थायी समितीकडे अपिल केलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतूदीनूसार अधिका-यास किंवा कर्मचा-यास खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, असा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिन्याच्या आत निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील तरतूद आहे परतु एखाद्या पालिका कर्मचा-यांने अधिका-यांने गैरवर्तन केले असेल किवा कामात निष्काळजीपणा केला असेल तर अशा अधिका-यास कर्मचा-यास दंड लावणे, वार्षिक वेतनवाढ रोकणे, अशा प्रकारची किरकोळ स्वरुपाची शास्ती लादण्याचे अधिकार आयुक्तांना असून

महानगरपालिका अधिनियमात अशा किरकोळ शास्ती विरुध्द अपिल करण्याची तरतूद नसल्यामूळे श्री चंद्रकांत नरसिंगराव रत्नपारखे पु.मजुर नावाशमनपा नांदेड यांचे उपरोक्त अपिल ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते फेटाळते.

**विषय क्रं.३५**

**स्थायी समितीपुढे अपिल मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५४(४) अन्वये**

**दिनांक ०९.०२.२०१५**

**प्रति,**

**मा. सभापती साहेब,**

**स्थायी समिती,**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**विषय :-** मा. आयुक्त मनपा नांदेड यांनी लादलेल्या शास्ती माफ करणे बाबत

संदर्भ :- १) का.आ.क्रं. मनपा/आस्था-४/१०७९३/०४

२) माझे निवेदन दि. ३०.११.०४

**महोदय,**

वरील विषयी व संदर्भीयानुसार सविनय अर्ज सादर करण्यात येते की मी खालील सही करणार मनपाकेत लिपीक या पदावर कार्यरत आहे मी वसुली विभागात वसुली लिपीक काम करीत असतांना अचानक आजारी पडल्यामुळे मी दिनांक ३१.०४.०४ पासुन कामावर हजर राहु शकलो नाही व रजा सुध्दा पाठवणे जमले नाही त्याच आजारी काळात कार्यालयीन आदेश क्रं. आस्था-४/१७५१/०४ दि. २६.०४.०४ नुसार चालान उशीरा भरणे (२) कामात निष्काळजीपणा करणे (३) वरिष्ठांचे आदेश व सुचनांचे पालन न करणे (४) वसुलीचे उद्दिष्ठ सहाय न करते हया दोषारोप लावुन मला निलंबीत केले होते कार्यालयीन आदेश क्रं. आस्था-४/१०७९३/०४ दिनांक ३०.११.०४ नुसार पुन:स्थापित केले आहे व मी कार्यरत आहे सदरील आदेशा मध्ये माझे एक वर्षाचे वेतनवाढ ही कायम स्वरुपी बंद करण्यात आहे आहे व निलंबनाचा काळ निलंबन ग्राहय धरण्यात आलेला आहे अशा दोन प्रकारच्या शास्ती माझ्यावर लावण्यात आल्या आहेत त्या अन्याय कारक आहेत माझ्यावर लावलेले दोष हे पुर्णपणे चुकीचे आहे मी कार्यालयीन कामात कधीच निष्काळजीपणा केलेला नाही तसेच वरिष्ठ अधिका-यांचे आदेशाचे व सुचनेचे वेळोवेळी पालन केलेले आहे तसेच दिलेले उद्दिष्ठे साहाय करण्यासाठी सर्वातोपरी प्रयत्न केले आहेत माझ्याकडे पिरबु-हाण हा वसुलीसाठी वार्ड होता त्यामध्ये प्रत्येक मालमत्तेवर मनपा मालमत्ता असे नांव येत असल्या कारणाने तेथील मालमत्ता धारक वसुली देत भरत नव्हते त्यामुळे उदिष्ठे साहय करीत नव्हते तरी पण मी अटाककट प्रयत्न केले आहे या वसुली केलेली आहे चालान उशीरा भरणे या मध्ये मी आजारी पडल्यामुहे वेळेच्या आत चालन भरु शकलो नाही थोडे उशीरा चालनाचा भरणा केलेला आहे व सोबत आजारी पडल्याचे वैद्यकिय दाखला सोबत सादर केला होता तो स्विकारलेला नाही तसेच मी प्रामणकिपणाने कार्यालयाचे सेवा केलेली आहे मी कार्यालयाचे आर्थीक नुकसान केलेले नाही किंवा आर्थीक गैरव्यवहार केलेला नाही मी आयुक्त साहेबांनी वरील बाबीचा विचार न करता माझ्यावर अन्यायकारक शास्ती लावलेल्या आहेत तरी मा. सभापती साहेबांनी सहानुभुतीपुर्वक विचार व पुन:निरीखक करुन मला लावलेल्या शास्ती बाबत चे प्रकरण स्थायी समिती समोर ठेवुन लावलेल्या शास्ती माफ कराव्यात व मला न्याय मिळवून द्यावा ही विनंती.

अर्जदार

स्वाक्षरीत/-

गिरी दिगांबर हिराजी

लिपीक झोन क्रं. २ मनपा नांदेड

<u>प्रशासकिय टिप्पणी</u>

उपरोक्त संदर्भीय विषयी, **श्री. दिगांबर हिराजी गिरी, लिपीक** हे दिनांक 31.04.2004 पासून कामावर हजर राहु शकलो नाही. व रजा सुध्दा पाठवता आले नाही. त्याच आजारी काळात त्यांना 1) चालान उशिरा भरणे 2) कामात निष्काळजीपणा करणे 3) वरिष्ठाचे आदेशाचे व सुचनेचे पालन न करणे, 4) वसुलीचे उद्दिष्ठ सहाय्य न करणे हे दोषारोप लावून कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-4/1751/2004 दिनांक 26.04.2004 नुसार निलंबित करण्यात आले होते. त्यांची एक वार्षीक वेतन वाढ कायम स्वरुपी गोठवून त्यांचा निलबंनाचा काळ निलंबन काळ ग्राह्य धरण्यात आला आहे. व त्यांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-4/10793/2004 दिनांक 30.11.2004 अन्वये त्यांची पूर्नस्थापना करण्यात आली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56(2)(क) नूसार आयुक्तास महानगरपालिकेने नेमलेल्या कोणत्याही अधिका-यावर पोट कलम (2) खंड (अ)(ब)(ड) व (ख) मध्ये विनिदिष्टी केलेल्या शास्ती पैकी कोणतीही शास्ती लादता येईल त्यानूसार संबंधितास उक्त अधिनियमातील तरतूदीनूसार किरकोळ शास्ती लादण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतूदीच्या अधिन ज्या कोणत्याही नगर पालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालिके व्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, असा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिन्याच्या आत ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील करता येईल अशी तरतूद आहे.

करीता संबंधितावर लादलेली शास्ती किरकोळ स्वरूपाची असल्यामुळे ती रदद किंवा त्यात बदल करता येणार नाही व या प्रकरणी अपील करण्याची तरतुद नाही.

**सभापती** श्री गिरी दिगाबर हिराजी,लिपिक झोन क्र.२ मनपा यांना लादण्यात आलेली शास्ती ही किरकोळ स्वरुपाची असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात या शास्ती विरुध्द अपिल करण्याची तरतूद नसल्याने त्याचे अपिल फेटाळण्यात येते.

**ठराव क्रं.१४७** **ठराव**

श्री गिरी दिगाबर हिराजी, लिपिक झोन क्र.२ मनपा यांनी एक वर्षाचे वेतनवाढ ही कायम स्वरुपी बंद केल्यामूळे या लादण्यात आलेल्या शास्ती विरुध्द स्थायी समितीकडे अपिल केलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतूदीनूसार अधिका-यास किंवा कर्मचा-यास खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, असा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिन्याच्या आत निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील तरतूद आहे परतु एखाद्या पालिका कर्मचा-यांने अधिका-यांने गैरवर्तन केले असेल किवा कामात निष्काळजीपणा केला असेल तर अशा अधिका-यास कर्मचा-यास दंड लावणे ,वार्षिक वेतनवाढ रोकणे, अशा प्रकारची किरकोळ स्वरुपाची शास्ती लादण्याचे अधिकार आयुक्तांना असून महानगरपालिका अधिनियमात अशा किरकोळ शास्ती विरुध्द अपिल करण्याची तरतूद नसल्यामूळे श्री गिरी दिगाबर हिराजी, लिपिक झोन क्र.२ मनपा यांचे उपरोक्त अपिल ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते फेटाळते.

**विषय क्रं.३६** **अपील** **दिनांक १७.१२.२०१४**

**प्रति,**
**मा. सभापती साहेब,**
**स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**विषय :-** कायमची बद केलेली एक वार्षीक वेतनवाढ पुर्ववत चालु करणे बाबत

**महोदय,**

उपरोक्त विषयी विनंती करण्यात येते की मी खालील सही करणार आपल्या महापालिकेत कायम स्वरुपी स्त्री मजुर म्हणुन कार्यरत आहे सालसन १९९८ मध्ये वैद्यकिय कारणासाठी मी दिर्घकालीन रजेवर असतांना मला निलंबीत करण्यात आले होते. विभागीय चौकशी मध्ये माझ्यावर अनुपस्थितीचा दोष ठेऊन माझी का.आ.क्रं. साप्रवि/आस्था-२/१५२/२००१ दि. ०७.०४.२००१ अन्वये एक वार्षीक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करण्यात आलेली आहे

करिता विषयांकीत प्रकरणी सहानुभुतीपुर्वक विचार करुन माझी बंद केलेली वार्षीक वेतनवाढ २००१ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने मंजुर करावी ही विनंती.

अर्जदार
स्वाक्षरीत/-
श्रीमती जयश्री मारोती पारदे
स्त्री मजुर नावाशमनपा नांदेड

**प्रशासकिय टिप्पणी**

उपरोक्त संदर्भीय विषयी, श्रीमती जयश्री मारोती पारदे, स्त्री मजुर ह्र्या दिनांक 21.11.1998 ते 28.12.1999 पर्यंत अनाधिकृतपणे कामावर गैरहजर असल्यामुळे त्यांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-2/7144/1999 दिनांक 29.12.1999 अन्वये निलंबित करण्यात आले होते.त्यांची एक वार्षीक वेतन वाढ कायम स्वरुपी गोठवून त्यांचा अनुपस्थीत कालावधी विनावेतनी व निलंबन कालावधी हक्क असलेल्या रजेत समाविष्ट करण्यात येवून कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-2/152/2001 दिनांक 07.04.2001 अन्वये त्यांची पूर्नस्थापना करण्यात आली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56(2)(क) नूसार आयुक्तास महानगरपालिकेने नेमलेल्या कोणत्याही अधिका-यावर पोट कलम (2) खंड (अ)(ब)(ड) व (ख) मध्ये विनिदिष्टी केलेल्या शास्ती पैकी कोणतीही शास्ती लादता येईल त्यानूसार संबंधितास उक्त अधिनियमातील तरतूदीनूसार किरकोळ शास्ती लादण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतूदीच्या अधिन ज्या कोणत्याही नगर पालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालिके व्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, असा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिन्याच्या आत ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील करता येईल अशी तरतूद आहे.

करीता संबंधितावर लादलेली शास्ती किरकोळ स्वरूपाची असल्यामुळे ती रदद किंवा त्यात बदल करता येणार नाही व या प्रकरणी अपील करण्याची तरतुद नाही.

**सभापती** श्रीमती जयश्री मारोती पारदे, स्त्री मजूर, नावाशमनपा नांदेड यांना लादण्यात आलेली शास्ती ही किरकोळ स्वरुपाची असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात या शास्ती विरुध्द अपिल करण्याची तरतूद नसल्याने त्याचे अपिल फेटाळण्यात येते.

**ठराव क्रं. १४८** **ठराव**

श्रीमती जयश्री मारोती पारदे, स्त्री मजूर, नावाशमनपा नांदेड यांनी का.आ.क्रं. साप्रवि/आस्था-२/१५२/२००१ दि. ०७.०४.२००१ अन्वये एक वार्षीक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करण्यात आल्यामूळे या लादण्यात आलेल्या शास्ती विरुध्द स्थायी समितीकडे अपिल केलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतूदीनूसार अधिका-यास किंवा कर्मचा-यास खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, असा आदेश त्यास कळविल्यापासून एक महिन्याच्या आत निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील तरतूद आहे. परतु एखाद्या पालिका कर्मचा-यांने अधिका-यांने गैरवर्तन केले असेल किवा कामात निष्काळजीपणा केला असेल तर अशा अधिका-यास कर्मचा-यास दंड लावणे ,वार्षिक वेतनवाढ रोकणे, अशा प्रकारची किरकोळ स्वरुपाची शास्ती लादण्याचे अधिकार आयुक्तांना असून महानगरपालिका अधिनियमात अशा किरकोळ शास्ती विरुध्द अपिल करण्याची तरतूद नसल्यामूळे श्रीमती जयश्री मारोती पारदे, स्त्री मजूर, नावाशमनपा नांदेड यांचे उपरोक्त अपिल ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते फेटाळते.

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

स्वाक्षरीत/-
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

स्वाक्षरीत/-
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांवाशमनपा, नांदेड.